मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

ए, मे, जून, जुलै-ऑग-स., दिवाळी-ऑ-डि-3

ऑ-नो-डि-२००१

2009-02-03

2002- जाफेमा, एमेजू- 2

2003- जातेडि - 1

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

२००१

एप्रिल - मे - जून २००१

युगवाणी

वर्ष ५३ वे / अंक ५३ : १ ते ३



संपादिका / सुलभा हेर्लेकर

अतिथी संपादक / वामन तेलंग

अनुक्रमणिका



। विनम्र । अभिवादन ।..............................

विदर्भाच्या साहित्य व कला क्षेत्रातील एक अग्रणी कार्यकर्ता-व्यक्तित्व राहिलेले महाराष्ट्राचे माजी मुख्य मंत्री श्री सुधाकरराव नाईक यांचे दिनांक १० मे २००१ रोजी मुंबई येथे निधन झाले. विदर्भ साहित्य संघाचे ते आजीव सभासद होते. यवतमाळ व पुसद येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, विदर्भ साहित्य संघाची प्रांतिक अधिवेशने व साहित्य संघाचे विविध उपक्रम यशस्वी करण्यात त्यांचा पुढाकार होता. साहित्य, संगीत, नाटक अशा विविध कलांमध्ये त्यांना रस होता. विदर्भ साहित्य संघाच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहात. त्यांच्या निधनाने समाजकारणाचे तसेच साहित्यकारणाचे एक खंदे पुरस्कर्ते काळाच्या पडद्याआड गेले आहेत. यवतमाळहून 'सोनाली' नावाचे मासिक संपादून व चालवून स्वतःसोबतच यवतमाळ, पुसद सारख्या अर्धशहरी भागाला कला-विश्वाशी जोडून घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तो लक्षणीय म्हणावा लागेल. त्यांच्या स्मृतीला विदर्भ साहित्य संघाचे विनम्र अभिवादन !

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

एप्रिल - मे - जून : २००१ वर्ष ५३ वे
अंक ५३ : १ ते ३

अनुक्रम

संपादकीय : वामन तेलंग

विश्रब्ध शारदा

माझे लेखन : विभावरी शिरुरकर,

बंधनाच्या पलिकडे : पु.य., के. ना. काळे, वा. ना. देशपांडे

गोफ तिहेरी व्यक्तिमत्वाचा : डॉ. शोभा बुचे

तीन भाषणे, काही अंश :
डॉ. प्रतिमा इंगोले, प्रभा गणोरकर, विजया राजाध्यक्ष

नीरजा : जया द्वादशीवार

आंधळ्याच्या गाई : स्मिता कापसे

शुष्क कोरडे काही : सुप्रिया अय्यर

विदर्भ साहित्य संघ : कार्यवृतांत

कविता : नारायण कुळकर्णी - कवठेकर

....

प्रकाशक / मुद्रक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
नागपूर १२
दूरध्वनी : ५२३९२९

मांडणी
स्पार्क असोसिएटस्, नागपूर

अक्षर जुळवणी
श्रीअक्षर टाईपसेटर्स् , नागपूर

संपादक : डॉ. सुलभा हेर्लेकर

अतिथी संपादक : वामन तेलंग

कार्यकारी संपादक : केशव जोशी

संपादक मंडळ : डॉ. शोभा बुचे, डॉ. श्यामला मुजुमदार, डॉ. किशोर सानप, प्रा. धनराज डहाट, प्रा. अशोक थोरात, तीर्थराज कापगते, प्रा. दिलीप अलोणे

पत्रव्यवहाराचा पत्ता :
संपादक,
युगवाणी,
विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सिताबर्डी,
नागपूर : ४४००१२
दूरभाष : ५२३९२९

महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य आणि संस्कृति मंडळाचे अंशदान प्राप्त.

।सं।पा।द।की।य।

विदर्भ साहित्य संघाचे वाङमयीन मुखपत्र असलेल्या 'युगवाणी' च्या प्रकाशनामध्ये मागील ६ वर्षांपासून खंड पडला होता. शिवा राऊत कविता विशेषांक (१९९५) व १९९८ मध्ये कै. ग.त्र्यं. माडखोलकर जन्म शताब्दी निमित्त निघालेला माडखोलकर विशेषांक असे 'युगवाणी'चे दोनच अंक या प्रदीर्घ काळामध्ये प्रसिद्ध होऊ शकले होते. त्याआधीपासूनच 'युगवाणी' अनियमित झाल्यासारखी होती. एका एका अंकासाठी येणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करणे विदर्भ साहित्य संघाला झेपेनासे झाले होते. उत्पन्न आणि खर्च यातील तफावतीमुळे महाराष्ट्रातील बहुतेक साहित्य संस्थांच्या मुखपत्रांची अवस्थाही जवळपास अशीच होती. विदर्भ साहित्य संघाच्या उत्पन्नाची साधने आटली होती. त्याचा परिणाम 'युगवाणी' अनियमित होण्यामध्ये झाला. ती पूर्ववत सुरू व्हावी अशी साहित्य संघाच्या समस्त कार्यकारिणीची इच्छा होती, परंतु आर्थिक कोंडी फुटत नव्हती. आता नव्या कार्यकारिणीने त्या कोंडीतून बाहेर पडण्याचे ठरविले आहे व त्या दिशेने पावले उचलण्यासाठी सुरुवात केली आहे. 'युगवाणी' चा हा अंक त्याचाच प्रत्यय देणारा आहे. बदललेल्या स्वरूपात का होईना दर तीन महिन्यांनी 'युगवाणी' वाचकांच्या भेटीला येईल.

'युगवाणी' च्या या अंकात काही जुनेच लेखन पुनर्मुद्रित केलेले आहे. विदर्भातील तत्त्वचिंतक साहित्यिक कै. पु.य. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष मधल्या काळात येऊन गेले, तर अलीकडेच मालतीबाई बेडेकर यांचे निधन झाले. त्या दोघांचे वाङमयीन स्मरण म्हणून या अंकात 'विश्रब्ध शारदे' तला मजकूर पुनर्मुद्रित केलेला नाही किंवा 'तीन भाषणे; काही अंश' हा मजकूर देखील संकलित स्वरूपात जो या अंकात समाविष्ट केलेला आहे तो निव्वळ त्या भाषणांची नोंद करण्यासाठी पुन्हा छापलेला नाही. विभावरी शिरूरकर, यांच्या लेखनातून व्यक्ती म्हणून स्त्रीचा स्वतंत्र विचार सुरू होतो. 'तीन भाषणे, काही

अंश' हा त्या विचाराचाच नव्या काळातील एक टप्पा मानावा लागेल. नीरजा यांच्या कविता आणि मेघना पेठे यांच्या कथा यातून स्त्रीच्या पुरुषनिरपेक्ष स्वतंत्र स्वायत्त अस्तित्वाची उंची आणि व्याप्ती अधोरेखित होते. थोडक्यात विभावरी शिरूरकर ते नीरजा - मेघना असे एक अंतःसूत्रच मराठी साहित्य विश्वात पहावयास मिळते. 'तीन भाषणे, काही अंश' हे लिखाण त्या साखळीतीलच कड्या होत. ही जाणीव ठसठशीतपणे पुढे ठेवण्यासाठीच त्या लिखाणाच्या पुनर्मुद्रणाचा आधार घेतला आहे. साहित्य - कलेच्या क्षेत्रातील मूल्यव्यूह कोणते? साहित्य म्हणजे काय? त्याची निर्मिती कशी होते हा एक दुसरा मुद्दा. 'विश्रब्ध शारदा' ते विजया राजाध्यक्ष असा त्याचा प्रवास सांगता येईल. त्याही अंगाने या अंकातील लेखनाचा वेध घेण्यासारखा आहे.

'युगवाणी' ला नव्या जुन्या लेखकांचे, विचारवंतांचे लेखन-सहकार्य हवे आहे. ते लेखन हेच 'युगवाणी' चे वाङमयीन बळ असेल. आजवर संपूर्ण मराठी जगतातून 'युगवाणी' ला हे बळ मिळत असे; पुढेही ते मिळत राहील असा विश्वास वाटतो.

वामन तेलंग

'युगवाणी' च्या वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी : रु. १०० (सर्वांसाठी)

साहित्य संघाच्या सभासदांसाठी सवलत वर्गणी : रु ६०

आजच आपली वर्गणी जमा करा. 'युगवाणी' [illegible]

पत्ता : संपादक, 'युगवाणी', द्वारा विदर्भ साहित्य संघ,
झाशी राणी चौक, वर्धा मार्ग, नागपूर : ४४००१२

युगवाणी : कायम निधी योजना

'युगवाणी' चे प्रकाशन मागील सहा वर्षांपासून 'बंद' सारखेच झाले होते. त्याची खंतही विदर्भ साहित्य संघाला वाटत होती. वेगवेगळ्या प्रसंगी अध्यक्ष या नात्याने ती खंत मी स्वतः आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी व कार्यकारिणीतील माझे सहकारी यांनी व्यक्तही केलेली होती. पण केवळ खंत व्यक्त करून उपयोग नव्हता. या स्थितीतून बाहेर पडण्याचे अध्यक्ष या नात्याने मी व माझ्या नव्या कार्यकारिणीने आता ठरविले आहे. 'युगवाणी' च्या आकारमानात बदल आणि खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी 'युगवाणी' साठी कायम स्वरूपाचा निधी उभारणे हा त्याचाच एक भाग आहे. सुदैवाने 'युगवाणी' साठीच्या निधीला हातभारही चांगला लागतो आहे. 'युगवाणी'ला सर्वांकडून कायम स्वरूपी देणग्या, जाहिराती हव्या आहेत. त्यामधून गोळा होणारा निधी फक्त 'युगवाणी' साठीच वापरला जाईल असा निर्णय व तशी व्यवस्था कार्यकारिणीने केली आहे. देणगी-दात्यांकडून किमान ५ हजार व त्यापेक्षा अधिक रक्कम अपेक्षित आहे. अशा देणगीदारांची नावे 'युगवाणी' तून कृतज्ञतापूर्वक प्रसिद्ध केली जातील. 'युगवाणी' आणि विदर्भ साहित्य संघ यांची वाङमयीन पूर्वपुण्याई व विदर्भातील उदारमनस्क रसिक यांचेवर माझा पूर्ण विश्वास आहे. त्या विश्वासापोटीच विदर्भ साहित्य संघाने हे पाऊल उचलले आहे. आपलेही एक पाऊल त्यासोबत पडू द्या.

आपल्या निधीचा धनादेश 'अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर' या नावाने असावा ही नम्र विनंती.

सुरेश द्वादशीवार
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ
नागपूर

अनुक्रमणिका

कविता...

नारायण कुलकर्णी कवठेकर

पाऊस

अलीकडे तुझे-माझे संबंध बिघडलेत,
परस्परांवर जीव टाकणाऱ्या प्रेमिकांचे
पतिपत्नी झाल्यावर व्हावेत तसे.

मागे तू अबोला धरलास-
वर्षानुवर्षे आलाच नाहीस,
सोयरा झालाच नाहीस...
इतका दुष्टावा रे -
की भेगाळलेल्या शेताकडे पाहताही येऊ नये...

अन् अलीकडे, छळ मांडल्यासारखा,
आभाळ सांडल्यासारखा,
उंडारत, बेमुर्वत...
इतका दुस्वास रे -
की चिखल बनलेल्या शेतातं पायही टाकता येऊ नये...

तुला तरी काय दोष द्यावा म्हणा
अन् रागाचा सूर काढावा...
तार आणि बोटे
दोघेही नाही राहिलेत संवादी;
नशीब तसे जेमतेम
अन् काळ असा छळवादी...

कविता...

माणूस...

हुकलेली संधी
अन् उरलेली हळहळ
यांना घेऊन जगतो माणूस
कालची संध्याकाळ
आजची सकाळ
यातला फरक जोखता-
जोखता थकतो माणूस
रडावं की ओरडावं
हेही सुचत नाही;
गप्प बसला तर
जीव जाईल
असं वाटून
बकतो माणूस.
पण याची कीव तरी
कितीदा अन् कशी करावी,
त्याच त्याच वळणावर
पुन्हा पुन्हा जो
चकतो माणूस.

पाठबळ

हे चिंचेचे झाड
वास आणि चव असलेले
बुंधा नावाची मांडी
अन् फांद्या नावाचे हात असलेले
माझ्या जन्माआधीपासून
उभे असलेले
शेकडोंवर पाखर घालणारे,
मी कवटाळतो स्वप्नातही त्याला
अन् आजीच्या खरखरीत
तळहातासारख्या सालीवर डोके
टेकवून होतो शांत.

मी उसळलो,
जेव्हा त्यांनी उगारली कुऱ्हाड
कलम अमुक निमित्त तमुक सांगून
मी उभा राहिलो ताठ
झाडाच्या आणि कुऱ्हाडीच्या मधे,
निर्भय;
आणि स्वार्थाची बोटे न्
मुजोरीचा पंजा असलेले
मस्तवाल मनगट लुळे पडले.

माझ्या सात्विक संतापाला
नाही केवळ श्रेय या विजयाचे;
झाडही उभे होते ना माझ्या पाठीशी,
मुळा-बुंधा-पाना-फांद्या-फळासह वर्तमान,
वृक्षअज्ञान...

कविता...

देवबा नावाच्या माणसाची गोष्ट

भाकर खाताना
लसणाची चटणी अनुपस्थित असते.
असलीच उपलब्ध तर तेलाऐवजी
ती ओली करावी लागते
डोळ्यातील पाण्याने
-देवबा नावाचा माणूस
हे सगळं सोसताना म्हणतो,
'नशिबाचा आकडा
मार खाल्ला
एका दाण्याने...'

त्याच्या निरक्षर श्रद्धाळू बापाने
त्याचे नाव ठेवले देवबा.
जन्मला तेव्हा अन् नंतरही
त्याला भेटला नाही सरकारी डाक्टर
नेहमीप्रमाणे अनुपस्थित असणारा,
गावातल्या प्राथमिक स्वास्थ्य केंद्रात.

अशा दुर्लक्षातूनही पळूया
तगला;
सिनेमातलं लहान मूल
लांडग्यांच्या कळपात वाढावं
तसा देवबा जगला.

आता मायबाप मेलेत,
देवबा आहे.
पण देवाचे नाव तो
घेत नाही.
नशिबाची गोष्ट काढली
की तो तोंड फिरवतो,
डो।यांच्या भकास भोकांना
आसवांचे घास भरवतो.

एक दिवस देवबा मरून जाईल.
प्रश्न माझ्यासमोर पुढचा आहे-
देवबाचं पोरगं
यानंतरच्या वाटचालीत
कोणाचं बोट धरून जाईल?

कविता...

कवी आणि काळ

कवी आणि काळ
हातात हात घालून चालतात.

अतिप्रेमामुळे किंवा
खूप वेळ चालल्यामुळे,
दोघांच्या, परस्परात मुद्दामहून
गुंतवलेल्या तळव्यांना
घाम येतो.
म्हणून दोघे थोडा वेळ
हात सुटे करून चालतात.
गंमत म्हणजे
दोघांनाही बरे वाटते.

मग कवी काळाच्या पुढे
दोन पावले चालू लागतो.
मित्र नाराज तर झाला
नाही ना,
आपण त्याला फार मागे तर
सोडले नाही ना,
पुढे जाण्याच्या सोसापायी
त्याचा अधिक्षेप तर
केला नाही ना,
-असा कवी विचार करतो,
तो मागे वळून पाहतो.
कारण तो संवेदनशील
हळवा जागरुक उद्भट
असा एकाच वेळी असतो.
पण काळ गती वाढवत
नाही, म्हणून कवी
खट्टू होतो.
त्याचवेळी, पावलांना मिळालेली
गती
रोखता येत नाही
असेही त्याला जाणवते.

मग एक वेळ अशी येते;
कवी खूप पुढे जातो.
अतिश्रमामुळे तो पुढे थकतो.
तो पुढे कोसळतो.
त्याची हृदयक्रिया पुढे
बंद पडते.

काळ मागून येतो चालत
त्याच्या नेहमीच्या चालीने;
अन् कोणाला कळणार नाही
अशा बोलीने-
काळ पुटपुटतो कवीच्या
कानात,
3तुझी सोबत,
माझ्या वाटचालीत
माझे धैर्य वाढवणारी होती.2

कविता...

पोरगी

मीच दिलं होतं ढकलून,
मेघनाला वाहत्या पाण्यात
जाणूनबुजून.

मी ढाळले नकाश्रू,
काठावर उभा राहून
तिच्या नाकातोंडात पाणी
जाताना, पाहताना.

हात देण्याचे नाटकही
केले मी,
ती गटांगळ्या खाताना.

तिने केलेला राग
मी टाकला बुडवून
माझ्या त्रागयात.
ती कामेही लादली
तिच्यावर,
जी असतात
पुरुषाच्या भागयात.
तिने केले बिचारीने
सगळे. कधी नाक मुरडत,
कधी धुमसत
वाटले असेलही कदाचित तिला,

की तत्वाचा आव
आणणारा बाप
बनू लागलाय ऐदी,
शब्दांचा फुगा फुगवतोय
गोष्ट सांगताना साधी.

प्रयोग यशस्वी झाला
म्हणून माझ्या गमजा;
एरवी थरकाप उडायचा
जिवाचा, विचार करताना
उद्यांचा.

आज,
पोरीला सांगत नाही मी,
पण मनोमन आनंदित होतो;
मेघनाची काळजी वाटत नाही
मला आता,
तिचा आधार वाटतो.

—

।वि।श्र।ब्ध।शा।र।दा।..................................

धार्मिक व सामाजिक व्यवस्था, रुढी, परंपरा, मान्यता आणि कायदे इत्यादींच्या जाचक बंधनांमध्ये करकचून आवळलेल्या स्त्रियांचे आणि मांग गारुडी जमातीचे श्वास प्रथमच मोकळे करणाऱ्या ख्यातनाम लेखिका श्रीमती मालतीबाई बेडेकर या दिनांक ७ मे २००१ रोजी पुणे येथे विश्रब्ध पावल्या. मृत्यूसमयी त्यांचे वय ९६ वर्षांचे होते. विचार आणि वर्तन यात अंतराय न करणाऱ्या मराठीतील या सुधारणावादी लेखिकेच्या पार्थिवावर त्यांच्या इच्छेनुसार कोणत्याही धार्मिक विधीशिवाय अंत्यसंस्कार करण्यात आले. 'कळ्यांचे निःश्वास', 'हिंदोळ्यावर', ' विरलेले स्वप्न', 'बळी' ह्या त्यांच्या गाजलेल्या व वादळी ठरलेल्या लेखनकृती. समाजाचा रोष टाळण्यासाठी 'विभावरी शिरुरकर बी.ए.' या टोपणनावानेच त्यांना लिहावे लागले. त्यांचे माहेरचे नाव बाळूताई खरे. १ आक्टोबर १९०५ सालचा त्यांचा जन्म. आपल्या लेखनवृत्तीच्या संदर्भात त्यांनी लिहिलेले एक पत्र येथे पुनर्मुद्रित करीत आहोत. 'प्रतिभा' विशेषांकात १९३५ साली हे पत्र प्रथम प्रकाशित झाले होते. त्यांच्या क्रांतिकारी स्मृतीला विदर्भ साहित्य संघ आणि 'युगवाणी' चे विनम्र अभिवादन !

■ ■ ■

अनुक्रमणिका

।मा।झे।ले।ख।न।......................................

● विभावरी शिरूरकर

मुंबई, ४-४-१९३५

संपादक महाशय!

तुमचं पत्र वाचलं आणि मी बुचकळ्यांत पडलें. एकदां वाटलं की, उत्तरादाखल मला खूप लिहितां येईल आणि एकदा वाटलं की, काय नि कशाला उत्तरं द्यायचीं ह्या प्रश्नांना ?

तुम्हाला आठवत असेल. किती सहजा- सहजी आपण एक दिवस बोलत बसलों होतो इकडल्या-तिकडल्या गोष्टी. आणि तुम्ही एकदम म्हणालां, "असा आहे तर स्त्रीस्वभाव !" त्या दिवशी तुम्ही आणि मी कितीतरी वेळ बोललों. तें सगळं बोलणं माझ्या मनांत घोळत होतं. त्या दिवसापासून माझ्या मनांत इतका कोलाहल माजला कीं, मला त्याला शब्दस्वरूप दिल्याशिवाय राहवेना !

एक, दोन, तीन, किती तरी -- अनंत कोडीं माझ्या नजरेसमोर नाचूं लागलीं, शेवटी मी एकेक पान लिहीत गेलें. महिना पंधरा दिवसांतच मला वाटलं, "किती लिहिणार मी, माझ्या ह्या भंगुर लेखणीनं?" त्यांतून मला लिहिण्याची सवय नसल्यामुळं मी अगदी कंटाळून गेलें. सगळीं लिहिलेली पानं ठेवून दिली एका बाजूला. सारं अफाट जीवित डोळ्यांपुढं येऊन माझ्या वीतभर लेखणीच्या असमर्थ वाणीकडे मी हताश होऊन पाहिलं.

एक दिवस तुम्ही मला कोणतंसं इंग्रजी पुस्तक दिलंत आणि म्हटलंत, "पहा तर खरं हे लोक स्त्रियांचं जीवन किती नाजुक लेखणीने-कुशलतेनं रेखाटतात तें !" मीं तें पुस्तक वाचलं आणि मला वाटलं, कादंबऱ्या कसल्या? कादंबऱ्यांहून अद्भुत सत्य आणि वैचित्र्य जगांत आहे-- हिंदुस्थानांत आहे, महाराष्ट्रांत आहे, घरोघरीं आहे,-- पण पाहील त्याला.

काय विचार माझ्या मनांत आला कोण जाणे ! मी एकदम उठलें आणि मी चितारलेली पानं हातीं घेऊन पाहिलीं एकदां. तुम्ही म्हटलंत, "काय हो तें ?" तुमच्या तेथल्या अस्तित्वानें मी क्षणभर कातर झालें आणि लगेच तीं पानं तुमच्यापुढें टाकून म्हटलं, "दमून गेलें मी. माझीं नव्हत बरं ही कामं. पण तुम्हांला आपली सांगतें कीं, जीवनाची अद्भुतता सगळीकडेच आहे-पाहील आणि रेखाटील त्याला."

तुमच्या-माझ्या बोलण्यावरून ईर्ष्येनं पण केवळ माझीच करमणूक म्हणून लिहिलेली ती पानं ! तुम्ही तीं वाचलींत. सहजा सहजीं झालेली बोलणीं आणि त्यातूनच निर्माण झालेलं तें लिखाण प्रकाशांत आणण्याची तुम्ही धमकी दिली मला, तेव्हां अस्वस्थ झालं, मनांत विचार आला कीं, काय छापायचं त्यांत? माझी लेखणी पुरी पडेल त्याला ? आणि समाधान तरी कसं व्हायचं कुणाचं त्यानं ? सारीं पांढरपेशांची घरं एकाच वळणानं चाललीं आहेत असं वाटतं का ? मला खरंच वाटत नाही. वर-वर प्रशांत दिसणाऱ्या जलाशयांत लहान-लहान माशांच्या मुक्या विलोल हालचाली असतातच नाहीं का? जवळ जाऊन पाहा म्हणजे त्या मुकेपणाला वाचा फोडावी असं वाटल्याशिवाय राहत नाहीं. आपल्या जीवनांत वाटतो किंवा भासतो तितका एकसूर एकरंग नाहीं. मनुष्य आहे, मन आहे, तिथं संकेतांखालीं दबलेल्या जीवनांत सुद्धां निरनिराळ्या तऱ्हेचं श्वसन ऐकूं येतं.

मला वाटतं दिवाळींतलीं, पोटांत दारू घेऊन केव्हांहि भडकायला तयार असलेलीं फटाका, चंद्रज्योत, भुईनळा वगैरे असतात ना ? तशीच प्रत्येक घरांतील एक-एक व्यक्ति असते. प्रश्न एवढाच कीं, सरदलेली दारू पेटायला वेळ लागेल. कोरडी दारू तेव्हांच भडकेल. पण सगळ्यांत वैचित्र्य आहे, सगळ्यात जीव आहे. आपण काय करावयाचं ? त्यांचंच वैचित्र्यानं जळणारं जीवन पाह्यचं. फटाके, भुईनळे, चंद्रज्योती कुणी केल्या हें पाहण्यांत शक्तिसर्वस्व खर्च कशाला करायचं ?

'सत्य' म्हणून वाटेल ते 'उघडं' सत्य अभिजात वाङ्मयात चिताडायचं नाहीं हें खरं आहे. पण वाङ्मयापुरताच सोंवळेपणा पाहू जाणाऱ्या कांही कांही लोकांच्या स्वतःच्या कृती--आचरण किती तरी ओंगळ असतं नाही ?

अनुक्रमणिका

'कळ्यांच्या निःश्वासां'त न पाहिलेले, ऐकलेले असे कितीक निःश्वास ह्या अभिजाततेच्या पुरस्कर्त्यांपैकींच कांहींनी कित्येक जीवांना सोडायला लावले असतील !

आतांपर्यंत मी आपलं कांही-बाहीं वाङ्मय वाचीत आलें, तेव्हां-तेव्हां मला चुकल्या-चुकल्यासारखं होई. असं वाटे कीं, वाङमयात पात्रं कशीं रेखाटायची ह्यांचे जणूं संकेत ठरवलेले आहेत. तुम्हाला नाहीं का वाटत कीं, आपल्या नायक-नायिका आणि खलपुरुष इत्यादिकांनी बनलेल्या आपल्या वाङ्मयाच्या जगांत दोनच तऱ्हा प्रामुख्यानं दिसतात. देव नाहीं तर दानव. मानव नाहीच कुठं. मानवासाठी देवांची किंवा दानवांची चित्रं रेखाटली तर मानवाला ममत्वानं तिकडे पाहण्याची कशी इच्छा होईल ? तशी न झाल्यास वाङ्मयाचा हेतु तरी कसा साध्य होईल ?

मानवाच्या मनांत चाललेलीं बरीं-वाईट आंदोलनं वर्णन करणं गैर होईल काय ? अंतरंगाचे उमाळे क्षणभर अस्वस्थ करीत असले तरी त्यांचं अस्तित्व अमान्य करून कसं चालेल ? पृथ्वीच्या अंतरंगांतून शीतल निर्झर वाहतात, उष्णोदकाची उन्हाळींहि वाहतात. उष्ण जरी उदक असलं तरीं कधी न हटणारे रोग सुद्धां त्यानं जातात.

यथातथ्य रीतीनं वर्णन करणं हे काम कठिण तर खरंच; पण मला वाटतं सहानुभवानं वर्णन करणं हे सर्वात कठिण आहे, नाहीं ? देवांची अगर दानवांची वर्णनं नको असून मानवांची हवी असल्यास, ती करायलासुद्धां सहानुभवानं पाहण्याची ताकद पाहिजे. निरपेक्ष निःपक्षपाती भूमिकेवर जाऊन प्रत्येक मनुष्याची अंतरंगाची गूढं उकलवून दाखवलीं व तींहि सहानुभवानं उकललीं तर कुणालाच पक्षपात होण्याचा संभव नाहीं. पतिताचं चरित्र सहानुभूतीनं रेखाटणं म्हणजे पतनाला उत्तेजन देणं नसून त्याला निःपक्षपातानं वागवणं आहे असं नाहीं का ? पतित तर खराच, पण कां ? कोणत्या परिस्थितीमुळं झाला ? विचित्र परिस्थितीपुढं अशरण झाल्यानं पतित झालेल्या माणसाचं तसंच हुबेहुब चित्र काढलं तर पतनाकडे प्रवृत्ति झुकवणं नसून न्याय्य दृष्टीनं त्याच्याकडे पाहणं एवढाच अर्थ होईल नाही ? असंच मला वाङ्मय वाचतांना वाटे.

जें-जें ललित वाङ्मय आपण वाचतों त्याला कोणत्या ना कोणत्या

तंत्राच्या चौकटीत बसवलंच पाहिजे; तसं ते बसत नसेल तर तें कमअस्सल झालं असं मानावंसं मला वाटेना. निसर्ग नाही का ? निर्मितीच्या वेडानं फुलून गेलेला निसर्ग किती वैचित्र्यानं निर्मिति करीत असतो. एक झाड दुसऱ्या झाडासारखं नाही. एक माणूस दुसऱ्या माणसासारखं नाहीं. प्रत्येकांत वैचित्र्य. पण ती निसर्गाची हतबुद्ध करून टाकणारी निर्मितीची शक्ति जें-जें निर्माण करते तें तें हृदयहारी आणि मनोहरअसतंच नाहीं का ? त्या शक्तिचा बेबंद नाच ज्या-ज्या ठिकाणीं आपण पाहतों तिथ त्या भव्यतेनेंच आपण थक्क होतों. सगळीकडे अकृत्रिमता ! त्या निसर्गाच्या अकृत्रिम निर्मितीनं--मग ती निर्मिति अणुएवढी असो वा आकाशाएवढी असो--भारून जातों आपण. कां ? आपलं हें सारं कृत्रिम इवलं-इवलं जग नि त्याचे पडलेले काच विसरण्यासाठी.

निर्मितीचं वेड लागलेल्या लेखकानं तंत्राची कृत्रिमता कां जुमानायची ? प्रतिभेच्या तुफान आवेगापुढं तंत्राचे कृत्रिम बंध राहाणार तरी कसे ? सुंदरता-खिळवून धरणारी सुंदरता हवी असेल, स्तिमित करून ठेवणारं सत्य हवं असेल, तर कृत्रिमता फोडून प्रतिभेनं केलेलं नर्तनच हवं असं वाटायला लागतं. कादंबरी, नाटक, लघुकथा, दीर्घकथा, कहाणी, काव्य, नाट्यछटा--हे आणखी असलेच कांहीं प्रकार, त्यांची तंत्रं. सगळे अंतरंगाचे उमाळे त्याच तंत्राच्या चौकटीत बसलेच पाहिजेत का ?

निःपक्षपाताच्या भूमिकेवरून सहानुभूतिपूर्वक विशाल दृष्टीनं प्रतिभावान् लेखकानं चितारलेलीं चित्रं-तीं कां हृदयंगम वाटणार नाहींत ? पिचवून टाकणाऱ्या ह्या जगाचीं बंधनं क्षणभर स्वतःपासून गळून पडल्याचा आभास होऊन निर्व्याज आनंद लेखकाला व वाचकाला कां होणार नाहीं ? संकुचित दृष्टि एकदां नष्ट झाली कीं, तिथं लेखकाप्रमाणंच वाचकाचंहि अंतःकरण सहानुभूतीनं का उलून येणार नाहीं ?

विभावरी शिरूरकर
मुंबई

■■■

। 'बंधनाच्या पलिकडे' ।...............................

● पु. य., के. ना. काळे, वा. ना. देशपांडे

पहिलें जागतिक महायुद्ध आटोपल्यावर पश्चिमेकडील देशांतच काय पण भारतासारख्या पूर्वेकडील देशांतहि मानवसमाजाच्या भवितव्यासंबंधीचा विचार, अंतर्मुख होऊन, सुरू झाला होता. केलें काय, झालें काय, होत आहे काय व व्हावयाचें आहे काय ? - असे प्रश्न स्वतःच्या मनाला विचारून त्याची उत्तरें मिळविण्याच्या प्रयत्नांकडे विचारवंतांचा वर्ग वळला होता. जुन्या परंपरा, श्रद्धा, विचारसरणी आणि जीवनपद्धती ह्यांना हादरा बसून विचारी व्यक्तींची मने अस्वस्थ झालेंली होती. चुका कोणत्या घडल्या आणि त्या कां घडल्या ह्यांचे विचारमंथन सुरू होऊन जीवनासंबंधींच्या नवीन जाणिवा उद्भूत होऊं लागल्या होत्या. मानवी जीवनाचे उद्देश आणि त्यांनुसार आजवर चाललेले मानवाचे अंतर्बाह्य व्यापार ह्यांची कसून तपासणी सुरू झालेली होती. त्यांतून निघणारे निष्कर्ष, साहजिकच, मानवी मनाचा आणि अंतःकरणाचा आविष्कार ज्यांतून घडत असतो त्या वाङ्मयाच्या द्वारा उत्कटतेनें व्यक्त होऊं लागले होते. अर्थातच त्याचे परिणाम सुबुद्ध व शिक्षित समाजावर -विशेषतः सृजनशील साहित्यिक व कलावंत ह्यांच्या बौद्धिक व भावनिक जीवनावर -हळूहळू होऊं लागून त्यांची जीवनदृष्टि बदलूं लागणें स्वाभाविकच होतें.

एकोणिसशें वीसपासून, सर्वत्रच, एक नवा कालखंड सुरू झालेला दिसूं लागला. मानवी मन व त्यावरील संस्कार, मानवाचे आचार व व्यवहार, मानवानें स्वतःच निर्माण केलेले निषेध (ताबु) व निर्माण केलेलीं देवकें (टोटेम्स्), स्वतःच स्वतःसाठी तयार केलेले सामाजिक, धार्मिक व नैतिक नियम व त्याद्वारा घालून घेतलेली बंधने, ह्यांचा पुनर्विचार सुरू झाला. त्या सर्वांना भौतिक शास्त्रांच्या, विशेषतः समाजशास्त्राच प्रयोगाधारित अनुभवांच्या कसोटीला लावून पाहाण्याकडे व त्यांतून निघणाऱ्या निष्कर्षांचें चिंतन करण्याकडे बुद्धिमंतांची प्रवृत्ती अधिकाधिक वळूं लागली. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनांत वेळोवेळी, विशिष्ट

अनुक्रमणिका

परिस्थितीमुळें, जे अनेक प्रश्न उद्भवत असतात त्यांची शास्त्रशुद्ध छाननी करून ती आपल्या अभिप्रायासह समाजापुढें ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले. ही छाननी कित्येकदा अत्यंत प्रक्षोभक स्वरूपात प्रगट होई. आणि त्याचे साद-पडसाद केवळ खासगी किंवा सार्वजनिक बैठकांतच घुमून राहात नसत, तर ते ललितवाङमयांतहि घुमत. मराठी ललित वाङमयक्षेत्रात हे साद-पडसाद घुमविण्याचा पहिला प्रयत्न 'ज्ञानकोश' कार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांच्या १९२६-१९३० ह्या काळांत प्रसिद्ध झालेल्या 'गोंडवनातील प्रियंवदा', 'परागंदा', 'आशावादी' व 'ब्राह्मणकन्या' ह्या कादंबऱ्यांतून झाला. सामाजिक क्रिया-प्रतिक्रिया तपासून त्यांचें कादंबऱ्यांतून स्पष्ट कथन करण्याचा उपक्रम त्यांनीच सुरू केला. "समाजांत आज अस्तित्वांत काय आहे, त्यांतील उपयुक्त भाग किती, त्यांतील बोंचणारा भाग कोणता, ज्यांना समाज बोंचतो त्यांचे प्रश्न कोणते, अशी त्यांची पाहाण्याची सरणी होती...आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनीं अशिष्ट, अश्लील, चावट समजल्यामुळें चर्चेस न घेतले जाणारे विषय आणले आहेत. बोंचणारे प्रश्न दृष्टिआड करणें त्यांस रुचत नसे. कारण प्रश्न सोडविण्याचा तो मार्ग आहे असें त्यांना वाटत नसे. आडपडदा तर ते कसलाच मानीत नसत. कारण शास्त्रीय चर्चेस घेतलेले विषय अश्लील असे त्यांस कधींच वाटले नाहीत. वास्तवता हा शास्त्रीय चर्चेचा आत्मा, तेथें आडपडदा राखून खुली चर्चा शक्य नाहीं, हें ते जाणून होते. लेखनांत त्यांनी व्यक्ति, जाति, पंथ, धर्म, मत, कोणाचीच भीड मानली नाही." त्यांचे उदाहरण समोर असल्यानें, आपल्या मनांतील विचारांची व भावनांची खळबळ कांहींहि आडपडदा न ठेवता, कादंबरीच्या माध्यमाच्याद्वारा प्रगट करण्यास जे कांही थोडे मराठी लेखक त्यांच्या पाठोपाठ पुढें सरसावले त्यांपैकीं पुरुषोत्तम यशवंत देशपांडे हे एक होत. जीवनांतील घटनांचा ज्यांच्या मनावर मूलगामी परिणाम होऊन, आपल्याला आलेल्या अनुभवांचे स्वतंत्र दृष्टिकोणांतून मूल्यमापन करून त्यांचा मुक्तपणें आविष्कार करण्यास प्रवृत्त झालेल्या त्यावेळच्या नूतन लेखकांपैकीं ते एक. १९२७ साली त्यांनीं 'बंधनाच्या पलीकडे' ही आपली पहिली कादंबरी प्रसिद्ध केली. "एक उत्कट, आत्मनिष्ठ पण विचारशील व्यक्तिमन व ठराविक सामाजिक आदर्श ह्यांचा संघर्ष हा ह्या कादंबरीचा मूलस्रोत आहे. ह्या आघात-प्रत्याघाताच्या चित्रणाच्या दृष्टिनें ह्या

कादंबरीला विशेष महत्व आहे."

मतामतांचा गलबला सुरू असतां स्वतंत्र व तर्कशुद्ध विचारसरणीचा अंगीकार करून एखाद्या विषयासंबंधी आपले स्पष्टपणें विचार व्यक्त करणारे. देशपांडे ह्यांचे एक समकालीन तरुण लेखक के. नारायण काळे ह्यांनी पुण्यातील 'ज्ञानप्रकाश' ह्या पत्रांत 'बंधनाच्या पलीकडे' वर एक समीक्षणात्मक लेख प्रसिद्ध केला. तो वाचून, परंपरागत विचारसरणीच्या आहारी न जातां लेखकाचा मूळ हेतू नीट समजून घेऊन सहानुभूतिपूर्वक चर्चा करणाऱ्या ह्या लेखकाबद्दल साहजिकच देशपांडे ह्यांस आदर वाटला. व परस्परांत तदनंतर पत्रद्वारा विचारविनिमय सुरू झाला. ह्या दोघांनी परस्परास लिहिलेल्या पत्रांपैकीं कांहीं येथें दिलीं आहेत.

ह्या काळांतील तरुण पिढींचे वाचन कोणतें चाले, त्यांच्या मनांत कोणते विचार चालत, त्यांनी कोणत्या आशा-आकांक्षा बाळगलेल्या होत्या, त्यांच्या मनावर कोणते संस्कार घडत होते ह्याची कांहींशी कल्पना ह्या पत्रांवरून येईल.

१.

अमरावती : ६-११-१९२७

सा० न० वि० वि०

'ज्ञानप्रकाश' च्या २० ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झालेला आपला माझ्या पुस्तकावरील अभिप्राय आजच माझ्या वाचण्यांत आला. माझे मित्र रा० केशवराव भोळें ह्यांनी पत्रांतून आपला थोडासा परिचय पूर्वीच करून दिला आहे. पण आज माझ्या पुस्तकावरील आपला अभिप्राय वाचून मला आपली ओळख जितक्या स्पष्टपणें झाली तितकी पूर्वी कधींच झाली नव्हती असें मला वाटतें.

आपल्या अभिप्रायाविषयीं विस्तृत तऱ्हेनें लिहिण्याची कांहींच गरज नाही. "The fact of a new idea having come to one man is a sign that it is in the air..." आपल्या अभिप्रायानें ह्याची जितकी स्पष्ट जाणीव करून दिली तितकी आजवर प्रसिद्ध झालेल्या कुठल्याहि अभिप्रायानें मला करून दिली नाही, एवढें सांगितलें म्हणजे आपल्या अभिप्रायामुळें मला किती आनंद झाला असेल ह्याची आपल्यास कल्पना येईल.

अनुक्रमणिका

माझ्या पुस्तकांतील अनेक दोषांची मला पूर्ण जाणीव आहे. पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी ही जाणीव नव्हती असें नाहीं. पण सदोषता पूर्णपणें नाहींशी होईपर्यंत प्रसिद्धि थांबविली असती तर मला वाटतें पुस्तक बाहेर येण्यास बराच काळ लागला असता व कदाचित् तें प्रसिद्ध झालेंहि नसतें. निदान आतां आहे ह्या तीक्ष्ण स्वरूपात तरी तें प्रसिद्ध झालें असतें कीं नाहीं ह्याविषयी शंका आहे. निर्जीवपणापेक्षां व निःसत्वपणापेक्षां सदोषता बरी असें मला वाटते.

आपण कांहीं कांहीं दोष इतक्या मार्मिकपणें दाखविले आहेत कीं, त्याबद्दल आपलें सकौतुक अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाहीं. विशेषतः मरणोन्मुख आईच्या मुखांतून प्रभाकराच्या तत्त्वांचा पुरस्कार केल्यासंबंधी आपण जे उद्गार काढले आहेत ते मला फारच पटले. इतकें मार्मिक, सहृदय व वस्तुस्थितीचा यत्किंचित्हि विपर्यास न करणारें परीक्षण लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें.

श्री० केशवराव भोळे ह्यांनी माझी कादंबरी Screen करण्यासंबंधीची आपली कल्पना मला बरेच दिवसांपूर्वी कळविली, पण त्यानंतर त्यासंबंधी कांहीच कळलें नाहीं.

आपल्या परीक्षणाबद्दल पुनः एकवार आपले आभार मानून हें पत्र संपवितों.

आपला
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

२.
मुंबई : २१-१२-२७
कृ.सा.न.वि.वि.

आपल्या तारीख १७ डिसेंबरच्या कार्डात आपण येऊं शकत नाहीं हें वाचून फार निराशा झाली.

माझ्या मागील कार्डांत आपण Anatole France चा जो मीं उल्लेख केला आहे, तो निर्देश आपण विपरीत अर्थानें घेतला नसेल अशी मला आशा वाटते. आपल्या वाचनक्षेत्रावर कोणत्याहि रीतीनें अधिक्षेप करण्याचा त्यांत माझा

अनुक्रमणिका

उद्देश नसून, मला ग्रंथकार फार आवडला, मीं त्याची आपणाला शिफारस केली, आणि त्याच्या दोन चांगल्या ग्रंथांचीं नांवें कळविलीं एवढेंच. ह्या पलीकडे दुसरा कोणताहि उद्देश नाहीं.

कित्येक वेळां सहजासहजीं बोलतां बोलतां, कांहीं मंडळीबरोबर येथें मला आपल्या कादंबरीसंबंधाने बोलण्याचा प्रसंग येतो. ती मंडळी कोणत्याही पुस्तकावर मत देतांना जें एक प्रकारचें विशिष्ट attitude दाखवीत असतात तें पाहून तर मला कित्येक वेळां हंसूंच येतें. आपल्यांतल्या कित्येक रसिक आणि समंजस समजल्या जाणाऱ्या माणसांना देखील, एखाद्या पुस्तकांतील मध्यवर्ती कल्पना कोणती आणि तिच्या परिपोषासाठीं उत्पन्न केलेली 'परिस्थिती' कोणती, ही साधी गोष्टहि ठरवितां येत नाहीं; असा मला त्यांच्या बोलण्यावरून व लिहिण्यावरून संशय येऊं लागला आहे. परवांच्या दिवशीं असे एक गृहस्थ माझ्याशीं आपल्या पुस्तकासंबंधाने बोलत असतांना त्यांनी, "वेश्यांच्या पोरींशी लग्न लावणें, आई-बापांचा अपमान करून, त्यांची अवज्ञा करून त्यांचा मनोभंग करणें, आणि अनियंत्रित स्वैराचाराला उत्तेजन देणें' ह्यापलीकडे काय असें मोठें तत्व ह्या कादंबरीत गोवलें आहे हो ?" असा मला सवाल केला. त्यावर मी त्यांना, "आपण ही कादंबरी वाचली तरी आहे का पण ?" असा प्रश्न केला असतां त्यांनी 'हो!' असें उत्तर दिलें; परंतु ज्यावेळी मी त्यांना, त्यांनी निर्दिष्ट केलेल्या गोष्टी, ह्या प्रस्तुत कादंबरींतील प्रधान उद्दिष्ट नसून, ती केवळ नुसती 'परिस्थिती' कशी आहे, आणि "प्रत्येक मनुष्यमात्रानें आपलें व्यक्तित्व आणि वैशिष्ट्य राखण्याचें ध्येय स्वतःपुढे ठेवले पाहिजे;" हें बीजभूत तत्व ह्या विशिष्ट 'परिस्थितीं'तून पुरस्कृत करण्याचा आपला कसा सुसंगत प्रयत्न आहे, इ० गोष्टी साधार दाखवूं लागलों त्यावेळीं मात्र तो गृहस्थ गोंधळून जाऊन, त्याला कबूल करणें भाग पडलें कीं, "खरेंच हें नाहीं बुवा आपल्या लक्षांत आलें !" अशा प्रकारें जिथें मुख्यच गोष्ट त्यांच्या ध्यानांत येत नाहीं; त्या ठिकाणीं 'एखादें पुस्तक वाचणें' ह्या शब्दांचा हे लोक काय अर्थ समजतात तें त्यांचे त्यांनाच माहीत.

दुसरा एक असाच मुद्दा आणखी एका गृहस्थाशीं बोलतांना उपस्थित झाला होता; आणि तो म्हणजे उसनवारीसंबंधाचा ! आपल्या कादंबरींतील एका उत्कृष्ट प्रसंगाचें Thomas Hardy च्या 'Jude, The Oscure' ह्या कादंबरींतील

एका विशिष्ट प्रसंगाशीं फार साम्य आहे. तिच्यांतील नायिका तुरुंगांतून पळून आल्यानंतर आपल्या प्रियकराच्या खोलींत पावसा-वादळातून येते, त्या प्रसंगाची घटना; आणि आपल्या मैनेचें प्रभाकराकडे भर पावसांतून जाणें, आणि तेथील त्या दोघांचे भाषण व वर्तन ह्यांच्यामध्यें बराच सारखेपणा आहे. हें साम्य पूर्वी माझ्या ध्यानांत आलें असूनहि मीं त्याचा माझ्या परीक्षणांत उल्लेख केला नव्हता, कारण एकतर अशा उल्लेखानें उथळ वाचकांची दिशाभूल होऊन, त्यांच्या मनावर पुस्तकाबद्दल अनिष्ट परिणाम होतो; दुसरी गोष्ट म्हणजे, तो प्रसंग आपण तेथूनच घेतला असेल, आणि स्वतंत्रपणे आपणाला सुचणें असंभवनीय आहे, असें मला वाटत नाहीं; आणि तिसरें असें कीं, अशा तऱ्हेनें, एखादा प्रसंग, भावना किंवा विचारसरणी आत्मसात् करून तिचा उपयोग योग्य ठिकाणीं करणें हें मी गर्ह्यतर समजत नाहींच, उलट प्रशंसनीय आणि अभिनंदनीय मात्र समजतों. अशा तऱ्हेचें ascimilation जर उसनवारी ठरत असेल तर Shakespeare चें शहाणपण आणि आणि श्रेष्ठत्व तें कुठें उरलें ? आणि Milton चा मोठेपणा तो काय राहिला ? "व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्" म्हणजे साराच न्याय संपला. मनुष्यानें वाचनाचा आणि अनुभवाचा जर उपयोग करावयाचा नसेल तर पुस्तकांचा उपयोग तो काय राहिला ? ललित वाङमयांत देखील, मोठेपणाचीं खरीं बीजें केवळ Technique, style, subject matter, plot, incident ह्यांच्यामध्ये नसून अत्यंत महत्वाचे मुद्दे, लेखकाची Philosophy आणि आयुष्याबद्दलचा त्याचा outlook, हे आहेत; ही गोष्ट आमच्या वाचकांना व लेखकांना पटेल तो सुदिन !

इब्सेनची सर्व कला, मी मागें सांगितलेल्या 'परिस्थिती' उत्पन्न करण्याच्या त्याच्या पद्धतींत सांठविली आहे असें मला वाटतें. शेक्सपीअर ज्या लोकांच्या विरुद्ध असतो, त्यांची बाजू पुढें मांडीत असतांना, वाचकांपुढें त्या भूमिकांचे तो सदोष आणि विकृत व्यक्तीकरण आणि स्वभावाविष्करण करतो. त्यांची, ऑथेल्लो, मॅकबेथ, रिचर्ड, आयागो इत्यादि पात्रें स्वभावतःच आणि कित्येक वेळां तर त्यांच्यामध्यें शारीरिक व्यंगे दाखवून दिल्यामुळें, प्रेक्षकांपुढें अशा स्वरूपात येतात की, त्यांच्याबद्दल वाचकां-प्रेक्षकांच्या मनांत स्वाभाविकच तिटकारा उत्पन्न व्हावा ! आणि त्या पात्रांच्या प्रत्यक्ष कृतीपेक्षां नाटककाराचा हा पक्षपातच,

त्यांच्या प्रतिपक्षियांबद्दल वाचकां-प्रेक्षकांच्या अंतःकरणांत सहानुभूति उत्पन्न करण्याला अधिक कारणीभूत व्हावा. इब्सेनची पद्धति मात्र ह्यापेक्षां साफ निराळी आहे. तो जी परिस्थिती निर्माण करतो तिची रचनाच अशी असते कीं, तो प्रसंग अगदीं बिनतोड राहून, ग्रंथकर्त्यानें घडवून आणलेल्या परिणामाखेरीज दुसरा परिणाम त्या परिस्थितींत संभवनीयच राहत नाहीं. 'Doll's House मधील Helmar, आपल्या सामान्य व्यवहारांत अगदीं चांगल्या माणसांत देखील एक आदर्शभूत असा सज्जन आणि धीरोदात्त नायक होण्याला योग्य म्हणून गणला जाईल ! एखाद्या पुरुषार्थविहिन, मूर्ख, व्यसनी, दुष्ट आणि श्रीमंत नवऱ्याला सोडून जाण्याचा प्रसंग Nora वर आला आहें, असें जर इब्सेननें दाखविलें असतें तर तें त्याचें नाटक वैयक्तिक स्वरूपाचें होऊन, सबंध यूरोपमध्ये 'Doll's House'नें जी खळबळ उडविली ती केव्हांच उडाली नसती ! तशा तऱ्हेचीं नाटकें पूर्वी होतीं, परंतु त्यामध्यें घेतलेली परिस्थिति हलकी असल्यामुळें रंगभूमीवर प्रेक्षकांचे मनरंजन करण्यापलीकडे त्यांचा काहींच परिणाम होत नव्हता. हा मार्ग सोडून, इब्सेननें ज्यावेळी समाजामध्ये ideal समजलें जाणारें जोडपें घेऊन त्यांच्यामधील संबंधहि कसे कृत्रिम आणि व्यक्ति-वैशिष्ट्याचा विध्वंस करणारे आहेत, हें दाखविलें तेव्हां मात्र सारें यूरोप खडबडून जागें झालें. इब्सेनची ही बिनतोड परिस्थिती उत्पन्न करण्याची हातोटी मला फार आवडते; आणि त्याच पद्धतीचा नवविचारांचा पुरस्कार करणाऱ्यांनी अंगिकार केला पाहिजे असें मला वाटतें. लहान गोष्टींची मोठ्या गोष्टींशी तुलना करण्याचे धाडस करावयाचें मनांत आणलें तर असें म्हणतां येईल कीं, गडकऱ्यांनी आपलीं प्रागतिक मतें 'गीते'च्या व इतर विनोदी पात्रांच्या तोंडीं घालून आपलीं मुख्य पात्रें मात्र, सिंधु, मालती-सुशीलासारखी नेभळी निर्माण केलीं आणि स्वतःच्या प्रागतिक कृतींना लोकप्रियता संपादन केली; तसले प्रकार इब्सेनच्या पूर्वी होते; परंतु निर्घृण तर्कानें परिस्थितीची छाननी करून सत्यान्वेषण करण्याची हिंमत मात्र कोणाचीच नव्हती. शेक्सपीअर आणि इब्सेन ह्यांच्यापैकीं मला अधिक कोण आवडतो ह्या प्रश्नाचें उत्तर ह्या विवेचनांत स्पष्टच झालें आहे, परंतु शेक्सपिअरपेक्षांच केवळ नव्हे तर जगांतील आजवर झालेल्या कोणत्याहि नाटककारापेक्षांहि इब्सेन श्रेष्ठ आहे, हें एका युरोपिअन टीकाकारांचे मत मला अक्षरशः मान्य आहे. शेक्सपीअर आणि इब्सेन

ह्यांमधील इब्सेनची Technical superiority जरी सोडून दिली तरीहि, इब्सेन शेक्सपीअरपेक्षां कितीतरी मोठा राहतो, हें इब्सेनचीं शेक्सपीरीअन पद्धतीवर लिहिलेलीं 'Vikings' आणि 'Pretenders' ही दोन नाटकें वाचलीं असतां सहज कळून येतें; मग त्याच्या स्वतःच्या Technique मध्यें लिहिलेल्या 'Doll's House', 'Hedda Gabler', 'The Wild Duck,' 'Enemy of the perple,' 'Rosmer,' 'Ghosts,' 'Pillars of Society' इत्यादि सामाजिक नाटकांविषयीं तर विचारच करावयाला नको. कालीदासाला शेक्सपीअरच्या बरोबरीचा ठरविण्यात जो मूर्खपणा आपलें पंडित प्रदर्शित करीत असतात, तोच मूर्खपणा, शेक्सपीअरला इब्सेन किंवा टॉलस्टॉय ह्यांच्याहून श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न करीत असतांना इंग्रज टीकाकार करीत असतात; परंतु हा अभिमान कितीहि राष्ट्रीय स्वरूपाचा असला तरी साहित्यक्षेत्रात तो व्यर्थ आहे. Dowden नें शेक्सपीअरच्या 'Mind and Art' वर कितीहि भाष्यें केलीं, Bradley नें त्याच्या Tragedies वर कितीहि उसना चांगूलपणा लादण्याचा प्रयत्न केला, Quiller Couche नें त्याच्या craftsmanship-वर कितीहि वेगवेगळ्या दृष्टिकोणांनी प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला, आणि Raleigh नें आपली सुंदर भाषा त्याच्या वतीनें कितीहि शिणविली तरी कोणत्याहि प्रकारें पूर्वग्रहदूषित नसलेला वाचक तुलनात्मक दृष्टीनें वाचावयाला लागल्यानंतर spade ला spade म्हटल्यावांचून कां म्हणून राहील ? असो. ह्या विषयावर बहुधा आपलें ऐकमत्य असण्याचा संभव आहे, तेव्हां आपणाला माहीत असलेल्या गोष्टीच आपणांला पढवीत सुटण्यांत कांही अर्थ नाहीं. अर्थात् ही जाणीव ह्यापेक्षा थोडी अगोदर आली असती तर बरें झालें असतें; कारण मग आपणाला इतकें लांबलचक चऱ्हाट वाचावें लागलें नसतें. नित्यक्रमाला सोडून ह्या वेळीं मी बरेंच मोठे पत्र लिहिलें आहे; आपणाकडूनहि त्याला सविस्तर उत्तर येईल अशी अपेक्षा आहे. क.लो.अ.ही.वि.

आपला

के.ना.काळे

पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ह्यांची 'बंधनाच्या पलीकडे' ही कादंबरी प्रसिद्ध

झाल्यावर, त्यांच्याच विदर्भ प्रांतांतील समतोल वृत्तीचे एक समकालीन तरुण चिकित्सक समीक्षक वामन नारायण देशपांडे ह्यांनी, तिजविषयीं आपल्या मनावर कोणती प्रतिक्रिया झाली ह्यासंबंधी आपले स्नेही ह. वि. मोटे ह्यांस खालील पत्रांतून कळविले आहे. ह्या पत्रांत व्यक्त झालेला एक विशिष्ट वेगळा दृष्टिकोण लक्षांत घेण्यासारखा आहे.

३.

यवतमाळ : ७-१-१९२७

सप्रेम नमस्कार वि.वि.

रा.देशपांडे पी.वायू. ह्यांचें पुस्तक सोबत परत करीत आहें. आपणाकडून तें अनाहूत रीतीनें आलें ह्याबद्दल पुन्हां एकदां आपले आभार मानतों. पुस्तक पोंचल्याचे कळवावे.

ह्यासंबंधी मी सविस्तर लिहावें अशी आपण इच्छा दर्शविली, म्हणून तसें करीत आहें.

ह्या पुस्तकाला जसें कादंबरी म्हणायचें, तसे आत्मचरित्रहि म्हणता येईल. प्रो.भाट्यांचें 'प्रेम कीं लौकिक' आहे ना ? तसलें हेंहि पुस्तक आहे. अशा तऱ्हेचें पुस्तक लिहिणें हें कलेच्या दृष्टीनें, तसेंच शिष्टाचाराच्या दृष्टीनेंहि गर्ह्य आहे. प्रस्तुत पुस्तकांत प्रभाकर म्हणजे जंगी हुतात्मा दाखविला आहे. अर्थात् ही एकांगी बाजू आहे. ह्याच कथानकावर सत्यसृष्टींतल्या 'गोविंदराव देशमुखांनी' कादंबरी लिहिली, तर ती निराळीच होईल.

ह्या पुस्तकाकडे का बरी ह्या दृष्टीनें पाहिलें, तर तें मोठेंसें चांगलें वाटत नाही. कथानकाची जुळणी व एकंदर मांडणीहि सदोष नाहीं हें खरें, पण त्याचे श्रेय पी.वायू.च्या प्रतिमेकडे जात नाहीं. स्वतःच्या आयुष्यांत घडलेल्या गोष्टी, त्या थोड्या नटवूनसजवून सुसंगत मांडायला फारसें कौशल्य लागत नाहीं. सबंध कादंबरींत 'मैनेची करुणकहाणी' हें एकच नवलपूर्ण प्रकरण आहे. जाहिरातीवरून ही प्रचंड 'क्रांतिकारक' कादंबरी असावीसें वाटलें. पण उठल्याबसल्या अश्रु ढाळणारा प्रभाकर 'कित्ती कित्ती चांगला व प्रेमळ' वाटला, तरी तो सामाजिक क्रांति करायला खरोखरच नालायक वाटतो. भाषा बऱ्यापैकी असली, तरी अगदी

मिळमिळीत आहे. बापाला पशु म्हणणें किंवा ४९१ कलमाखालीं त्याला नोटीस देणें आणि मैनेसारख्या 'वेश्ये'शीं विवाह करणें ह्या गोष्टीवरून प्रभाकराच्या 'नीतिधैर्या'ची चुणूक दिसली, तरी पण एकंदरीनें त्याचा हा वृत्तांत वाचून वाचकाच्या मनांत क्रांतिकारक असे कोणतेच विचार थैमान घालीत नाहींत. वेश्यासुधारणेचा प्रश्न ह्यापूर्वीच हडपांनी 'निवळलेल्या तरुणीं'त अश्लीलतेनें कां होईना, पण जास्त परिणामकारक रीतीने सोडविण्याचा यत्न केला आहे. ह्या बाबीपुरता हडपांचा जयंत प्रभाकरापेक्षां धीरगंभीर दिसतो. आईबापाविरुद्ध बंड पुकारण्याची गोष्ट मात्र पी.वाय्.नीं जरा अधिक ठसठशीतपणें मांडली आहे खरी ! सत्यसृष्टींतल्या 'शांती'च्या बापाशी स्वतः तिनें व सत्यसृष्टींतल्या अरुणकुमारानें खुशाल झगडा करावा. आमची त्याला 'फुल परमिशन' आहे. कारण असे हटेल बाप लकडीशिवाय वळायचे नाहींत ! पण अशा तऱ्हेची दांडगाई करण्याचा उपदेश सरसकट करणें योग्य आहे का, हा प्रश्न आहे. व्यक्तिविकास, सामाजिक स्वातंत्र्य, मनःस्वातंत्र्य ह्यांना मी योग्य महत्व अवश्य देतों. समाजशास्त्राचें व्यक्तिविकास हें ध्येय आहे, ही गोष्ट मलाहि मान्य आहे. पण व्यक्तिविकास झाला, तरी तो समाजस्वास्थ्य बिघडविणार नाहीं, अशी खबरदारी घ्यायला हवी. ह्या "प्रभाकरा'लाच माझा प्रश्न आहे कीं, "बाबारे, तूं आज व्यक्तिस्वातंत्र्याच्या गप्पा मारतो आहेस, पण उद्या तुझ्यासारख्या सुविद्य व सुसंपन्न माणसाच्या मुलीनें एखाद्या मनपसंत पण दरिद्री अकरमाशाशी सलगी केली तर ती तुला आवडेल का ? किंवा एखाद्या गुंड ड्रायव्हराच्या ती नादीं लागली, तर तूं तिचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करशील का ?" -अशीं, उदाहरणें घडत नाहींत असें नाही. युरोपच्या आधुनिक इतिहासांत कांही सधवा राण्या आपल्या मोटारड्रायव्हरबरोबर फरारी झाल्याचीं उदाहरणें आहेत. केवळ जातिभेदासारख्या परंपरागत दुष्ट रूढींमुळे प्रेमसंबंधांत व्यत्यय येत असल्यास मग मात्र आईबापाविरुद्धहि उघड बंड करावे. कारण जातिभेदाचा नायनाट व प्रेमविवाह ह्या गोष्टी अमलांत आणणें हें तरुण पिढीचें आद्य कर्तव्य आहे. परंतु जातिभेद नष्ट झाल्यानें प्रेमसंबंधाला कोणताहि व्यत्यय येणार नाहीं, असें मात्र नाहीं. यूरोपियनांत जातिभेद नाहीं, म्हणून आईबापाशीं मुलांमुलींचे 'प्रेमाखातर' झगडे होत नाहीत, असें थोडेंच आहे? कांही महिन्यापूर्वी एका अमेरिकन मिलओनरची

मुलगी एका अक्षरशत्रु फ्ल्यूट वाजविणाऱ्या तरुण शेपर्डवर भाळली होती; पण तिंच्या बापानें ह्या संबंधाला हरकत घेतल्यामुळें त्या मुलीनें जीव दिल्याचें वृत्तपत्रांत छापलें होतें. तेव्हां हे प्रकार कायमचे राहणार. म्हणून मुलांमुलींनी व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखालीं जन्मदात्यांशी वैर करावें, ही गोष्ट निदान मला तरी पटत नाहीं. शिवाय "पशु' असले तरी ते आपलेच आईबाप आहेत, हें लक्षांत घ्यायला नको काय ?

प्रस्तुत पुस्तकावरून प्रभाकर बंधनांचा शत्रु दिसतो. पण वैवाहिक बंधनांच्या विरुद्ध तो बोलत नाही, हें कसें ? का त्याला विवाहसंस्था मान्य आहे ? शेली विवाहसंस्थेच्या विरुद्ध होता, म्हणूनच तो प्रभाकराला ब्राउनिंगपेक्षां कमी आवडतो, असें समजायचें काय ? का त्याला सध्याचें biological selection माहीत नाहीं ? असल्यास त्याला त्याच्या मैनेनें कदाचित् डायव्होर्स मागितला (स्वतः मी डायव्होर्सचा पुरस्कर्ता आहें) तर तो देईल काय ? किंवा तिनें वरील selection च्या तत्वास सक्रिय पाठिंबा देण्याचें ठरविल्यास तें त्याला आवडेल का ? आणि १६ व्या पृष्ठावर आपल्या आईबहिणीसमक्ष आपल्या बापाला "तुम्ही आहार-निद्रा-भय-मैथुन करणारे पशु आहां," असें म्हणणाऱ्या प्रभाकराला तरी, हे प्रश्न सभ्यतेस सोडून आहेत, असें म्हणायचा हक्क नाही ! आतां आपण विवाहसंस्थेला अनुकूल आहों, असें म्हणायला प्रभाकराला काहींच हरकत नाहीं. कारण 'Positive Philosophy' वाला समाजशास्त्राचा जनक फ्रेंच पंडित कोंत (Comte) ह्यानें विवाहसंस्थेची तरफदारी केली आहे. कोंतचा आधार असल्यावर मग काय पाहिजे ? आपल्या मतांना कोणत्या ना कोणत्या यूरोपियन धेंडाचा टेकू दिला कीं झालें ! मग त्यांत परस्परविसंगतता असली, तरी असेना का परती ?

प्रभाकरानें तत्वज्ञानाचा अन् पावित्र्याचा खूपच आव आणला आहे. शुद्ध पतिपत्नीप्रेम नसतें, असें म्हणण्याचें पातक मी करीत नाही. पण तें देहधर्मनिरपेक्ष नसतें, ह्यांत मला तरी शंका नाहीं. प्रो० भाट्यांचा बाळासाहेब तत्वज्ञानाचा प्रोफेसर असून तोहि असेंच म्हणतो. (तत्वज्ञानांत मानसशास्त्र आलेंच.) आणि प्रभाकरानें कॉलेजात फिलॉसफी घेतली, तरी मानसशास्त्रावरील व्यासंगात बाळासाहेब श्रेष्ठ का प्रभाकर श्रेष्ठ, हें कुणीहि सांगू शकेल. आतां,

स्त्रीपुरुषप्रेम हें जर देहधर्मनिरपेक्ष नाहीं, तर तें चंचल असू शकणारच नाहीं असें म्हणणें वेडेपणाचें होईल. अर्थात् जगांत ब्राउनिंगासारखा स्थिर प्रेमाचा एखादाच; शेलेच जास्त, हें उघड आहे. मग प्रभाकर व मैना ह्यांना आपलें मन कधी परस्परांना सोडून अन्यत्र गेलें नाहीं, असें छातीला हात लावून सांगता येईल का ? किंवा ते पुढेंहि जाणार नाहीं, अशी प्रामाणिक ग्वाही देतां येईल का ? मग हा पावित्र्याचा अन् तत्वज्ञानाचा बकवा कशाला ? मात्र ह्यावरून जगांत असें आदर्शभूत दांपत्य झालें नाहीं, किंवा होणार नाहीं, असें मी म्हणतों, असें समजू नये. माझ्या म्हणण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, अशा व्यक्ती पृथ्वीच्या पाठीवर फारच थोड्या जन्मास येतात. सीता-रामाची जोडी अत्यंत दुर्मिळ.

प्रभाकराचे तत्वज्ञान मला तरी समजत नाहीं. मैनेंच्या ठायी तो विश्वाचें प्रतिबिंब (?) पाहणार ? ह्याचा अर्थ काय, हें प्रभाकर जाणे कीं, ज्याच्यापासून त्यानें ही कल्पना उचलली, तो टागोर जाणे ! 'विश्व-विश्व' म्हणून प्रभाकर जें वारंवार म्हणतो, त्या विश्वाची व्याख्या तरी काय ? शिवाय टागोराचे विश्व ईश्वराला सोडून नाहीं. मग ईश्वर न मानणाऱ्या प्रभाकराच्या विश्वांत व टागोराच्या विश्वांत भेद काय ? २५९ पानावर ब्रह्म, ईश्वर ही निव्वळ कल्पना असल्याचें मैना स्वच्छच सांगते. तत्वज्ञानी नवऱ्याच्या सहवासाचा हा परिणाम म्हणावयाचा ! स्पेन्सर ईश्वराला unknown and unknowable म्हणतो, तर आपणहि तसेंच म्हणायचें, ही मनःप्रवृत्ति ! स्पेन्सर खोटा असें मी म्हणत नाहीं, त्याचप्रमाणें ईश्वर आहे असें म्हणायचाहि माझा अधिकार नाही. माझें म्हणणें इतकेंच कीं, भारतीय तत्ववेत्ते 'गाढव', व त्यांचे ग्रंथ जाळून टाकण्यालायक असले, तरी स्पेन्सरच्या तोडीचा किंबहुना त्याच्याहिपेक्षां श्रेष्ठ मानण्यांत येणारा जर्मन तत्वज्ञ कँट हा Stars above and Conscience within, हें पाहिल्यावर तरी, त्यांच्या मागें कांहींतरी शाश्वत द्रव्य आहे ह्यांत शंका नाहीं, असें म्हणत असे, त्याचा तरी विचार करायचा असता ? कां कॅन्टहि भारतीय तत्वज्ञांसारखा 'गाढव' समजायचा ?

तात्पर्य, पी.वाय्. ह्यांनी ह्या पुस्तकांत हे मतभेदक्षम मुद्दे व्यर्थ दडपले आहेत. ते टाळूनहि त्यांना कादंबरी मनोरंजक करतां आली असती. मुख्य हेतु काय, तर प्रेमविवाहाचे मंडन. आणि त्याबद्दल कोणत्याहि प्रामाणिक माणसाचा

अनुक्रमणिका

मतभेद होईलसें वाटत नाही. पण हा हेतु प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी तत्वज्ञानाचें अगडबंब प्रदर्शन करायला नको होतें. घरातून चार पावलांवरच्या पानवाल्याच्या दुकानावर मोटारींतून बसून जाण्यासारखेंच हें हास्यास्पद आहे ! तत्वज्ञान हें नेहमी त्यागात्मकच असतें; त्याचा उपयोग प्रेमविवाहासारखे प्रश्न सोडविण्याकडे करण्यांत अर्थ नाही. इकडे तात्विक गप्पा झोंकावयाच्या व तिकडे विवाह लावण्याची तयारी करावयाची, हें टागोरशाही फॅशनेबल साधुत्व होय ! कफनी तंर घालावयाची; पण उत्तम सिल्कची व कलाबतु कांठ लावलेली घालावयाची ! म्हणजे केळकरांच्या शब्दांत सांगावयाचें तर 'बोलणें त्यागाचें पण करणें भोगाचे' असें वागणारा टागोरासारखा फॅशनेबल साधु काय कामाचा ? साधु म्हटला कीं, गांधीसारखा लंगोटी लावणारा फकीर पाहिजे ! तसेंच तत्वज्ञानाचें आहे. प्रेमविवाह प्रतिपादायचा आहे, तर स्वच्छ सरळ सांगा की आम्ही नित्शेसारखे भोगलोलुप आहो; म्हणून आम्हाला जिच्यावर आमचें प्रेम आहे, तीच बायको पाहिजे आहे, असें सीधें सांगा. उगाच तत्वज्ञानाचा द्राविडी प्राणायाम करूं नका. माझी अशी कंल्पना आहे की, हिंदी समाजाला कार्यप्रवृत्त, उद्यमशील करायचें असेल, तर त्यांच्यात उघडउघड भोगलालसा उत्पन्न केली पाहिजे. कर्म करायला सांगा, पण तें सकाम कर्म सांगा-निष्काम कर्म नको. असा छातीठोक व आमिष दाखविणारा उपदेश केल्यावाचून आमचे लोक जागे होणार नाहींत. आपला समाज धड स्वार्थी नाहीं, धड परमार्थी नाहीं. आणि त्याला अजुनहि परमार्थ सांगणे म्हणजे आत्महत्या करायला सांगण्यासारखेंच आहे. अर्थात् जेणेंकरून तो स्वार्थी बनेल, असाच त्याला सरळ व स्पष्ट उपदेश केला पाहिजे. एकदां तो स्वार्थी बनून, इतर पाश्चात्य समाजाच्या बरोबरीचा झाला कीं, त्याला वाटल्यास परमार्थाचे घुटक्यावर घुटके पाजावे !

असो. ह्याप्रमाणें ह्या पुस्तकावर मला जे विचार सुचले, ते कसेतरी मांडले आहेत. पी.वाय्. ह्यांच्याशी कांहीं बाबतींत मतैक्य झालें नाहीं, तरी जातिभेद नाहींसा करणें, प्रेमविवाहाला उत्तेजन देणें, समाजांतील दुष्ट रुढी, अंधश्रद्धा, व भलत्या समजुती शक्य तर गोडीनें पण अशक्य तेथें बंड करूनहि नाहींशा करणें, स्त्रियांची जी भयंकर हीन स्थिती झाली आहे ती दूर करणें, इत्यादि अत्यंत महत्वाच्या सामाजिक सुधारणा प्रत्येकानें यथाशक्ति आचरणांत आणल्या

पाहिजेत, हें त्यांचें मत मलाहि पूर्णपणें मान्य आहे. पी.वाय्. व ए.आर. [१] ह्यांच्या वैयक्तिक धीटपणाबद्दल व तसें आचरण ठेवीत असल्याबद्दल मला फार आदर वाटतो. व हे दोन्ही गृहस्थ फार सज्जन, सुसंस्कृत (cultured) आहेत, त्याबद्दल मला शंका नाही. ए.आर.तर चांगलेच gifted आहेत. ते पुढेमागें फार मोठे कवि होतील, असा मला दृढ विश्वास आहे. हें सर्व लक्षात घेऊन, वरील मजकुरांत त्यांच्याविषयीं एखादा उणा-अधिक शब्द आला असल्यास त्यावरून माझें त्यांच्याबद्दल चांगलें मत नाहीं, असें आपण कृपा करून समजूं नये, अशी विनंती आहे.

बस्स, पुरे आतां. हात दुखून आला. आणि वेळहि फार (रात्रीचे १२ वाजले !) झाला आहे.

कळावे. पुस्तक पोंचल्याचें कळवावें, व माझ्या ह्या बडबडीबद्दल व सदर पुस्तकाबद्दल आपण काय म्हणतां, तें कळवावें.

आपला
वा.ना.देशपांडे

('विश्रब्ध शारदा', खंड पहिला, ह.वि.मोटे प्रकाशन मुंबई-१९७२ या ग्रंथातून साभार.)

टीप : पु. य. देशपांडे : जन्म ११ डिसें. १८९९-अमरावती.
मृत्यू : २६ जुलै १९८६-नागपूर.
१९९९ हे पु. य. चे जन्मशताब्दी वर्ष.

। गोफ । तिहेरी व्यक्तिमत्त्वाचा ।............................

● डॉ. शोभा बुचे

नुकतेच संपलेले विसावे शतक हे जगाच्या इतिहासात संस्मरणीय ठरणारे होते, या शतकात संपूर्ण जगातच इतक्या विलक्षण घटना, उलाढाली झाल्या आहेत की भावी इतिहासकारांना संस्कृतीच्या, राजकारणाच्या मार्गावरचे एक महत्त्वाचे म्हणून या शतकाची नोंद करावी लागेल. जगाचे सोडा, केवळ आपल्या महाराष्ट्राचा विचार केला तरी समाजरचनेच्या प्रत्येक क्षेत्रात इथे विलक्षण उलथापालथ झालेली दिसते. त्याचे साक्षीदार म्हणून काही व्यक्ती आज आपल्याबरोबर आहेत तर ज्यांचा त्या उलथापालथी घडवून आणण्यात महत्त्वाचा सहभाग होता त्या आज काळाच्या पडद्याआड गेल्या असल्या तरी त्यांचे विचार, कार्य आज आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे. ज्यांनी आपल्या विचारांनी, कर्तृत्वाने आणि लेखणीने निद्रिस्त समाजाला जाग आणली असे अलीकडेच एकविसाव्यां शतकात अस्तंगत झालेले मालतीबाई बेडेकर हे गत शतकातील एक अलौकिक व्यक्तिमत्त्व.

१९०५ साली जन्म झालेल्या मालती बेडेकर म्हणजेच घोडनदीसारख्या आडगावात ड्रॉईंगमास्तर असलेल्या खरे मास्तरांची बाळूताई. अपरिवर्तनीय मानल्या गेलेल्या भारतीय स्त्रीजीवनाच्या संवेदनशील साक्षीदार. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय समाजाच्या आत्मतुष्टतेच्या कर्दमात किंचित् हालचाल होऊ लागली होती. समाजाचे अविभाज्य अंग असलेल्या स्त्रीजातीला पुरुषप्रधान संस्कृतीने अन्याय, हेळणा, उपेक्षा, दुःख आदी बंधनांनी करकचून टाकले असतानाच त्यांच्यातल्याच म. फुले, कर्वे, रानडे, आगरकर यांच्या सारख्या समाजसुधारकांनी तर हरिभाऊ आपटे, श्री. म.माटे, वा.म.जोशी या वाङमयावतार धारण केलेल्या पुरुषांनी स्त्रीच्या ह्या असीम वेदनांचा आपल्या शब्दमाध्यमातून वेगळाच हुंकार व्यक्त केल्याचे जाणवते. हे लेखन प्रभावी असले तरी त्यातून पुरुषप्रधान अभिव्यक्तीचे पडसाद उमटत असल्याने त्यात कुठेतरी न्यूनत्वाची

सूक्ष्म जाणीव होत होतीच. स्त्रीच्या अंतर्मनाचा वेध घेणे त्यांना कसे शक्य होते ? स्त्रीच्या व्यथा, वेदना स्त्रीनेच मांडायला हव्या होत्या. हे न्यून भरून काढण्याची जबाबदारी बाळूताई खऱ्यांनी अल्पवयातच सहजतेने परंतु समर्थपणे उचलली. स्त्रियांनी आपल्यावर होणारा अत्याचार मुकाट्याने सोसावा, विधवा, परित्यक्ता, जरठ-कुमारी विवाह अशा प्रथांना बळी पडले - -त्यांनी तोंड मिटूनच दुःखाचे डोंगर पार केले पाहिजेत, या कुप्रथांना धक्का देऊन स्त्रियांचे ते दुःख, ते अन्याय स्त्रीनेच निर्भीडपणे समाजासमोर शब्दांकित करण्याचे साहस बाळूताईंनी केले खरे, पण विभावरी शिरूरकर या नावाचा आसरा घेऊन. आसरा यासाठी की लेखिकेचे हे नवीन वैचारिक सामर्थ्य समाजाला एकदम न मानवणारे, परंतु चरचरीत डाग देणारे मात्र ठरणार होते.

जन्मजात गुन्हेगार ठरलेल्या जाती याही स्त्रियांइतक्याच उपेक्षित, दुःखी आणि अत्याचाराच्या बळी आहेत हे लक्षात घेऊन त्यासाठी त्या प्रत्यक्ष क्रियाशील तर झाल्याच, शिवाय जोडीला आपल्या साहित्यातूनही त्यांना मुखरित केले. त्यासाठी त्यांनी कादंबरीचे माध्यम समर्थपणे हाताळल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना लोकप्रियतेचा उच्चांक तर गाठता आलाच, त्याचबरोबर बुरसटलेल्या विचारांना उराशी कवटाळणाऱ्या समाजाच्या सार्वत्रिक चर्चेला उधाण आले. नवविचारांच्या सुधारणावादी मनाने मात्र त्यांचे हे क्रांतिकारक विचार तेव्हाच आत्मसात केल्याने मालतीबाईंच्या साहित्य सेवेतून व्यक्त होत गेलेल्या समाजोन्नतीच्या तळमळीला प्रतिसाद मिळत गेला. शिवाय समाजाने त्यांचा गौरवही केला. मराठी साहित्य संमेलन, विभागीय साहित्य संमेलने, निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या महिला परिषदा इत्यादींचे अध्यक्षपद आपणहून त्यांच्यामागे धावत आले. परिणामी संपूर्ण शतकावर त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याचा पगडा कायम राहिला.

एखाद्या सुंदर अलंकाराचा गुणगौरव करताना काही गुण सोन्याचा, काही कलावंताचा असे आपण गृहीत धरतो. तसेच एखादे अलौकिक व्यक्तिमत्त्व आपण पाहातो तेव्हा त्या व्यक्तिमत्त्वाच्या जन्मजात गुणांसमोर तर आपण नतमस्तक होतोच, परंतु त्या गुणांना संस्कारीत करणाराही प्रशंसेला पात्र ठरतो. मालतीबाई बेडेकरांना समाजाकडे सहृदयतेने पाहण्याची, समाजाने झिडकारलेल्या दुर्बल घटकांसाठी काही करण्याची दृष्टी आणि संधी लाभली खरी पण याचे श्रेय त्यांच्या वडिलांनी त्यांच्यावर केलेल्या सुसंस्काराकडे जाते हेही तितकेच खरे.

मालतीबाईंच्या ड्रॉईंगमास्तर असलेल्या वडिलांना शिक्षणाची अतिशय आवड असूनही दारिद्र्यामुळे शिक्षण घेता आले नव्हते, तरीही स्वतःच्या अपत्यांना शिकवून आपली आकांक्षा पूर्ण करण्याची आस त्यांनी बाळगली याचे आज नवल वाटावे. खरे मास्तरांचे सारेच जरा जगावेगळेच ! मुलगी म्हणजे आईबापाच्या जिवाला काच अशी परिस्थिती असताना आपल्या पाच मुली त्यांना कधीच संकटासारख्या वाटल्या नाहीत. मुलींना केवळ अक्षरओळख झाली म्हणजे पुरे असा तो काळ. अशा काळात स्वतः आर्थिक चटके व झीज सोसूनही आणि समाजाच्या टीकेकडे ढुंकूनही न पाहता मास्तरांनी आपल्या मुलींना पदवीधर केले. त्यांचा हा असामान्य सुधारणावादी दृष्टिकोन मालतीबाईंच्या संदर्भात सहजी दुर्लक्षिता येणार नाही. जनरीतीप्रमाणे आठ-दहा वर्षांच्या मुलींना विवाहाच्या जोखडात न अडकविता त्यांना शिकवून स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे हेही अप्रूपच. अस्पृश्यता, सामाजिक उच्चनीचता यात भेदाभेद न करणाऱ्या खरे मास्तरांनी त्याच संस्काराखाली वाढविलेल्या आपल्या मुलींना स्वावलंबन, निर्भयता, निर्भीडता म्हणजे काय याचेही धडे स्वतःच्या आचरणाद्वारे घालून दिल्याने आपल्या मुली पुण्याच्या वसतीगृहात असूनही त्यांना कधी धास्ती वाटली नाही; आणि त्यामुळेच स्वतःचे मार्ग चोखाळण्याचे आणि निर्णयस्वातंत्र्याचे सामर्थ्य मुलींच्या अंगी निर्माण झाले. अर्थार्जन करीत एकीकडे आपले शिक्षण पूर्ण करीत असताना बाळूताई घराचा आर्थिक व कष्टाचाही भार उचलीत होत्या.

मालतीबाईंना लाभलेल्या अशा संस्कारांचा वारसा त्यांनी यत्किंचितही वाया न जाऊ देता या संस्कारांना समाजोद्धाराकडे वळते केले. सहाध्यायी म्हणून, शिक्षिका म्हणून, मुख्याध्यापिका म्हणून, सरकारी कार्यालयातील पर्यवेक्षिका म्हणून वावरताना स्त्री-जीवनाच्या परवशतेचे, दुःखाचे तसेच स्त्रीच्या विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, प्रौढ कुमारिका, वेश्या, गुन्हेगार अशा विविध भूमिकेतील प्रश्नांचे दर्शन त्यांना घडले -- नुसतेच घडले नाही तर त्यातल्या वास्तवाने त्यांचे अंतःकरण व्यापून टाकले आणि हे अनुभव साध्या, सहज ओघवत्या शब्दांतून त्यांनी समाजापुढे ठेवले. स्त्रीची दुःखे, स्त्रीचे प्रश्न एका स्त्रीनेच आपल्या शब्दात मांडावे ही तोवर न घडलेली गोष्ट मालतीबाईंनी केली होती. मात्र त्यात कसलाही अभिनिवेश नव्हता. आक्रस्ताळेपणा नव्हता, मुद्दामपणा नव्हता, तशी औपचारिक

अनुक्रमणिका

कळकळही नव्हती. म्हणूनच समाज त्यांच्या हळुवार, परंतु सद्सद्विवेकबुद्धीला डिवचणाऱ्या लेखनाने चकित झाला. मालतीबाईंचे मोठेपण समाजाने बाळूताई खरे, विभावरी शिरूरकर आणि मालती बेडेकर अशा तीन पातळ्यांवर मान्य करून टाकले. बाळूताई खऱ्यांनी केलेले अलंकार मंजुषा आणि हिंदु व्यवहार धर्मशास्त्र हे संशोधनपर लेखन, विभावरी शिरूरकर म्हणून केलेले कथा-कादंबरीसारखे ललित परंतु सुधारणावादी लेखन आणि मालतीबाई बेडेकरांचे वैचारिक लेखन अशा तीन रूपात ह्या विदुषीचा समाजाने स्वीकार केला.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मालतीबाईंनी स्त्रीचे अत्यंत दुर्लक्षित, कष्टमय, उपेक्षित, परोपजिवी आणि केवळ पुरुषासाठी उपभोग्य म्हणून निर्माण झालेला जीव असे रूप पाहिले आणि त्याला आपल्या कादंबऱ्यांमधून यथातथ्य स्वरूपात चित्रित केले. शतकाच्या उत्तरार्धात मालतीबाईंच्या वार्धक्याबरोबरच त्यांचे उपरोक्त स्त्रीजीवनाविषयीचे आकलनही परिपक्व झालेले दिसते. 'मनस्विनीचं चिंतन' या पुस्तकातून स्त्रीच्या ह्या स्थिती-गतीचा एकएक सूक्ष्म धागा घेऊन त्याचे मानसिकदृष्ट्या सर्व बाजूंनी त्यांनी विश्लेषण केले आहे. शतकाच्या प्रारंभी आढळणाऱ्या स्त्री-जीवनात हळूहळू विधायक बदल झाले असून चालू विज्ञानयुगात स्त्री आणि पुरुष यांच्या एकमेकांकडे बघण्याच्या दृष्टीतही आशादायक परिवर्तन होत आहे हे मालतीबाईंचे अवलोकन सुखावणारे असले तरी "यापुढेही निसर्गनिर्मित देहामुळे पुरुषाची गरज स्त्रीला लागेल, तशी तिच्या सुकुमार देहाची त्याला विलक्षण ओढ असेल. आजवर केवळ देहासाठी, सेवेसाठी त्याने तिला जवळ केली असली तरी यापुढे प्रगल्भ मनाच्या बुद्धिनिष्ठ मैत्रीसाठी ती त्याला हवीशी वाटेल--- आजवरच्या मर्यादा ओलांडून पुरुषासारखीच अनुभवांची क्षेत्रं स्त्रीनं व्यापक केली तरच दोघांची मैत्री लवकर होण्याचा संभव आहे," हा त्यांनी दिलेला इशारा पुढील शतकात प्रवेश करताना लक्षात ठेवला तरच त्यांच्या बाळूताई खरे, विभावरी शिरूरकर, आणि मालतीबाई बेडेकर अशा त्रिविध दर्शनातून मिळणाऱ्या आशीर्वादाने आपण अनुगृहित होऊ.

डॉ. शोभा बुचे
६४, सावरकर नगर, खामला रोड, नागपूर.

■ ■ ■

। तीन । भाषणे ; । काही । अंश ।...............................

डिसेंबर २००० ते फेब्रुवारी २००१ या दरम्यान विदर्भात आणि विदर्भाबाहेर तीन लक्षणीय साहित्य संमेलने झालीत. विदर्भ साहित्य संघाचे पाचवे वैदर्भीय लेखिका संमेलन नागपूर येथे २३ व २४ डिसेंबर २००० या तारखांना झाले. नागपूरच्याच नाविन्य कला अकादमी या संस्थेने ह्या लेखिका संमेलनाचे यशस्वी आयोजन केले होते. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष होत्या नामदार सुलेखाताई कुंभारे, तर संमेलनाध्यक्ष होत्या सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले. विदर्भ साहित्य संघाचेच ५२ वे प्रांतपातळीचे वार्षिक अधिवेशन धामणगाव-रेल्वे येथे पार पडले. त्याचे स्वागताध्यक्ष होते अरुणभाऊ अडसड आणि संमेलनाध्यक्ष होत्या कवयित्री प्रभा गणोरकर. धामणगावचे हे संमेलन ३ व ४ फेब्रुवारी या दिनांकांना झाले. मधल्या काळात अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ७४ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन १९, २० व २१ जानेवारी २००१ या तारखांना इंदूर येथे झाले. त्याच्या स्वागताध्यक्षा होत्या नामदार सुमित्रा महाजन तर संमेलनाध्यक्ष होत्या प्रसिद्ध समीक्षिका विजया राजाध्यक्ष. विशेष असे की आपापल्या परिवेशामध्ये या तीनही संमेलनाध्यक्षांची भाषणे साहित्य आणि समाज यांच्या व्यापक संदर्भात लक्षणीय अशी होती. या तीनही भाषणांमधील अंशभाग आम्ही येथे प्रसिद्ध करीत आहोत. प्रतिमा इंगोले, प्रभा गणोरकर व विजया राजाध्यक्ष असा क्रम त्यासाठी योजिला आहे.

– संपादक

१. प्रतिमा इंगोले

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला एक वस्तू करून टाकले होते. तिच्यापेक्षा प्राणी तरी बरे असे म्हणायची वेळ आणली होती. तिच्यावरील अत्याचारही तसे सार्वत्रिक आणि अमानवी होते. राजस्थानमधील आईच्या दूधातून विष देऊन जन्मत्या स्त्रीला मारण्याची चाल अंगावर शहारे आणणारी

आहे. पण तिचे सुधारित रूप आताही गर्भलिंग चिकित्सेत आढळते कितीही ओरड केली तरी ही चिकित्सा छुप्या रूपात सुरूच राहते. त्यावरून आजही स्त्रीला दुय्यम दर्जा आहे हे नक्की ! बरे ! स्त्रीचे हे वस्तुरूप तसे सर्वत्रच आढळते. आफ्रिकेत स्त्रीला लैंगिक आनंद मिळू नये म्हणून तिचे ठराविक इंद्रिय (शिश्निका) कापण्याची असलेली चाल किंवा चीनमध्ये तिचे पाय वाढू नयेत म्हणून तिला लहानपणापासून छोटे बूट घालून ठेवण्याची चाल हे प्रकार घरच्या पाळीव प्राण्याचे शेपूट तोडणे किंवा कान कापणे ह्यासारखेच अमानवी आहेत. बरे ! आजही काही भागात पळवून आणलेल्या मुलींचा बालपणीच उपभोग्य अवयव (योनीमार्ग) वाढावा म्हणून केले जाणारे कृत्रिम प्रयत्न, ह्या गोष्टी तिचे वस्तुरूप सिद्ध करतात. परवा एका पित्याने आपल्या मुलीचे कुत्र्यासोबत लग्न लावून दिल्याचे आपणास ठाऊक आहेच. ह्या सर्वांमुळे स्त्रीचा आवाजच हरवला होता. ह्या निमित्त मी स्व. गीता साने ह्यांचे भाषण पुन्हा वाचले: त्यात त्यांनी आमच्या स्त्रियांनी नोकरी करणे म्हणजे एखाद्याने आपल्या घरची बैलजोडी भाड्याने द्यावी तसेच समजले जायचे आणि स्त्रीच्या कमाईवर पुरुषांचीच मालकी असायची असे म्हटले आहे.

स्त्रीची स्थिती शूद्रापेक्षाही भयावह होती. ह्याचा सबळ पुरावा म्हणजे तिला होणाऱ्या प्रसववेदनाही ओटीवर बसलेल्या पुरुषाच्या कानी जाऊ नयेत, ह्याची दक्षता तिला घ्यावी लागे. आता ह्या अशा वातावरणाचीच सवय झालेल्या स्त्रीच्या साहित्यात एकदमच विद्रोह कसा काय उमटणार ?

उपेक्षित दृष्टिकोण

अशा वेळी स्त्रियांच्या साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोणच मुळात उपेक्षित होता आणि त्याला डॉ. भालचंद्र फडके ह्यांच्या "मराठी लेखिका चिंता आणि चिंतन" ह्या पुस्तकाने पाठिंबा दिला. स्त्रिया लिहून लिहून काय लिहितील- रडकथाच ना ? किंवा संसारगाणीच ना ? त्यामुळेच मालतीबाई बेडेकरांना आपले साहित्य टोपणनावाने लिहावे लागले. हाच दृष्टिकोण मनात बाळगून स्त्रियांचे साहित्य वाचले जाते. मला इथे एका लेखिकेची कथा आठवते. ती लिहू लागते तसे घरादारातले तिचे कौतुक करू लागतात. पण ती जरा स्त्रीची कड घेऊन

लिहू लागताच, घरादारातले तिचा तिरस्कार करू लागतात. पुन्हा ती बंड करणाऱ्या स्त्रिया न रेखाटता, पारंपारिक स्त्रिया रंगवू लागताच परत तिचे कौतुक होते. तरीही गेल्या तीस वर्षातील स्त्रियांच्या कथावाङ्मयातून अनेक जळित प्रकरणे, पुरुषांच्या वासनाविकारांनी झालेली स्त्रीत्वाची हत्या, सामाजिक रचनेतील बदलते वास्तव आणि स्त्रीला तिच्या अस्मितेसाठी करावा लागणारा संघर्ष, मातृत्वाच्या वेगवेगळ्या परी, त्यामुळे स्त्रियांच्या मनात उद्भवणारी भावनांची आंदोलने, स्त्रियांच्या नातेसंबंधातील ताणतणाव, स्त्रियांचे होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक तसेच लैंगिक शोषण इत्यादि विषय हाताळले गेले आहेत. आता तर नव्याने राजकारणात शिरणाऱ्या स्त्रिया तेथे येणारे भ्रष्ट अनुभवही धीटपणे मांडू लागल्या आहेत. नुकतीच "मथु सावंत" ह्या ग्रामीण भागातील लेखिकेची "राहूकेतू" ह्या शीर्षकाची राजकारणावरील कादंबरी प्रकाशित झाली आहे. तरीही स्त्रिया तेच तेच लिहितात असे म्हणून, बोंब करणारे महाभाग आहेतच. काही तर स्त्रियांचे लेखन मुळीच न वाचता आक्षेप घेतात हे महत्त्वाचे ! कारण वरील दृष्टिकोणामुळे त्यांना स्त्रियांचे लेखन वाचावेसेच वाटत नाही.

अशा वेळी स्त्रीवादी समीक्षापद्धती ही लेखिकांच्या दृष्टीने उपकारक आहे आणि स्त्रियांनीच स्त्रियांच्या लेखनाची तरफदारी आणि समीक्षा करणे आवश्यक आहे. ह्या संमेलनाच्या स्वागत समितीमध्ये मान्यताप्राप्त आणि लोकप्रिय राजकीय नेत्यांच्या सहधर्मचारिणी आहेत. लेखकांच्या भार्या आजकाल आत्मचरित्र लिहितांना दिसतात. तसेच नेत्यांच्याही भार्यांनी ते का लिहू नये ? कारण राजकारणाचे बदलते रंग त्यांनीही जवळून पाहिलेले असतात.

राजकारणातील लोकांना आपल्या इतर गोपनीय गोष्टी चव्हाट्यावर येऊ नयेत असे वाटून ते आपआपल्या भार्यांना लेखनाची परवानगी कदाचित देणार नाहीत. पण इतर बाबतीत तसे नाही. बाहेर जाऊन स्त्रीने नोकरी करण्यापेक्षा तिने घरात बसून लिहिले तर बरे, असे वाटून पुरुष स्त्रियांना लेखनासाठी प्रोत्साहन देतांना दिसतात. पण तेही एका मर्यादेतच ! पण प्रत्येक वेळी जेव्हा संसार की लेखन असा संघर्ष उभा राहतो, तेव्हा मात्र तिने संसाराला प्राधान्य द्यावे असेच सर्वांना वाटते. अशा वेळी एखादीच मा. विद्याताई बाळ सारखी स्त्री संसाराचा त्याग करू शकते. इतर जणी मात्र दोन्ही तारेवर कंसरत करून थकून जातात

आणि आपोआपच त्यांच्या लेखनास दुय्यम स्थान मिळत जाते.

खरे तर स्त्रियांच्या लेखनाला ह्या समाजव्यवस्थेच्याच अशा मर्यादा आहेत. ह्याशिवाय पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीचा एक ठराविक साचाच केला होता. विटांच्या भट्टीवर, ज्याला वऱ्हाडीत 'पजाया' म्हणतात, विटा तयार करण्यासाठी एक साचा असतो. त्याला 'टॉप' असे म्हणतात. त्यातून मग ठराविक साच्याच्या एकसारख्या विटा बाहेर पडतात. त्या मजबूत घरे बांधतात. स्त्रियाही अशाच घडविल्या जातात व त्या माध्यमातून पुरुष-स्वामित्व बळकट केले जाते. त्यामुळे सगळ्यांचेच जगणे तसे सारखे वाटते. पण तिकडे डोळेझाक करून त्याचा ठपका प्रत्यक्ष तिच्या लिखाणावरच ठेवला जातो. ह्याचमुळे आणि तिला पुरेसे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळत नसल्यामुळेही ती साहित्यक्षेत्राशी फटकून वागते. अर्थात आता त्यात फरक पडत चालला आहे, पण समाजाचा दृष्टिकोण अजूनही निकोप नाही.

खरे तर ! आतापर्यंत लेखिकांच्या लेखनातून आलेले तिचे जीवन हे हिमनगासारखे आहे. आजकाल खेड्यातूनही स्त्रिया शिकत आहेत, पण त्यांच्या मनात एकतर न्यूनगंडाची भावना असते किंवा हे क्षेत्र किंवा लेखन हे उच्चभ्रू लोकांची मिरासदारी आहे, असे तिला वाटत असते. शिवाय आत्मविश्वासाचा अभाव असतोच. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांकडे साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने अनुभवांचा कसदार नावीन्यपूर्ण आणि भरपूर साठा असूनही त्या शब्दांकडे वळत नाहीत. त्या मौखिकमार्गाचा अवलंब करूनच आपला दुःखभार एकमेकींजवळ हलका करतात. खेड्यातील प्रत्येक स्त्रीचे जीवन एकेका कादंबरीचा विषय ठरावे असेच आहे. प्रा. तानाजी राऊ पाटील ह्यांच्या 'रूपसावली' ह्या कादंबरीने हे सिद्ध केले आहे. ग्रामीण स्त्रियांचाही जीवनसंघर्ष दाहक आणि पराकोटीचा असतोच. दलित स्त्रियांच्या आत्मकथनाने जशी साहित्यात मौलिक भर घातली आणि रसिकमनेही जिंकलीत, तशीच ग्रामीण भागातील स्त्रीची आत्मकथने घालू शकतील. पण असे घडत नाही, म्हणूनच ह्या लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद माझ्यासारख्या खेड्यातील लेखिकेला दिल्यामुळे कदाचित विदर्भातील ग्रामीण भागातील स्त्रिया लेखणी उचलतील अशी मला आशा वाटते. आणि ते घडावे ह्या अपेक्षेनेच मी हे पद स्वीकारले आहे. आज शहरी स्त्रियांबाबत मात्र वेगळी

परिस्थिती आहे. त्या वेगवेगळ्या क्षेत्रात वावरत आहेत. आणि आपआपल्या क्षेत्रातील अनुभव धीटपणे मांडत आहेत....

बोली : स्त्रियांची मिरासदारी

एवढे मात्र खरे की, बोली ही स्त्रियांची हक्काची भाषा आहे. कारण प्राचीन काळी तरी स्त्रियांना लेखनाची बंदी होती. त्यामुळे त्या त्या काळातील प्रमाणभाषा त्यांना अवगत असण्याचा प्रश्नच नव्हता. त्या फक्त बोलायच्या. ज्याकाळी संस्कृत भाषा प्रमाणभाषा होती त्या काळात ती त्यांना वर्ज्यच होती. त्यामुळे त्या त्या काळातील स्त्रियांनी आपले अनुभव, आपले सुखदुःख, भावनांचे आवेग, आपल्या व्यथावेदना, बोलीतूनच व्यक्त केल्या असणार ! ह्याच सरावापोटी आणि आत्मीयतेपोटी स्त्रिया आपल्या लेखनात बोली भाषेचा अवलंब करताना दिसतात आणि त्या त्या वेळी ते साहित्य झळाळून उठतांना दिसते. लोकसाहित्य तर बोलीचाच प्रांत आहे.

महदंबेनी धवळ्यांच्या निर्मितीसाठी बोलीचा अवलंब केला. ताराबाईंनी वैचारिक लेखनासाठीसुद्धा बोलीचाच वापर केला. आणि दोघींचेही लेखन अमर झाले. वऱ्हाडी बोलीच्या दृष्टीने ही गोष्ट गौरवाची आहे. एवढेच काय पण बहिणाबाई चौधरींनीही बोलीचा अवलंब केला आहे आणि तीही बोली वऱ्हाडीच आहे. माझ्या प्रबंधात ती वऱ्हाडीच असल्याचे मी सिद्ध केले आहे. बहीणाबाईंच्या काव्याची भाषा अहिराणी नाही. अभ्यासक तिला 'खानदेशी वऱ्हाडी' म्हणतात. पण तेही चूक आहे. कारण प्रत्यय प्रक्रियेतच थोडाफार वेगळेपणा आपल्याला बहिणाबाईंच्या गाण्यातून दिसून येतो. असा वेगळेपणा बुलढाणा जिल्ह्याच्या खानदेशलगतच्या भागातही आढळतो. प्रदेशाच्या सीमारेषेनुसार खरे तर भाषेचा प्रांत ठरविताच येत नाही.

"कुंकू पुसलं पुसलं । आता उरलं गोंधन
तेच देईन देईन । नशिबाले आवतन"

वरील ओवी वऱ्हाडी नाही असे कोण म्हणेल ? बहिणाबाईंच्या गाण्यात "उन" प्रत्ययान्त कृदन्ताचे रूप बदलते. जसे "झाडीसन", "करीसन" इ. एरव्ही वऱ्हाडी बोलीचे मनोज्ञ रूप त्यांच्या काव्यात दिसून येते. "बहिणाबाईची गाणी"

ह्या पुस्तकात बहिणाबाईंच्या बोलण्याचे काही गद्यात्मक उतारे आहेत. ते तर निव्वळ वऱ्हाडी आहेत. महदंबा, ताराबाई आणि बहिणाबाई ह्या तिघीही पतीशिवाय राहत होत्या आणि त्यांनी बोलीचा अवलंब केला हे त्यांच्यातील साम्य ! तसा बोलीचा वापर "अमृता प्रीतम" आणि "महादेवी वर्मा" ह्यांनीही केला आहे हे विशेष ! आणि त्या भारतभर मान्यता पावल्या आहेत.

२. प्रभा गणोरकर

या ठिकाणी थोडेसे थांबून मला आधुनिक मराठी साहित्याविषयीची काही निरीक्षणे मांडावीशी वाटतात. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, बी हे कवी आणि हरिभाऊ आपट्यांसारखे कादंबरीकार तत्कालीन समाजव्यवस्थेतून निर्माण झालेल्या दुःखाशी, वैचारिक आणि भावनिक पातळीवरच्या व्यथेशी निगडित असलेले लेखन करताना दिसतात. या लेखनाने समाज काहीसा अंतर्मुख होतो न होतो तोच रविकिरणमंडळाची त्यामानाने बरीचशी क्षीण परंतु रंजक आणि म्हणूनच अतिशय लोकप्रिय झालेली कविता प्रभावी ठरली. वामन मल्हार आणि डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यापेक्षा लोकांना ना.सी.फडक्यांच्या कादंबऱ्या अधिक प्रिय झाल्या. पु.य.देशपांड्यांपेक्षा माडखोलकर लोकप्रिय ठरले. खाडिलकरांची नाटके लवकरच लुप्त झाली आणि रांगणेकर - अत्र्यांची नाटके गर्दी खेचू लागली. अनिलांपेक्षा बोरकरांच्या कवितेचे शिष्यत्व पुढच्या कवींना अधिक मानवले. मर्ढेकरांच्या कवितेचे मोठेपण पुरते आकळण्याआधीच करंदीकर - पाडगावकर - बापट यांच्या काव्यवाचनावर लोक फिदा झाले. 'धग' कादंबरीतल्या कौतिकच्या जीवनाच्या होरपळीने कासावीस होण्याऐवजी 'गारंबीचा बापू' आणि त्यांची 'राधा' यांच्याशी वाचकाचे सख्य अधिक जुळले. अंतर्मुख करणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या, जिव्हाळी लावणाऱ्या साहित्यकृतीपेक्षा आल्हाद देणाऱ्या कृतींची निर्मिती आणि खप जास्त असे हे चित्र पाहिले तर एकुण मराठी साहित्याच्या क्षीण प्रकृतीची अचूक नाडीपरीक्षाच होते. थोरवी आणि यशस्विता यांच्यातला मूल्यात्मक भेद नेमका कशातून निर्माण होतो याचे भान ना साहित्यिकांनी ठेवलेले दिसते ना वाचकांना ते कुणी लक्षात आणून दिलेले दिसते. आज तर साऱ्या मराठी

वाचक,श्रोत्याला रंजनाने नादी लावलेले दिसते. ग्रामीण भागातून, समाजाच्या अंतःस्तरातून वेचून आणलेले अनुभव गांभीर्याने मांडू पाहणारा लेखकही थोड्याच दिवसांनी अनुरंजनाच्या क्लृप्त्या योजू लागलेला दिसतो. आपली वाङ्मयीन अभिरुची गंभीर साहित्याशी, विचारप्रधान, तात्त्विक लेखनाशी अशी फटकून का राहिली आणि त्याचे काय परिणाम झाले याचा ताळेबंद कधीतरी मांडला गेला पाहिजे.

वास्तविक पाहाता विभावरी शिरुरकर, कुसुमाग्रज, अनिल, मर्ढेकर, मुक्तिबोध, गाडगीळ, माडगूळकर हे लेखक गंभीर प्रकृतीचेच लेखक होते. त्यांचे लेखन छापले जात असे ती प्रगती, प्रतिभा, अभिरुची, सत्यकथा, साहित्य ही नियतकालिके गंभीर आणि विचारप्रधान वाङ्मयाची बूज राखणारी, श्रेष्ठ वाङ्मयीन मूल्यांची समज दाखवणारी होती. वि.स. खांडेकर, वा.ल. कुळकर्णी, बा.सी. मर्ढेकर, कुसुमावती देशपांडे, शरदचंद्र मुक्तिबोध, दि.के. बेडेकर, गंगाधर गाडगीळ यांसारखे समीक्षक गांभीर्याने तत्त्वचर्चा करणारी, वाङ्मयीन मूल्यांचा ऊहापोह करणारी समीक्षा लिहीत होते. वेगवेगळे साहित्यप्रकार निर्माण होत होते. वाङ्मयात नवे प्रयोग केले जात होते. असे असूनही आपली वाङ्मयीन अभिरुची संपन्न का झाली नाही ? वाङ्मयीन संस्कृती झपाट्याने खालावत का गेली ? ही अवनती कधी सुरु झाली ?

आपले सारे साहित्य, सारी निर्मिती, आपली वाङ्मयीन सस्कृती, ग्रंथव्यवहार, प्रकाशन व्यवसाय यांच्यापुढे असणारा जो वाचकवर्ग आहे तो शहरात राहाणारा मध्मवर्ग आहे. ह्या मध्यमवर्गाच्या संवेदनशीलतेशी आपले सारे वाङ्मय संवादी राहत आले आहे. त्याला सोसवेल, झेपेल, समजेल असे साहित्य, त्याच्या अनुभवकक्षेच्या आवाक्यात सामावतील अशा माफक अनुभूतींचे विश्व, त्याला पचेल रुचेल इतपत बोध आणि त्याला आवडेल असे रंजन मराठी साहित्यविश्व देत राहिले आहे. वर उल्लेखिलेले सारे लेखक आणि समीक्षकही त्याच वर्गातून उदयाला आलेले आणि त्या वर्गाशी सुसंवादी पण त्यांच्याकडून अधिक प्रगल्भ ठरणारे असे लेखन करीत राहिले. हे लेखक आणि समीक्षक आपापल्या निश्चित मूल्यभावांसह लिहित होते. पण भोवतीचा मध्यमवर्ग बदलत्या काळानुसार वेगाने बदलला. ह्या वर्गाला आस्था आणि कुतूहल होते तेव्हा नियतकालिके निघत,

वाचली जात. वस्तुस्थिती अशी असते की एक लेखक साधारणपणे विसाव्या वर्षापासून सत्तराव्या वर्षापर्यंत लिहीत असतो. पण त्याचा वाचक काही पन्नास वर्षे वाचत नसतो. वाचकाची पिढी व लेखकाची पिढी यात अंतर पडत जाते. मराठीत असे अंतर पडले; त्याच्या स्पष्ट खुणा आपल्याला पाहता येतात. बोरकर, अनिल, पेंडसे, विद्याधर पुंडलिक यांच्या वाचकांची पिढी बदलली. नव्या पिढीच्या बदललेल्या अभिरुचीला, त्यांच्यावर झालेल्या पाश्चात्य नववाङ्मयाच्या संस्कारांना या लेखकांचे लेखन आवडेनासे झाले. याचे एक खणखणीत उदाहरण म्हणजे फडक्यांच्या काळात त्यांच्या कादंबऱ्या आवडीने वाचणाऱ्या तरुण वाचकाचे वय फडक्यांचे लेखन कमकुवत वाटते. जे लेखक वाचकाबरोबरच वाढले, प्रगल्भ झाले. नव्या पिढीलाही सुसंवादी अशा नव्या जाणिवा व्यक्त करू लागले. ते टिकले. उदाहरणार्थ विंदा करंदीकर. जे होते तिथेच राहिले ते मागे पडले. उदा. वसंत बापट. असो. १९६५-७० नंतर ह्या मध्यमवर्गाचे नवश्रीमंत, पाश्चात्यांना अनुसरणाऱ्या, चंगळवादी वर्गात रूपांतर झाले. त्यांच्या नव्या पिढीला मराठी साहित्याविषयी आस्था वाटेनाशी झाली आणि मराठी नियतकालिकांची स्थिती केविलवाणी झाली. १९८० ते ९० या कालखंडात बरीचशी नियतकालिके वाचकांच्या आश्रयाविना बंद पडली. १९६५ ते ७० च्या आसपास उदयाला आलेल्या उत्साही अनियतकालिकांचा जोर ८० च्या आसपास ओसरला. दरम्यानच्या काळात ग्रामीण आणि दलित लेखकांची पिढी निर्माण झाली, पण तेही लिहित होते ते नव्या पांढरपेशा वाचकांकरताच. या लेखकांच्या वेगळ्या आणि मध्यमवर्गीयांना झिंजाडून टाकणाऱ्या अनुभूतींनी काही काळ वाचकाला वेधून घेतले पण १९८० नंतरच्या काळात त्यांचेही आवर्त निर्माण झाले. शहरी मध्यमवर्गीय वाचकाच्या अभिरूचीचा लंबक ऐतिहासिक कादंबऱ्या, श्री.ना.पेंडसे, पु.ल.देशपांडे, मंगेश पाडगावकर यांच्यावर स्थिर झाला. आजचा लेखक कोण आहे आणि त्याचा वाचक कोण आहे ? लेखकाची संवेदनशीलता आणि वाचकाची अभिरूची यांच्यात सुसंवाद आहे का ? आज वाचनसंस्कृती उरली आहे का ? साहित्यसंमेलनाला जाणारा वाचक कोणाची पुस्तके वाचतो ? श्रोत्यांना काय हवे असते ? आजचे साहित्यिक व्यासपीठावरून कोणता विचार देतात ? वाङ्मयीन अभिरूचीवर संस्कार करण्याचे काम आज कोणी

करते आहे का ? वाङ्मयातून आपल्याला जीवन जगायला बळ देणारे काही शाश्वत मूल्य मिळते असे आज वाचकाला वाटते आहे का ? आजचे शेकडो दिवाळी अंक, साप्ताहिक पुरवण्या यांची उपजीविका चालवणारा मजकूर कोणता असतो आणि तो आपल्या कितपत स्मरणात राहतो ? चरित्र, आत्मचरित्र, आठवणी, रिपोर्ताज, मध्यमवर्गीय संवेदनेला किंचित्काळ अस्वस्थ करील असे अनिल अवचटांचे लेखन, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे यांच्यासारखे चतुर, धीट लेखन, काही जुन्या पिढीच्या लेखकांचे वार्षिक लेखन, चित्रपट, दूरदर्शन, नाटके यांच्यातल्या कलावंतांच्या मुलाखती, गाजलेल्या, दिवंगत साहित्यिकांविषयीची संस्मरणे .... आजचा जोरात असलेला प्रकाशन व्यवसाय देखील दुसरे काय देत आहे ? या साऱ्या प्रश्नांची प्रामाणिकपणाने उत्तरे शोधली तर आजच्या वाङ्मयीन संस्कृतीची एकूण खोली आणि उंची ध्यानात येते.

मराठीत आज निर्माण होणाऱ्या बव्हंश वाङ्मयाचे स्वरूप भोवतीच्या इतर गोष्टींप्रमाणेच 'तात्कालिक' आहे. चिरस्थायी, पुढच्या पिढ्यांना उपयुक्त ठरेल असे काम मराठीत नेहमीच कमी झाले. त्यासाठी लागणारे सामूहिक प्रयत्न, त्यात वाङ्मयावरील श्रद्धेने स्वतःला झोकून देणारे कार्यकर्ते, जिद्द यांचीही वानवाच राहिली. ज्ञानकोश, विश्वकोश, दाते सूची, समाजविज्ञानकोश, रियासतींचे काम, परिषदेचे (अपुरे राहिलेले) वाङ्मयेतिहासखंड ह्यासारखे अपवाद आहेत हे भाग्य. एरवी, डॉ. कोलते, डॉ. अ.ना. देशपांडे, भ.श्री. पंडित, श्री.ना. बनहट्टी, कुसुमावती, माधव जुलियन, वि.रा. करंदीकर, श्री.र.कुलकर्णी, राम कोलारकर यांसारख्यांनी एकेकट्याच्या बळावरच मोठाली कामे सिद्धीला नेली. उद्याच्या महाराष्ट्रात तर प्रकल्प उभे राहाणेही दूर अशी भीती आज निर्माण झाली आहे. विद्यापिठांची संख्या वाढली, विद्यार्थ्यांची निर्मिती आणि खप जास्त. असे हे चित्र पाहिले तर एकूण मराठी साहित्याच्या क्षीण प्रकृतीची अचूक नाडीपरीक्षाच होते. थोरवी आणि यशस्विता यांच्यातला मूल्यात्मक भेद नेमका कशातून निर्माण होतो याचे भान ना साहित्यिकांनी ठेवलेले दिसते ना वाचकांना ते कुणी लक्षात आणून दिलेले दिसते. आज तर साऱ्या मराठी वाचक, श्रोत्याला रंजनाने नादी लावलेले दिसते. ग्रामीण भागातून, समाजाच्या अंतःस्तरातून वेचून आणलेले अनुभव गांभीर्याने मांडू पाहणारा लेखकही थोड्याच दिवसांनी अनुरंजनाच्या

क्लृप्त्या योजू लागलेला दिसतो. आपली वाङ्मयीन अभिरूची गंभीर साहित्याशी, विचारप्रधान, तात्विक लेखनाशी अशी फटकून का राहिली आणि त्याचे काय परिणाम झाले याचा ताळेबंद कधीतरी मांडला गेला पाहिजे.

वास्तविक पाहाता विभावरी शिरूरकर, कुसुमाग्रज, अनिल, मर्ढेकर, मुक्तिबोध, गाडगीळ, माडगूळकर हे लेखक गंभीर प्रकृतीचेच लेखक होते. त्यांचे लेखन छापले जात असे ती प्रगती, प्रतिभा अभिरूची, सत्यकथा, साहित्य ही नियतकालिके गंभीर आणि विचारप्रधान वाङ्मयाची बूज राखणारी, श्रेष्ठ वाङ्मयीन मूल्यांची समज दाखवणारी होती. वि.स. खांडेकर, वा.ल. कुळकर्णी, बा.सी. मर्ढेकर, कुसुमावती देशपांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, दि.के. बेडेकर, गंगाधर गाडगीळ यांसारखे समीक्षक गांभीर्याने तत्वचर्चा करणारी, वाङ्मयीन मूल्यांचा ऊहापोह करणारी समीक्षा लिहीत होते. वेगवेगळे साहित्यप्रकार निर्माण होत होते. वाङ्मयात नवे प्रयोग केले जात होते. असे असूनही आपली वाङ्मयीन अभिरूची संपन्न का झाली नाही ? वाङ्मयीन संस्कृती झपाट्याने खालावत का गेली ? ही अवनती कधी सुरू झाली ?

आपले सारे साहित्य, सारी निर्मिती, आपली वाङ्मयीन संस्कृती, ग्रंथव्यवहार, प्रकाशन व्यवसाय यांच्यापुढे असणारा जो वाचकवर्ग आहे तो शहरात राहाणारा मध्यमवर्ग आहे. ह्या मध्यमवर्गाच्या संवेदनशीलतेशी आपले सारे वाङ्मय संवादी राहत आले आहे. त्याला सोसवेल, झेपेल, समजेल असे साहित्य, त्याच्या अनुभवकक्षेच्या आवाक्यात सामावतील अशा माफक अनुभूतींचे विश्व, त्याला पचेल रूचेल इतपत बोध आणि त्याला आवडेल असे रंजन मराठी साहित्यविश्व देत राहिले आहे. वर उल्लेखिलेले सारे लेखक आणि समीक्षकही त्याच वर्गातून उदयाला आलेले आणि त्या वर्गाशी सुसंवादी पण त्याच्याहून अधिक प्रगल्भ ठरणारे असे लेखन करीत राहिले. हे लेखक आणि समीक्षक आपापल्या निश्चित मूल्यभावांसह लिहीत होते. पण भोवतीचा मध्यमवर्ग बदलत्या काळानुसार वेगाने बदलला. ह्या वर्गाला आस्था आणि कुतूहल होते तेव्हा नियतकालिके निघत, वाचली जात. वस्तुस्थिती अशी असते की एक लेखक साधारणपणे विसाव्या वर्षापासून सत्तराव्या वर्षापर्यंत लिहीत असतो. पण त्याचा वाचक काही पन्नास वर्षे वाचत नसतो. वाचकाची पिढी व लेखकाची पिढी यात

अंतर पडत जाते. मराठीत असे अंतर पडले, त्याच्या स्पष्ट खुणा आपल्याला पाहता येतात. बोरकर, अनिल, पेंडसे, विद्याधर पुंडलिक यांच्या वाचकांची पिढी बदलली. नव्या पिढीच्या बदललेल्या अभिरूचीला, त्यांच्यावर झालेल्या पाश्चात्य नववाङ्मयाच्या संस्कारांना या लेखकांचे लेखन आवडेनासे झाले. याचे एक खणखणीत उदाहरण म्हणजे फडक्यांच्या काळात त्यांच्या कादंबऱ्या आवडीने वाचणाऱ्या तरुण वाचकाचे वय फडक्यांबरोबर वाढले, पण त्या वाचकांच्या जागी आलेला नवा तरुण अशोक शहाणे याला फडक्यांचे लेखन कमकुवत वाटले. जे लेखक वाचकाबरोबर संख्या वाढली, पण मराठी भाषेचे अध्ययन करणारा विद्यार्थी अध्यापनाच्या क्षेत्रात कोंडी झाल्याने निराश आहे. संशोधनाकडे वळण्याची बौद्धिक कुवत किंवा मानसिक तयारी नाही. वृत्तपत्रे, सायंदैनिके, फिल्मी मासिके, साप्ताहिक पुरवण्या, दूरदर्शनवरील मालिका, कार्यक्रम अशा प्रसार माध्यमांचे 'हुकमी' जग त्यांना राबवून घेण्यास सिद्ध आहे. तिकडे सारे वळताहेत. नियतकालिकांची संख्या कमी आहे त्यांत जागा अपुरी, कविता, कथा, समीक्षा यांना प्रकाशकांकडून मागणी नाही; कारण खप नाही. ठिकठिकाणी संमेलने, मेळावे होतात. तेथे कवी-साहित्यिकांची रीघ असते, पण नियतकालिकातून वेधून घेणारे साहित्य दिसत नाही. आजची पन्नाशीला-साठीला पोचलेली पिढी समीक्षा, चर्चा, परिसंवाद करीत असलेली दिसते; ती आपला वाङ्मयीन वारसा कोणाकडे सोपवून जाणार आहे ? आज बहुजन समाजातून, नव शिक्षित समाजातून मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती होत आहे. विशेषतः कविता व कथा हे साहित्याच्या मुख्य प्रवाहात विलीन होणार की नाही ? अजूनही आपण दलित, ग्रामीण, प्रादेशिक असे प्रकार मानतोच आणि त्यांची वेगवेगळी संमेलनेही भरवतो; त्याचा अर्थ हे साहित्य हा मुख्य प्रवाह नाही. छोटे उपप्रवाह आहेत. तसे त्यांनी राहणे त्यांना स्वतःला पोषक आहे का ?

आज जे वाङमय, जे साहित्य निर्माण होते आहे ते अंतःकरणाला स्पर्श का करीत नाही, उथळ का वाटते याचाही थोडा विचार करावा लागेल. धर्म, संस्कृती, तत्वज्ञान, वाङमय, ललित साहित्य या साऱ्यांच्या मागचे प्राणतत्व म्हणजे या विश्वातल्या यच्चयावत प्राणिमात्राविषयीची आस्था. सहानुभाव. आज या मूलभूत चैतन्यतत्वापासून समाज तुटत चाललेला दिसतो. आपल्या भोवतीच्या

समाजात प्रचंड दारिद्य, दैन्य, दुःख, अज्ञान भरलेले आहे आणि त्याचे ओघळ सर्वत्र पसरत आहेत. आपण आपले वस्त्र वर उचलून त्यांचा स्पर्श आपल्याला होणार नाही याची काळजी घेत आपल्या धुंदीत चालले आहोत. रस्त्याकडेला उघडीनागडी मुले, जर्जर वृद्ध हात पसरून उभी आहेत तिकडे दुर्लक्ष करणे आणि त्यांच्या अस्तित्वाची आठवणही मनावरून पुसून टाकणे हा आपला धर्म आहे. दुःख, दारीद्य, आणि मृत्यू यांच्याविषयी एवढी कोरडी उदासीनता ज्या समाजात असेल तेथे तत्वज्ञान आणि साहित्य कसे निर्माण होणार ? आपल्या स्वतःच्या भौतिक उन्नतीत आपले साहित्य आणि कलाविश्व मशगुल आहे. किंबहुना या गोष्टींचा आणि साहित्याचा काही संबंध नाही अशी तटस्थ आणि सोयीची भूमिका आपण घेतली आहे. माणसा माणसांमधले हार्द नष्ट झाले आहे. माणसाला निसर्गाचे महत्व वाटेनासे झाले आहे. सुखवस्तु उपभोक्त्यांची संख्या वाढत आहे. त्यांना आपल्यासाठी खपणाऱ्या, झिजणाऱ्या, भुकेल्या, हडहडलेल्या माणसांचे, त्यांच्या हलाखीचे पूर्ण विस्मरण झाले आहे. आज जगण्याच्या कैफात, आज जन्मून उद्या जगणाऱ्यांची पर्वा नाही. एवढ्या उदासीन, स्वार्थी, सत्तांध, सुखलोलुप निबर आणि सुस्त समाजाला साने गुरुजी, मर्ढेकर मुक्तिबोध यांची आठवण कोठून होणार? या समाजातून साने गुरूजी, मर्ढेकर, मुक्तिबोध कसे निर्माण होणार ? आजच्या मध्यमवर्गीयांमध्ये निर्माण झालेली ही भ्रांती, ही आत्मग्लानी भयावह आहे. तिच्यामुळे आपण आपले अरत्र आणि परत्र गमावत चाललो आहोत. माझे हे बोलणं काहींना अतिरंजित, काहींना आकारण, काहींना अस्थानी वाटण्याची शक्यता आहे. वरवर पाहाता दिसते की सभा, संमेलने, नाटके, गायने, सांस्कृतिक कार्यक्रम, सत्कार, पुरस्कार, गौरवसमारंभ सुरू आहेत. पारितोषिके मिळताहेत. भरपूर उत्पादनांच्या भरपूर जाहिराती दिसताहेत. सभारंभाची सुरुवात जनगणमन या देशाच्या एकात्मतेच्या घोषीने व सांगता 'दुरितांचे तिमिर जावो जो जे वांछील तो ते लाहो' अशा पसायदानाने होते आहे. ' ताक् धिना धिन' चा आरंभ रामदासांच्या करुणाष्टकाने होतो आहे. सारे ठीकच सुलू आहे की प्रत्यक्षात प्रचंड अंतर्विरोधाने आपला समाज विरवरत चाललेला आहे ? चित्रपट दूरदर्शन यांतून चंगळवादी संस्कृतीचे जे भडक आविष्कार आपण पाहातो ते येथल्या भीषण दारिद्र्याशी, घाणीशी, अज्ञानाशी विसंगत आहेत. महानगरांकडे

धाव घेणारे दुष्काळी प्रदेशातल्या, धरणग्रस्त गावातल्या निर्वासितांचे लोंढे आहेत. खेड्यात शिक्षण घेतलेला पण खेड्यात राहाणे नकोसे झालेला बेकार तरुणांचा वर्ग आहे. असहाय अवस्थेतली, कुंठित झालेली वृद्ध माणसे, थंडीत, उष्णतेच्या लाटेत, पुराच्या वेढ्याने मरणारी माणसे, कत्तलखान्यात चाललेली प्राण्यांची क्रूर कत्तल, भूकबळी, कुपोषित बालके, दोन वेळचे अन्न एवढेच जगणे असलेली कोट्यावधी मूक माणसे... या साऱ्यांचा आणि आपला 'धर्म', 'संस्कृती', 'तत्वज्ञान', आपण ठिकठिकाणी लावलेली नेत्यांची हसतमुख छायाचित्रे, आपले साङ्हत्य यांचा काही संबंध आहे का ? आपण तो मानतो का ? स्वार्थी आणि उदासीन राजकारणी, आप्पलपोटे अर्थकारणी, अल्पसंतुष्ट आणि आत्मसंतुष्ट लेखक यांचे या समाजाला काही देणे लागते की नाही ?....

३. विजया राजाध्यक्ष

लेखक काल व अवकाश या दोहोंतील परस्परसंबंधांचा शोध घेतो. निर्मितीच्या वाटेवर त्याला काल व अवकाश यांच्यातील विविध प्रकारचे संबंध जाणवतात, आणि ते त्याच्या साहित्यकृतींतून व्यक्त होतात. हरिभाऊंच्या सदाशिवपेठेत, गाडगिळांच्या 'किडलेली माणसे' सारख्या कथेतील चाळीत, बोरकरांच्या 'जपानी रमलाची रात्र' या कवितेमधील मंत्रमुग्ध शयनमहालात, मर्ढेकरांच्या 'पिपांत मेले' या कवितेतील चिंचोळ्या पिपांत असे काही संबंध अध्याहृत आहेत. 'त्रिधा राधा' या पु. शि. रेगे यांच्या कवितेत अवघे आभाळ हाच एक अवकाश आहे, आणि त्याला काळच नाही. असा कालविरहित अवकाश आणि अवकाशविरहित कालही वाङ्मयात असू शकतो. असा हा विलक्षण कालावकाश सोबतीला घेऊन लेखकाचा प्रवास चाललेला असतो.

या प्रवासात भाषाही सोबतीला असते. कधी ती घडवावीही लागते. पहिला शब्द सुचतो, दुसरा शब्दही. त्याप्रमाणेच पहिली प्रतिमा, दुसरी प्रतिमाही. पण कधी इतके विनायास काहीच घडत नाही. वाट पाहावी लागते. ती प्रतीक्षा कधी जीवघेणीही ठरू शकते. पण 'शुभ्र कांही जीवघेणे' शोधण्याचा ध्यास असलेला लेखक ती प्रतीक्षाही आतुरतेने व आनंदाने करतो. सुचलेला पहिला शब्दच लेखकाला जणू आपल्या ताब्यात घेतो आणि त्या मुक्त बंदिवासात लेखक

शेवटच्या शब्दापर्यंत पोचतो. मध्ये विराम, कष्ट, फेरफार, अंतच वाटावा इतके दीर्घ थांबणे- असे सगळे काही असते. पण तरीही शेवटचा शब्द लेखकासाठी थांबलेला असतोच ! पण दरम्यानच्या 'अब्द-अब्द' शब्दांचा लोट अंगावर घेऊन लेखक एकीकडे रिता होतो आणि दुसरीकडे पुन्हा भरूनही येतो.

अशा तऱ्हेने दैवी आशीर्वादाची व मानवी प्रयत्नांची देणगी मिळालेला लेखक 'अम्लान प्रतिभाकळ्या उमलल्या आहेत चोहीकडे' अशा निर्मितीच्या अद्‌भुत प्रदेशात प्रवेश करतो. त्यापूर्वीचा प्रत्येक क्षण बिकट असतो. तो सोसण्यासाठी धीर हवा, तकवा हवा. तो दाखवल्यानंतर लागणारा प्रदेश हा अवघ्या मानवजातीसाठीच सौंदर्य, प्रतिष्ठा व न्याय यांची मागणी करणारा प्रदेश असतो. हे जाणवल्यानंतर वाङ्मयीन प्रयोजनांचे अग्रक्रम पक्के होतात. तडजोडी होत नाहीत, प्रलोभने खुणावत नाहीत. त्यात रंजन हे प्रयोजन पूर्णतः अनुपस्थित असते, असे नाही; पण ते दुय्यम स्थानावर असते. ते पहिल्या स्थानावर नेणाऱ्या लेखकाला 'सार्वकालीन' असण्याचा अधिकार उरत नाही. तोही लेखकच, पण सार्वकालीन नव्हे.

या अद्‌भुत प्रदेशात एखादा स्तब्धतेचा पट्टाही असतो. ही स्तब्धता कधी जीवघेणी असते, तर कधी पर्युत्सुक, आसमंताशी 'जन्मांतरीचे नाते' सांगणारी. या प्रदेशात व स्तब्धतेच्या पट्ट्यातही लेखक आपले गाणे गातच असतो, आणि त्या गाण्यात त्याचे अवघे अस्तित्व आणि अवघी सद्‌सद्‌विवेकबुद्धी सामावलेली असते.

येथे एक प्रश्न उपस्थित होतो. लेखक म्हणजे कादंबरीकार, कथाकार, नाटककार, कवी- आणि अन्य वाङ्मयप्रकारांचा निर्माताही. या लेखकात लेखिकाही समाविष्ट आहे का ? या प्रश्नाला माझे उत्तर 'होय' असे असले, तरी काही भेदांची दखलही घेतली पाहिजे. या संदर्भात स्त्रीच्या देहाचा व त्यातून जन्मलेल्या काही आग्रहांचा व द्वंद्वांचा उल्लेख केला पाहिजे. आग्रह हा, की देह ही स्त्रीची नियती नाही, ती तिची शक्ती आहे. ही शक्ती जननशक्तीहून वेगळी आहे. लेखन ही गर्भात मूल वाढवण्याइतकी व त्याला जन्म देण्याइतकी स्वाभाविक गोष्ट नाही. ते एक क्रियाशील, सुजाण घटित आहे. ती लेखकाची आणि लेखिकेचीही चिरंतन, आंतरिक गरज आहे.

स्त्रीचा देह जसा वेगळा, अनेक स्थित्यंतरांतून जाणारा, तसे तिचे मन, भावविश्वही वेगळे, आणि तिची भाषाही वेगळी. पण हे वेगळेपण संपूर्ण मात्र नाही. स्त्री व पुरुष-म्हणजेच लेखिका व लेखक - यांचे एक सामायिक असे जग असते, सामायिक संस्कृतीही असते. पण या सामायिक वर्तुळाभोवतीच एक चंद्रकोरीच्या आकाराची कडा असते. त्या कडेला 'wild zone' असे नाव दिले गेले आहे. - एक वैराण, ओसाड, मोकळा प्रदेश. तिथे असते पुरुषप्रधान संस्कृतीने उभारलेली एक दृश्यादृश्य बंदिशाळा. त्या बंदिशाळेत होत असलेले देहमनाचे शोषण. कोंडलेले श्वास. आत जळत राहिलेले अश्रू. स्त्री या कुरूप अनुभवांबद्दल लिहिते - आता तर अधिक निकडीने लिहिते. पण याच बंदिशाळेत तिला तिच्या मुक्तीचे द्वारही दिसते. त्या द्वाराच्या मुखापाशी असते ते तिचे गर्भाशय आणि त्यात रुजलेली निरागस, हसरी स्वप्ने. त्या स्वप्नांना दिलेले स्तन्य. ही स्वप्ने ओटीत पुंजावताना वेदना असतात, पण एका अकल्पित क्षणात त्या वेदना संपवणारी, निर्भर आनंद देणारी तुर्यावस्थाही असते. ते असते विदेहीपण. त्या विदेहीपणात ओसाड, वैराण प्रदेशाच्या सीमारेषा उल्लंघून साक्षात मुक्तीच्याच प्रदेशात स्त्री प्रवेश करते. तेथे पुरुषाला प्रवेश नाही; तेथे फक्त स्त्री नावाचे आभाळ आहे आणि त्यात जिचा कधीही क्षय होत नाही अशी चंद्रकोर आहे. ही चंद्रकोर स्त्रीच्या निर्मितीलाही एक तिचेच असे वेगळे रूप देते.

हे काही अंशी खरेच आहे. पण तरीही निर्मितीच्या वाटेवरील स्त्रीचा प्रवास पुरुषासारखाच असतो; तिचा शोध व ध्यास तोच असतो, निष्ठा व मूल्ये तीच असतात, कालावकाशाशी असणारे नाते तेच असते आणि निर्मितीप्रक्रियेत करावी लागणारी प्रतीक्षाही तीच असते. काही मानसिक व सामाजिक प्रश्न यांचे वेगळेपण खरे असले, तसे ते असणे आवश्यकही असले, ती स्त्रीवादी लेखनामागील प्रभावी प्रेरणा असली, तरी त्यामुळे सार्वकालीन निर्मितीस्वभाव बदलत नाही.

निर्मितीच्या या धूसर आणि नितळही वाटेवर लेखक अखंडपणे क्रियाशील असतो. त्यावेळी लेखन हीच त्याची एकमेव प्रधान कृती असते. येथे एकान्तही असतो आणि लोकान्तही असतो. 'स्व'शी सहवास असतो, आणि अवघ्या मानवजातीशी सान्निध्य असते. निसर्गाची गूढ निःश्वसिते या वेळी ऐकू येतात. हे

सगळे एका व्यापक सह-अस्तित्वाच्या भावामुळे स्वतःत रूजवता येते. म्हणूनच स्वेतरांशी विलीनत्वाची व एकात्मतेची नाती जडतात. स्वतःसाठी घेतलेले अनुभव इतरांसाठी घेतले आहेत, तो जणू कुणा दैवीशक्तीने आपल्याकडे पाठवलेला एक संदेश आहे, असा प्रत्यय येतो. तो प्रत्यय हेच लेखकाचे सार्थक असते.

हा प्रवास मूलतः लेखकाच्या जीवनानुभवाच्या अनुषंगाने होतो, हे खरेच; पण प्रगल्भ जाणिवेच्या अवस्थेत लेखकाला उमगते, की केवळ जीवन पुरेसे नाही. मानवी जीवनाच्या शोधात पुष्कळ तपशील गोळा होतात; पण ते तपशील महत्त्वाचे नाहीत. त्यांच्या पसाऱ्यातील 'माणूस' हाती लागला पाहिजे. तो अजून सापडलेला नाही, असा कबुलीजबाब स्वतःशीच देऊन, लेखकाचा प्रवास पुढे चालू राहतो. साहित्य म्हणजे केवळ जीवन नव्हे. त्याला संपूर्णपणे विरोधी असेही काही नव्हे. हे वास्तव व कल्पनाशक्ती यांच्या समन्वयातून निर्माण झालेले एक घटित आणि एक मिथकही असते. ते निष्ठेने घडवायचे; त्यात स्वतःचा जीव ओतायचा. तो भाषेतही ओतायचा असे अनेक निर्णय घेत लेखक पुढे जात असतो.

मानवी जीवनाच्या पसाऱ्यात लेखक ज्याचा शोध घेत असतो तो माणूस हा एका चक्रव्यूहात, भुलभुलैयात सापडलेला असतो. त्यातून त्याला कल्पनाशक्तीच्या साहाय्याने सोडवण्यासाठी, त्याला सोबत देण्यासाठी, त्याच्या इच्छा, सुखदुःखे, स्वप्ने जाणून घेण्यासाठी, करुणेची भावना व द्रष्टेपणाची शक्ती यांची आवश्यकता असते. भवितव्य हे वर्तमानाइतके स्पष्ट दिसावे लागते. त्यासाठीही कल्पनाशक्तीचे साहाय्य लागते. 'गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी' असे स्वतःला बजावत माणसाचा वर्तमान-जमले तर त्याचे भविष्यही- जाणून घ्यायचे; पण मुख्य म्हणजे त्याच्याशी असलेले आपले नाते ताडून पाहायचे. हेच लेखकाचे प्रधान आणि अंतिमही प्रयोजन असते.

हा शोध कधी पूर्ण होत नसतो. या शोधात एक दार उघडले तरी त्याच्या आत आणखी एक दार असते. अशी असंख्य दारे. लेखकाला त्यांतील किती दारे उघडता येतात हे त्याच्या सृजनशक्तीवर अवलंबून असते. पण आधी बंद दारे उघडण्याची प्रेरणा व नंतर तिचे ध्यासात झालेले रुपांतर लेखकाला एक दैवी बळ देते. मर्ढेकरांनी म्हटले आहे, "कितीक दालने/धुंडाळीत आलो;/ उत्कंठा

ही ल्यालो/ स्वप्नांतील" त्यांना त्या शोधात परमशक्ती भेटावी असे वाटत होते. पण शेवटी माणूस हीच एक परमशक्ती नाही का ? या शोधाच्या शेवटी लेखकाला कोण भेटते ? की कोणीच भेटत नाही ? कोणी भेटो वा न भेटो, त्याचा हा शोध स्वतःसिद्धपणे महत्त्वाचा असतो.

हा शोध घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष म्हणजे जीवन आपल्याहून कितीतरी अधिक मोठे आहे ही जाणीव. या जाणिवेमुळे जीवन अधिकाधिक आत्मसात करण्याचा आणि त्याचे विश्लेषण करण्याचाही ध्यास जन्माला येतो. जीवनाचे 'स्वसंवेद्य आत्मरूप' दिसते. त्यासाठी उत्कट व शांत संवेदनस्वभाव असला पाहिजे. समोरच्या संभारातील नेमका आकार पाहण्याची नजर, नेणिवेतील सुप्त व तार्किकतेपारचे, आदिम व आधुनिक असे दोन्ही जातींचे अनुभव आत्मसात करण्याची शक्ती पाहिजे. मुख्य म्हणजे तो अलौकिक ध्यास पाहिजे. त्या ध्यासामुळे लेखकाचे अंतर्जीवन अत्यंत क्रियाशील होते आणि तो बाह्य जीवनातही मुक्तपणे झेपावू शकतो. काही वेळा तो एकटाही असतो. येथे 'आपुलाची वाद आपणांसि'; किंवा 'माझ्या घरी मी वऱ्हाडी' अशी परिस्थिती असते. हा एकट्याचा संघर्ष, एकट्याची आशा, एकट्याचे परकेपण आणि एकट्याचा आवाजही. पण या सगळ्यांमध्ये 'विश्वामाजी' स्फुरत पसरण्याचा विलक्षण अनुभवही अध्याहृत असतो. मग काहीच परके राहत नाही. लेखक आत्मीयतेने या बहुरंगी जीवनातील आनंद-स्थळे पाहतो, त्याप्रमाणेच दुःखेही पाहतो. स्वाभिमानाने स्वीकारलेले दुर्दैव, हताश नव्हे तर उत्तेजित करणारे विलक्षण पराभव, इतरांच्या आधाराने नव्हे तर स्वसामर्थ्याच्या प्रत्ययाने दिलेली झुंज व तिच्यातून मिळालेले विजयही... असे हे जीवनभर खेळणारे हारजितीचे प्रवाह असतात. ते प्रवाह आपल्या जनसाहित्यात, आदिवासी साहित्यात, ग्रामीण साहित्यात- आणि विशेषतः स्त्रीसाहित्यात व दलित साहित्यात-वाहतांना दिसतात. तेथे मानहानीची, उपेक्षेची वेदना आहे, कधी न बुजणाऱ्या जख़मा आहेत. त्यांचे संदर्भ व्यक्तिपरत्वे व समाजपरत्वे बदलले तरी साहित्यात त्यांना शाश्वततेचे रंग प्राप्त होतात. ते व्यक्त करताना 'हे सगळे बदलले पाहिजे' अशी गाढ करुणेतून जन्मलेली जिद्द लेखकाच्या ठिकाणी निर्माण होते. त्यासाठी काही वेळा संघटितही व्हावे लागते. त्याखेरीज परिवर्तनाच्या पाऊलखुणा उमटत नाहीत. म्हणजे या दोन वाटा असतात. एका वाटेवर स्वतःपुरता

त्या दुर्दैवाचा अनुभव घ्यायचा, आणि दुसऱ्या वाटेवर ते संपावे म्हणून संघटितही व्हायचे. या दोन्ही वाटा महत्त्वाच्या असतात. सामाजिक बांधिलकी आणि तिच्यातून निर्माण होणाऱ्या संघटना व चळवळी यांचा या व्यापक स्तरावर विचार केला तर त्या लेखकाच्या स्वातंत्र्यावर बंधने आणतात असे वाटणार नाही. ते स्वातंत्र्य जपूनही एक जबाबदार नागरिक म्हणून लेखकाला आपला त्यातील सहभाग दाखवता येईल. कलावादी लेखकांनीही अशा प्रकारचा सहभाग अप्रत्यक्षपणे मान्य केला आहे. कलावादी लेखनाची केंद्रे वेगळी असतील, पण म्हणून काही जीवनभान सुटत नाही. ते सार्वकालीन आहे, आणि त्याचा साहित्यातून होणारा आविष्कारही सार्वकालीन आहे. ती एक बाह्य प्रेरणांचा सन्मान करणारी आदिम अंतःप्रेरणाच आहे. साहित्यात त्या दोन्ही प्रेरणांचा समन्वय असतो. तो समन्वय साधणे सोपे नाही. त्यातून द्वंद्वे निर्माण होतात, आणि द्वंद्वांतून दुःख. ते टाळण्यासाठी ठराविक , सुरक्षित वाटांवरूनच चालण्याचा मोह होतो. त्यातून तडजोडी येतात. 'आतला आवाज' घुसमटतो. तो नेहमी मोकळा, भोवतालशी सुसंवादी ठेवणे हे लेखकांचे भागधेय असते, आणि सार्थकही. .....अशी ही सर्जनाची वाट. ती चालणाऱ्या लेखकाला पाहणाऱ्या, वाचणाऱ्या वाचकांचे दोनतीन प्रश्न असतात. त्यातील एक साधा प्रश्न हा की लेखक कसे लिहितो ? यासंबंधी वाचकांच्या काही रोमँटिक कल्पना असतात. म्हणजे प्रातःकाळ, निसर्गरम्य वातावरण वगैरे. या बाह्य गोष्टी झाल्या. निर्मितीच्या क्षणी, कोरा कागद समोर असताना, लेखकाच्या मनावर प्रचंड ओझे असते. ते पेलणे सोपे वाटू लागते ते एका विशिष्ट टप्प्यापाशी पोचल्यानंतर. पण तिथे पोचणे न पोचणे हे लेखकाच्या संपूर्णपणे ताब्यात नसते. त्यात थोडा दैवाचा, योगायोगाचा भागही असतो. पण या कल्लोळातून जाताना एखादा क्षण-नव्या उन्मेषांनी थरारणारा क्षण-पुढे ठाकतो. काहीशा अनपेक्षितपणेच. एखाद्या बंदिशीत, ठराविक आलापीनंतर षड्ज लागावा किंवा 'विस्तीर्ण पोकळीचा गंधार सापडावा' तसा. त्या क्षणी लेखकाची अनंत स्मरणे जागी होतात आणि संवादशक्ती तीव्र होते.

हा लेखकाचा वाचकाशी सुरू झालेला संवाद. शब्दांतील संवाद. त्या क्षणी लेखकाचे विलगपण संपते; संवादाच्या सुंदर जाणिवेतून जन्मलेला कलात्मक आनंद लेखक अनुभवतो. तो कालिदास-महानोरांनी, पेंडसे-श्याम मनोहरांनी,

भाऊ पाध्ये-ढसाळांनी, माडगुळकर-यादवांनी, गाडगीळ-जी.ए-सारंगांनी, गडकरी-कानेटकरांनी, तेंडुलकर-राजीव नाईक यांनी, इंदिरा, नीरजा, प्रज्ञा लोखंडे यांनी, विभावरी-मेघना पेठे यांनी - या दोन किंवा त्याहीपलीकडच्या टोकांतील सर्वच कलावंतांनी अनुभवला. यांत वेगवेगळे काळ, वेगवेगळी स्थळे, वेगवेगळे समाज, वेगवेगळ्या प्रवृत्ती, वेगवेगळ्या शैली आणि वेगवेगळ्या विचारसरणी आहेत हे खरेच. पण तो आनंद एकच आणि सार्वकालीन आहे.

या लेखकाला वाचकाचा प्रतिसाद मनापासून हवा असतो. हेच वाचकाच्या 'लेखक का लिहितो ?' या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे. लेखक सर्जक खराच; पण वाचक या सहसर्जकाखेरीज त्या सर्जनाला पूर्णत्व येत नाही. वाचकालाही या सहभागात आनंद असतो. लेखकाचा पहिला आनंद सर्जन हा आणि दुसरा आनंद सहसर्जनाला चालना देणे हाही. प्रख्यात समीक्षक Hans Robert Jauss याने म्हटल्याप्रमाणे वाचकाचे एक 'अपेक्षा-क्षितिज' (Horizon of expectations) असते. त्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात असे त्याला मनापासून वाटते. पण त्या पूर्ण झाल्या नाहीत तरी तो फार नाराज होत नाही. अनपेक्षित असे काही स्वीकारणे, ते आश्चर्य अनुभवणे, त्यासंबंधी पुढे-मागे जात चिंतन करणे व भाकितेही करणे- आणि या अर्थाने लेखकाच्या सर्जनात सहभागी होणे हे वाचकाने लेखकाला रसिक वृत्तीने दिलेले एक सहकार्य असते. या प्रतिसादाचा एक सिद्धांतही नव्या समीक्षेत मांडलेला आहे. लेखक आहे, म्हणूनच वाचकही आहे. त्या लेखकाला कसे नष्ट करणार ? 'The author is dead' हे रोलाँ बार्त्‌सचे प्रख्यात घोषवाक्य कसे मान्य करणार ? लेखकाला मृत्यू तर नाहीच, उलट त्याच्या जन्माला 'चौऱ्यांशी लक्ष फेरे' आहेत. वाचकाशी बोलून लेखक एकप्रकारे भारमुक्त होतो. त्याच्या अवघ्या अस्तित्वाला एक सुंदर हलकेपणा प्राप्त होते.

वाचकाचा आणखी एक प्रश्न असतो : लेखक जे लिहितो ते खरे, म्हणजे प्रत्यक्षात घडलेले असते का? साहित्यातील वास्तववादाशी अगदी प्राथमिक पातळीवर संबंधित असलेला असा हा प्रश्न आहे. या प्रश्नाचे साररूप उत्तर असे की, लेखक दोन प्रकारच्या वास्तवात राहतो. त्यातील एक बाह्य वास्तव; पण आणखी एक-लेखकाला कदाचित अधिक महत्त्वाचे वाटणारे-आंतरिक वास्तव

अनुक्रमणिका

असते. ते त्याला 'मी कोण आहे ?' या प्रश्नांचे उत्तर देते; आणि 'मी आहे' हा आत्मविश्वासही देते. त्या आत्मविश्वासाच्या बळावर तो कधीकधी वास्तवापलीकडच्या आणखी एका वास्तवाकडे म्हणजे अस्तित्वाकडेही जातो. पण त्याचा आतड्याचा संबंध आंतरिक व बाह्य या दोन वास्तवांशीच असतो. आंतरिक वास्तव हे अबोलपणे त्याच्यात वास्तव्य करून असते; बाह्य वास्तव मात्र त्याला वेगवेगळ्या प्रकारे प्रकटपणे गुंतवत असते. कारण त्यात वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक ताण असतात; त्या ताणातून काही पेचप्रसंगही उद्भवतात. त्या वेळी लेखकाला प्रत्यक्षाप्रत्यंक्ष अशी काही भूमिका घ्यावीच लागते. त्याची स्तब्धता हीही त्याची एक भूमिका असू शकते. (बोरीस पास्तरनाक हे त्या भूमिकेचे एक उत्तम उदाहरण). भारतात १९७५ साली पुकारलेली आणीबाणी हा एक राजकीय पेचप्रसंग होता; दलितांवर व स्त्रियांवर होणारे अत्याचार हे सामाजिक पेचप्रसंग तर वारंवार उद्भवतात; १९९८ साली मुंबईला झालेल्या साहित्य-संमेलनाच्या संदर्भात शिवसेनाप्रमुखांनी काढलेले अवघ्या कलावंतविश्वाचीच मानहानी करणारे उद्‌गार हा एक मूलभूत सांस्कृतिक पेचप्रसंग होता. त्यावेळी झालेला लेखकांचा उद्रेक अजूनही आठवतो. अशा वेळी संघटित व्हावेच लागते. चळवळ उभारावीच लागते. या चळवळी एकंदर समाजाला सतर्क ठेवतात. हा भोवतालाला लेखकाने दिलेला प्रतिसाद आहे; त्याची सार्वकालीन प्रेरणा लेखकाच्या प्रतिष्ठेची व स्वातंत्र्याची जपणूक आणि एकंदर मानवी मूल्यांची जपणूक हीच आहे. या सार्वकालीन प्रेरणेचा उगम वास्तवाच्या परिपूर्ण भानातच असतो.

आधी म्हटल्याप्रमाणे साहित्याच्या भाषेत दैनंदिन भाषेचे व बोलीचेही रंग मिसळलेले असतात. पण त्या भाषेलाच साहित्यात एक काव्यात्म मूल्य प्राप्त होते. हे मूल्य साहित्याच्या-विशेषतः कवितेच्या-भाषेला अनोखे सौंदर्य देते. कवी शब्दांना ही नवी ओळख तर देतोच, पण नवे शब्दही निर्माण करतो. 'झपूर्झा' सारखा शब्द घ्या. 'जुने शब्द सुने होऊन वाजतात कसे बद्द निसूर', हेही खरे, आणि त्या जुन्या शब्दांचे कवीकडून होणारे नूतनीकरणही खरे. अखेर शब्द म्हणजे तरी काय ? ते कवीच्या मनातल्या दोन स्तब्धतांमधले पूल असतात. ते पूल ओलांडणारा, ते ओलांडणे जगणारा कवी म्हणतो, "जगाच्या आरंभी

शब्द होता, आणि जगाच्या अंतीही शब्दच असेल." विंदा करंदीकरांच्या कवितेमधील ओळीतील एका शब्दात बदल करून सांगायचे झाले तर, 'विल्ल्याची जर वेळच आली, शब्द राहू दे पुन्हा गरोदर !' शब्दांप्रमाणेच साहित्याची रूपेही मुक्त असतात, आणि तीही शब्दांप्रमाणेच दोन रिकाम्या जागांमधील एखाद्या प्रकाशबिंदूसारखी लेखकाच्या दृष्टीसमोर चमकतात. आखणी असतेच; पण आखणीआधी हा चमकता प्रत्यय असतो.

ती घडेल या विश्वासानेच वाचकालाही ते पूल ओलांडण्याची प्रेरणा देणारे, रिकाम्या फटीतील प्रकाशबिंदूंकडे खुणावणारे साहित्य हे कोणत्याही काळातील वाचकाचे साहित्य म्हणून अक्षर साहित्य. अशा साहित्यात वाचकांच्या मनातील गोठलेला समुद्र प्रवाहित करण्याची शक्ती असते. त्या समुद्रात उचंबळणाऱ्या लाटालहरी कधीकधी लेखकानेही पाहिलेल्या नसतात. म्हणूनच तर लेखकाचे आविष्कारस्वातंत्र्य जितके महत्वाचे तितकेच वाचकाचे आस्वादस्वातंत्र्यही महत्वाचे. वाचकाला अशा अंतर्बाह्य प्रेरणा देणाऱ्या साहित्यकृती या एखाद्या दीपस्तंभासारख्या असतात. शाश्वताच्या समुद्रावर, वेगवेगळ्या काळांत उमटलेल्या लाटालहरींतून उचंबळून व विरून गेलेला, पुन्हा उचंबळणारा आणि आपल्या शाश्वताच्या किनाऱ्यावर येऊन विसावलेला लेखकाच्या प्रतिभेचा तो एक उत्कट उद्रेक असतो. कितीही उत्पात घडले तरी हा उद्रेक शाश्वत असतो. म्हणूनच सार्वकालीन लेखकाने आपल्या निर्मितीला दिलेले प्रतीकात्मक शीर्षक असते : 'मागील पानावरून पुढे चालू....'

सार्वकालीन साहित्याबद्दलचा-लेखकाबद्दलचा-मांडलेला दृष्टिकोन हा आदर्शवादी दृष्टिकोन आहे. पण तोच साहित्याविषयीचा एकमेव दृष्टिकोन मात्र नाही. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत आणि त्याच्यापूर्वीच्याही दशकात अधूनमधून या दृष्टिकोनाला छेद मिळाला, विरोध झाला. त्या विरोधाला वेगवेगळे तत्कालीन संदर्भ होते. त्यातच आणखी काही नव्या संदर्भांची भर पडून आता लेखकाबद्दल म्हणजे आजच्या विशिष्टकालीन लेखकाच्या व साहित्याच्या सद्यकालीन स्थितीबद्दल नव्याने विचार होऊ लागला आहे. याचा अर्थ साहित्याच्या लेखकाच्या मूलभूत प्रवृत्तीच बदलल्या, नष्ट झाल्या, त्यांची जागा सर्वस्वी प्रवृत्तींनी घेतली असा मुळीच नाही. तसे कधीच होत नाही. पण

उल्लेखिलेल्या काही नव्या संदर्भामुळे काही नवे प्रवाह मात्र आले. त्यांचा उगम प्रस्थापितता-विरोधी भूमिकेत आहे असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. त्याच भूमिकेबद्दल मी थोडे सविस्तरपणे बोलणार आहे. माझ्या भाषणाचा हा उत्तरार्ध त्याच्या पूर्वार्धाशी बव्हंशी संवादी आहे, कारण सार्वकालीन लेखकाच्या प्रवृत्तिविशेषाचा मूळ गाभा बदललेला नाही, आणि म्हणून सर्जनाच्या प्रवासाची वाटही बदललेली नाही. पण या उत्तरार्धात तिने काही नवी वळणे मात्र घेतली. त्यापैकी काही निवडक वळणाचा येथे विचार करायचा आहे. नव्या शतकाच्या आरंभी ती भूमिका विचारात घेणे प्रस्तुत ठरेल असें वाटते.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांतील वाङ्मयीन व अवाङ्मयीन अशा दोन्ही स्वरूपांच्या विविध घटनांनी जग ढवळून निघाले. या उलथापालथीचा परिणाम साहित्यावरही झाला. लेखकांच्या मनात अस्थिरतेची, बेचैनीची भावना निर्माण झाली. त्यामुळे काही लेखकांची एकंदर मानसिकताच बदलली. संताप व विद्रोह ही त्या मानसिकतेची प्रमुख केंद्रे बनली. 'जुनें जाऊं द्या मरणालागुनि' हा सूर आला. हे जुने म्हणजे केवळ पारंपारिक नव्हे, तर जे प्रस्थापित होते तेही. मराठीतील अनियतकालिकांची चळवळ या विद्रोहातूनच जन्माला आली. तोवरच्या वाङ्मयीन नियतकालिकांत हा विद्रोहाचा सूर अधूनमधून उमटत होताच. पण आता तोच अग्रभागी आला. या अनियतकालिकांतील एकंदर लेखनात-विशेषतः कवितेत-एक हादऱ्याचे, धक्क्याचे काव्यशास्त्र अनुस्यूत आहे. या कवितेत नवे, धीट, रूपसंलग्न व भाषिक प्रयोग झाले. आणखीही नवे काही घडले. ते सगळेच स्वीकारणीय, स्वागतार्ह होते असे नाही. या अनियतकालिकांपैकी काहींनी केलेली 'सत्यकथे'ची होळी ही एक प्रतीकात्मक कृती होती. तिच्यातील आततायीपणा वगळून, तिच्यातील नकारवादाची व विनाशवादी प्रवृत्तीची चिकित्सा केली पाहिजे. खरे म्हणजे दरम्यान पुरेसा अवधी गेल्यामुळे ऐतिहासिक तारतम्याने या एकंदर चळवळीचेच विश्लेषण केले पाहिजे. या विश्लेषणातून प्रस्थापिततेबद्दलची त्यांची संकल्पना कोणती होती, ती एक होती की अनेकविध होती, त्या प्रस्थापिततेला विरोध कोणत्या स्थानिक व जागतिक, सामाजिक कारणांतून झाला, तो कोणी केला, त्या विरोधकांचे पुढे काय झाले- असे पुष्कळ महत्वाचे विचार हाती लागतील. एका अनियतकालिकात 'हल्ली लेखकाचा लेखकराव

होतो तो का ?' हा लेख प्रसिद्ध झाला. तो फार गाजला. त्या अनुषंगाने एक प्रश्न मनात येतोः "लेखक वेगळे व लेखकराव वेगळे असे काही असते का ? तसे मानणाऱ्या लेखकांचेही कालांतराने लेखकराव होतात का ?" त्याच अनुषंगाने सार्वकालीन व विशिष्टकालीन, प्रस्थापित व अप्रस्थापित, पारंपारिक व प्रयोगशील अशा सर्वच प्रकारच्या लेखकांत कोणत्या समान प्रवृत्ती असतात हे शोधता येईल; या शोधात त्या समान प्रवृत्तींचा परस्परानुप्रवेश होतोच; आणि म्हणून वर म्हटल्याप्रमाणे, विशिष्टकालीन लेखक हा सार्वकालीन लेखकाला संलग्न असतो.

दलित साहित्याचे काही प्राथमिक आविष्कार अनियतकालिकांच्या चळवळीत आढळतात. दलित साहित्यात व्यक्त झालेल्या संताप व विद्रोह या भावनांना केवळ वाङ्मयीन नव्हे, तर त्यांच्याहून कितीतरी पटीने अधिक महत्वाची अशी वैयक्तिक व समाजशास्त्रीय कारणेही होती. दलित साहित्यानेही वास्तववादाचे एक प्रखर रूप दाखवले. साहित्य फक्त नागर मध्यवर्गीयांचे, सवर्णांचे नाही, ते शोषित-वंचिताचेही आहे- म्हणून सर्वांचे आहे हा मूलभूत विचार दलित साहित्याने रुजवला.

साहित्याच्या क्षेत्रात मानवी अनुभवांचा, त्यातील सुखदुःखांचा, संघर्षांचा, अन्यायांचा, मानहानीचा जितका व्यापक पैस समावला जाईल तितका तो हवाच आहे. त्यातून नवी जीवन-सामुग्री पुढे येते, आणि तिचे भान नव्या वाङ्मयीन जाणिवा निर्माण करते. म्हणून या नव्या, काहीशा आक्रमक विद्रोही साहित्याचे स्वागत केले पाहिजे. पण त्या साहित्याची अतिरिक्त प्रशंसा करण्याचेही कारण नाही. अखेर तो समग्र साहित्याचाच एक भाग आहे. म्हणून समग्र साहित्याबाबतचे वेगवेगळ्या प्रकारचे असमाधान व तक्रारी दलित साहित्याबाबतही असू शकतात. त्यातील उणिवा आवर्त निर्माण करू शकतात. हे सगळे मोकळेपणाने, कोणतेही दडपण न बाळगता सांगितले पाहिजे. दलित साहित्याने आपल्या अभिरुचीचे वळण मूलभूतपणे बदलले का ? नसल्यास त्यातील काही दोष व उणिवाच या अपयशाला कारणीभूत आहेत का, हेही शांतपणे, विवेकाने तपासून पाहिले पाहिजे. असा खुला दृष्टिकोन दलित लेखकांनाही आवडेल, स्वागतार्ह वाटेल- निदान वाटावा. आज एकीकडे पारंपारिक अभिरुची व दुसरीकडे ही काहीशी अपराध-गंडातून वा दडपणातून आविष्कृत होत असलेली नवी अभिरुची यांचे

चमत्कारिक मिश्रण झाले आहे. ते एकंदर साहित्याच्या विकासाला उपकारक ठरेल असे वाटत नाही. या दडपणामुळे वर उल्लेखिलेल्या विद्रोही साहित्याच्या मूल्यमापनातही एकांगीपणा येतो. या साहित्यातील नव्या वळणांचीही फारशी दखल घेतली जात नाही. एक प्रातिनिधिक उदाहरण द्यायचे झाल्यास ते नामदेव ढसाळ या समर्थ दलित कवीचे देता येईल : 'गोलपिठा'पासून आरंभ करून 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहापर्यंतचा या कवीचा आविष्कार कसा बदलत गेला? काही समकालीन कवींच्या आविष्काराशी त्याचे नाते आहे का ? असे काही प्रश्न ढसाळांप्रमाणेच इतर अनेक दलित लेखकांबद्दलही उपस्थित करता येतील. दलित आत्मकथनांच्या संदर्भात 'आमचा बाप आन् आम्ही' या आत्मकथनाचे रूप कसे वेगळे आहे, आज प्रस्थापित दलितांची वाङ्मयीन भूमिका कोणती आहे, कालचे बंडखोरच आज प्रस्थापित झाले आहेत का, त्यांना प्रस्थापित नसलेल्या दलित लेखकांबद्दल कोणत्या वाङ्मयीन व समाजशास्त्रीय भूमिकांतून विचार करावासा वाटतो, दलित साहित्य प्रामुख्याने कविता व आत्मकथन या दोन रूपांतच का अडकल्यासारखे झाले, या साहित्यातील स्त्रीचित्रण पुरेसे समग्र आहे का, - असे व यांसारखे कित्येक प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे समकालीन लेखकांनी, समीक्षकांनी व वाचकांनी शोधली पाहिजेत. या अप्रस्थापित साहित्याला खरा न्याय या प्रकारच्या शोधातून मिळेल.

गेल्या पंचवीस वर्षांतील स्त्रीवादी साहित्य हाही प्रस्थापितताविरोधी दृष्टिकोनाचाच एक भाग आहे. त्यामागे स्त्रीमुक्तीची भक्कम चळवळ आहे. नव्या जाणिवेतून लिहिल्या गेलेल्या या स्त्री-साहित्याने व स्त्रीवादी साहित्याने एका नव्या जगाचे दर्शन घडवले. पुरुषी अहंकाराचा, त्यातून होणाऱ्या स्त्रीच्या शोषणाचा सर्वतोपरी निषेध केला. आधी वेगळ्या संदर्भात उल्लेखिलेल्या वैराण, मुक्त प्रदेशाचा शोध आजच्या काही लेखिका घेत आहेत. या शतकात तो शोध निश्चितच अधिकाधिक जिद्दीने घेतला जाईल व स्त्री-साहित्याची शाखा डवरून जाईल. पुरुषरूप प्रस्थापिततेला विरोध करण्याची मग आवश्यकताच उरणार नाही अशी आपण आशा करू या.

प्रस्थापितताविरोधाच्या संस्कृतीचे आणखी एक रूप प्रायोगिक नाटके व तत्संबंधित रंगभूमी यांच्यात दिसते. काही प्रायोगिक नाटकांतील संताप व विद्रोह,

आपण ज्या कालखंडातील साहित्याचा व चळवळीचा विचार करत आहोत, त्या कालखंडातील एकंदर साहित्यातही दिसतात. तो आजच्या मानसिकतेचाच एक भाग आहे. या मानसिकतेचा केंद्रस्वर जॉन ऑस्बोर्नच्या एका गाजलेल्या नाटकाचे शीर्षक वापरून बोलायचे झाल्यास Look back in anger हा आहे. ते संतापाने मागे वळून पाहणे खरे होते. कारण त्याला सामाजिक व वाङ्मयीन भूतकाळ जबाबदार होता. पण म्हणून पुढे पाहतानाही मनात प्रक्षोभच असावा का ? look forward in anger असेही म्हणायचे का ? प्रक्षोभ (anger) ही अशी एक सार्वकालीन वाङ्मयीन प्रेरणा नसते. त्याचे उद्रेक झाले पाहिजेत हे खरे, पण ते शमले पाहिजेत हेही तितकेच खरे. यावर उल्लेखिलेल्या इतर क्षेत्रांतील साहित्याकडून एक प्रकारचे नकारवादी व विनाशवादी तत्त्वज्ञान स्वीकारले जात आहे, अशी भीती वाटते. दुर्दैवाने ती भीतीही फार स्पष्टपणे बोलून दाखवली जात नाही. कारण साहित्याच्या क्षेत्राला आज एक प्रकारच्या सांस्कृतिक दहशतवादाची लागण झाली आहे. तिचा प्रतिवाद विरळपणेच होताना दिसतो. आपण जे साहित्य मानतो तेवढेच फक्त अस्तित्वात आहे असे गृहीत धरून उरलेल्या साहित्यावर एक मोठी नकाराची फुली मारली जाते. गंमत म्हणजे कधी या फुल्या एकमेकींवरही मारल्या जातात ! हे टाळता येणार नाही का ? नजीकच्या ज्येष्ठांबद्दल इतकी अनास्था का असावी ? हॅरोल्ड ब्लूम या समीक्षकाने तर याला 'प्रभावचिंता'च (anxiety of influence) म्हटले आहे- म्हणजे ज्येष्ठांचा आपल्यावर प्रभाव तर पडणार नाही ना, अशी चिंता- आणि म्हणून ज्येष्ठांशी संघर्ष. खरे तर चिंतामुक्त मनाने, सुसंस्कृतपणे, वादसंवादाच्या सुरात विवेचन व्हावे. त्या प्रकारचे विवेचन वाङ्मयाच्या प्रतिष्ठेला उठाव देणारे ठरेल.

साहित्यक्षेत्रात अलीकडे 'देशीवादा' बद्दलचा आग्रह प्रविष्ट झाला आहे. लेखकाची मुळे त्याच्या मातीत रुजलेली असतात, ही देशीवादाची सूत्ररूप भूमिका. ते एक सार्वत्रिक सत्य आहे, पण तो श्रेष्ठ साहित्याच्या मूल्यमापनाचा एकमेव निकष मात्र नाही. लेखकाचे त्यापलीकडे असलेले काही आस्थाविषय असतात, आणि ते त्याला व्यापक पातळीवरील मानवी जीवनाचा शोध घेण्यास प्रेरक ठरतात. परिसरात राहूनही परिसराबाहेर पडता येते; आपल्या मातीची महती गातगातच विश्वात्मक प्रत्ययांचा ध्यासही उरी बाळगता येतो. तो ध्यास

निर्मात्याला शोधक व तत्वचिंतक अशा दोन्ही भूमिकांकडे पायरीपायरीने घेऊन जातो. येथे लेखक पूर्ण, परिपक्व होतो. पण हा प्रतिवादही अनाग्रही वृत्तीने नेहमीच स्वीकारला जात नाही. त्यामुळे वाचकही भांबावतो. त्याच्या मनावर या मतमतांतराचा दबाव येतो. त्याच्या मनातील श्रेष्ठ साहित्याबद्दलचे निकष डळमळू लागतात. त्यातून एकीकडे प्रतिकारकेंद्री साहित्य व दुसरीकडे दबावकेंद्री वाचन अशी परिस्थिती निर्माण होते. ती साहित्यसमीक्षेच्या मोकळ्या विकासाला हितकारक नाही, एवढेच संक्षेपाने म्हणता येईल.

■■■

।आ।वा।ह।न।

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन मुखपत्र असलेल्या 'युगवाणी' चे प्रकाशन नव्याने सुरू करण्याचा निर्णय विदर्भ साहित्य संघाच्या नव्या कार्यकारिणीने घेतला आहे. आर्थिक अडचणींमुळे 'युगवाणी' चे प्रकाशन खंडित झाले होते. अनेक साहित्यिक, वाचक, लेखक आणि विचारवंतांनी 'युगवाणी' पूर्ववत सुरू ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. नवीन कार्यकारिणीच्या पहिल्या सभेत याविषयी सखोल चर्चा झाली आणि जुलै २००१ मध्ये युगवाणीचा पहिला अंक वाचकांच्या हाती देण्याचे निश्चित झाले. पूर्वी विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना 'युगवाणी' निःशुल्क पाठविली जात असे. कागद, छपाई, पोस्टाचे दर व इतर संबंधित खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सभासदांना 'युगवाणी' निःशुल्क पाठविणे शक्य नाही आणि ते व्यवहार्यही राहिलेले नाही. नवीन घटनेप्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना 'युगवाणी त्रैमासिक' सवलतीच्या दरात मिळू शकेल. वर्गणीचे दर एक वर्षासाठी खालीलप्रमाणे राहतील.

सभासद नसलेल्यांसाठी वार्षिक वर्गणी : रु. १००

सभासदांना सवलतीची वार्षिक वर्गणी : रु. ६०

सौ. शोभा उबगडे,
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

।नीरजा।

।मानुषी अभिव्यक्तीचा अनोखा आविष्कार।................

● जया द्वादशीवार

ख्यातनाम कवयित्री प्रा. प्रभा गणोरकर ह्या 'स्त्रियांची कविता' या विषयावरील आपल्या मार्मिक विवेचनात म्हणतात, "स्त्रियांची कविता म्हणजे त्यांच्या वाट्याला आलेल्या व देहमनाला व्यापून टाकणाऱ्या असह्य एकाकीपणाला फुटलेला शब्द!" वर्षानुवर्षे संस्कारांच्या दडपणा व दबावाखाली वावरणाऱ्या स्त्री-मनाने हा शब्द संयमित, गोंडस व सोशिक भाषेत, स्त्रीपणाच्या साऱ्या मर्यादा सांभाळून, व्यक्त करायचा प्रयत्न केला. पण हाच शब्द जेव्हा तथाकथित संस्कृती व मर्यादांची बंधने झुगारून त्याच्या अस्सल रूपात व्यक्त झाला तेव्हा अवतरली 'नीरजा' या कवयित्रीची कविता! १९८७ साली प्रकाशित झालेला 'निरन्वय' हा त्यांचा पहिला कविता संग्रह व १९९४ ला निघालेला 'वेणा' हा दुसरा. हे दोनच संग्रह या कवयित्रीची काव्यनिर्मिती; पण हे संग्रह म्हणजे स्त्रीत्वाशी निगडीत असलेल्या आदिम वेदनेला फुटलेले लखलखीत कोंभ होय. स्त्रीत्वाच्या विविध रूपांशी जखडलेली नाती व ही नाती सांभाळतांना तिला सहन कराव्या लागणाऱ्या 'वेणा'ची रोखठोक व निर्भीड अभिव्यक्ती व या अभिव्यक्तीला तेवढ्याच बिनधास्त व ज्वालाग्राही भाषेत प्रगटीकरण करणारी ही कविता मराठी मानुषी कवितेच्या प्रांतात खळबळ माजवणारी क्रांतिकारी कविता ठरते.

आपल्या कवितेशी हितगुज करतांना ही कवयित्री नकळत का होईना स्वतःच्या काव्याच्या रूपावर व प्रयोजनावर प्रकाश टाकते. तिच्याच शब्दात सांगायचे तर-

तुला नाही सजविले अलंकारांनी
की प्रेमधुंद शब्दांनी,

तुझ्या प्रत्येक शब्दातून
फुटावा आक्रोश अन्
जागवावी मेलेली मने
हा माझा प्रयत्न (वेणा, पृ.क्र. १६६)

आत्मभान आलेल्या व आत्मप्रतिष्ठा जीवापाड जपणाऱ्या एका संवेदनशील मनाच्या स्वप्नांचा जेव्हा चुथडा-चुथडा होतो तेव्हा या मनाचा आक्रोश बंध फोडून शब्दरूपाने या कवितेतून बाहेर पडतो. "साऱ्या अंगभर हुंदका फुटावा" असे चार शब्द आपल्या कवितेने बोलावे ही आंतरिक ऊर्मी या कवितेची मूळ प्रेरणा ठरते. आजीपासून आईपर्यंत व पुढे मुलीपर्यंत चालत आलेल्या वेदनांची मिरवणूक जेव्हा या कवितेतून व्यक्त होते तेव्हा साहजिकच पारंपारिक मने व मते त्याविरुद्ध आवाज उठवितात. मग या कवयित्रीसमोर प्रश्न उभा राहतो-

मी परजायची तलवार
माझ्या शब्दांची
की छाटून घ्यायचे हे हात
त्यांच्या धारदार
करकरीत नोटेने ? (वेणा पृ. क्र १६३)

आपल्या अभिव्यक्तीची तलवार परजून ही कविता जेव्हा तथाकथित सभ्य व्यवस्थेच्या बुरख्यांची चिरफाड करून संस्कृतीने निर्माण केलेल्या स्त्रीत्वाचे आदर्श पेटवते तेव्हा जाणवते ते त्यामागचे होरपळलेले व धगधगते मन आणि त्यामागची अस्सल पोटतिडीक !

स्त्री - रूपाचा कसून शोध घेणारी, तिच्या शारीर अनुभवांचे मनावर होणारे ढोबळ व सूक्ष्म परिणाम तपासणारी व ह्या मानसिकतेचा उलगडा करू पाहणारी ही कविता समीक्षेच्या प्रचलित निकषांवर तपासणे म्हणजे तिच्यावर अन्याय करण्यासारखे ठरते. भारतीय साहित्यात स्त्री-मनाची शरीर-विशिष्ट अनुभवसृष्टी आतापर्यंतच्या स्त्री-लिखाणात व लेखन प्रक्रियेत उमटलेली दिसत नाही. मुळांत हीच अनुभवसृष्टी तिच्या वाङमयीन ऊर्मीला ऊर्जा देणारी असते.

अनुक्रमणिका

लेखिकांनी आपल्या शरीर-माध्यमातून लिहावे ही स्त्री-वादी समीक्षेची एक मागणी आहे. स्त्रीचे लैंगिक व्यक्तिमत्त्व तिच्या वाङ्मयीन ऊर्जेपासून अलग कधीच करता येत नाही. तिची शरीरविशिष्टता तिच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वपूर्ण भाग असल्यामुळे स्त्रीच्या वाङ्मयीन सर्जनशीलतेवर त्याचा परिणाम अटळ व स्पष्ट असतो. नीरजाची कविता वाचतांना वरील वाङ्मयीन सत्य समोर ठेवल्यास कवितेच्या काव्यशैलीच्या व धाटणीच्या आगळेपणाचा सहज उलगडा होऊ शकतो.

स्त्रीची पारंपारिक भूमिका ही कविता पूर्णपणे नाकारते. याविषयी नीरजानेच एके ठिकाणी म्हटले आहे (ललित, मे १९९६), "पूर्ण स्वतंत्र असणाऱ्या घरातून विवाहानंतर पारंपरिक वळणाच्या घरात पडल्यामुळे त्यांतील विरोधाभासाचे चित्रण माझ्या अनेक कवितांमध्ये उमटलेले दिसते." साहजिकच 'स्त्री' म्हणून जगत असतांना वाट्याला आलेले बरेवाईट अनुभव, भावभावना, मनात उठलेली वादळे, कल्लोळ, चीड, संताप व उद्वेग व्यक्त करणारी ही कविता स्त्रीच्या वास्तव जीवनाचे पापुद्रे अतिशय धिटाईने व बेडरपणे सोलून दाखवते. प्रा. शंकर वैद्यांच्या शब्दात, "स्त्रीचे जगणे, मनाने व शरीरानेहि, आणि लाक्षणिक अर्थाने तिचे मरणेहि, किती क्लेशदायक पद्धतीने चालू असते याचे अस्वस्थ करून टाकणारे आणि अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे दर्शन या कवितांमधून घडते."या कवितेतील स्त्री आहे -

शरीराशी नेहमीच वचनबद्ध,
मनाला हवा तेवढा
वनवास,
तिची अगतिक धडपड
सुटकेसाठी; (वेणा पृ.क्र. ५०)

जन्मभर भोगाव्या लागणाऱ्या या देहविटंबनेची सुरूवात होते 'ती वयात येते' तेव्हा व अन्त होतो तिच्या बलिदानात. हे विदारक सत्य सांगतांना नीरजा म्हणतात -

ती वयात येते तेव्हा
देवाच्या पुरुषत्वाला

माज चढतो
अन्
ती होते पंचारती
रात्र चढत असतांना,
पेटण्यासाठी ! (वेणा पृ.क्र. २६)

विवाहात असते 'पुढ्यात भरजरी साडी । पुढील आयुष्याच्या लक्तरांचे आमंत्रण म्हणून ।' लग्नानंतरच्या हजारो घटका संपलेल्या व गोठलेल्या प्रेमाशी इमान राखण्यातच संपतात. मग त्या प्रेमाचे जाहीर प्रदर्शन करण्याच्या असह्य खेळाची हळूहळू सवय व्हायला लागते. मुलांपासून तो छळापर्यंत सारेच मुबलक मिळणाऱ्या स्त्री-आयुष्याची अगतिकता नीरजाच्या अनेक कवितांमधून ठळकपणे व्यक्त झालेली दिसते. रोज रात्री शय्यासोबत करताना सोबतीला असते मेलेले मुर्दाड मन, थंड शरीर व सक्तीची विलक्षण असहायता. स्त्री-शरीराची ही विटंबना शृंगारली जाते मातृत्वाच्या लेण्याने; पण आयुष्यात केवळ भोगदासीचीच भूमिका वाट्याला आलेल्या स्त्रीच्या मते मात्र -

ती घडवत असते
तेजस्वी, अलौकिक, साचेबंद दगड
देव्हाऱ्यात प्रतिष्ठापिण्यासाठी (वेणा पृ. क्र. १३५)
समागमाला सामोरे जाण्याचा क्षण ठरतो मग एक मरणमय धाक; कारण
तेव्हा निघते अंत्ययात्रा
मनाची
किचनपासून
बेडरूमपर्यंत । (वेणा पृ. क्र. ५७)

दानात पडलेले आयुष्य शेवटच्या क्षणापर्यंत निरर्थक जगायचे हा अस्तित्ववादी बाणा अंगी भिनवल्यामुळे ह्या कवितेतील स्त्रीला आयुष्य भासलेत एका कोऱ्या करकरीत कॅनव्हास सारखे. जगण्याचे विकृत रंग जेव्हा या कॅनव्हासवर उतरतात तेव्हा एक एक रंग नासत जातो व उरते ती सारं काही संपल्याची जाणीव. सगळे संबंध नुसत्या टिचकीने टिचून जातात आणि आयुष्याच्या पदरात वैफल्याचे दान पडते.

अनुक्रमणिका

नव्यानेच उमलून येते ही जाणीव
संपल्याची व फसल्याची;
हजारो अपमान शरीराचे व मनाचे (वेणा पृ. क्र. ५३)

या जगण्याला नाव काय द्यायचे हा यक्षप्रश्न समोर उभा राहतो. हे आयुष्य नाकारायचं की,

कि चिकटवायची लेबले
आपल्या शरीरावर
प्रत्येक नात्याच्या नावाची ?
ओलांडतांना प्रत्येक माप
जाणीव ठेवायची
साऱ्या पुराव्यांची? (वेणा पृ. क्र. ५१)

संसारात मन रमत नसूनही, संस्कारांमुळे व चालीरीतींच्या दडपणांमुळे तडजोड करत, अत्याचाराला तोंड देत जगण्याच्या आयुष्याचे एका कारुण्यपूर्ण शोकनाट्यात पर्यवसान होते. आईने तीट लावलेल्या गोऱ्यापान रंगावर काजळी चढते, सारे शरीर पोपड्यांनी फुलून येते, पण कुणीही विसरत नाही -

लावायला हळद
खणखणीत
त्याच्या दीनवाण्या
चेहऱ्याला ! (वेणा पृ. क्र.४४)

या कवितेचा आवाका जन्मापासून तो सरणापर्यंतची स्त्री-वेदना आपल्या कवेत घेतो. तरीही ही कविता स्त्री-रूपाच्या एकाच कोशात अडकलेली नाही. स्त्री-जीवनाची अनेक रूपे उलगडतांना या मानुषी-कवीची आत्मकेंद्रितता विधायक पातळी गाठते. महानगरातील लाल बत्तीच्या वस्त्यांत राहणाऱ्या अभागी स्त्रियांच्या भागधेयाकडे आत्मीयतेने पाहण्याचे भान ही कविता वाचकांना देते. शरीरविक्रयाला नाईलाजाने तयार होणाऱ्या पण जगाच्या दृष्टीने बाजारू ठरणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाचे भोग सांगतांना नीरजाच्या कवितेचा शब्द न् शब्द भावनेचा विस्फोट व विखार घेऊन येतो. गलिच्छ वस्त्यांमधले स्त्री-शरीराचे प्रवास व त्याचे उल्लेख आपल्या संस्कारीत मनाला सोसवत देखील नाही. पण या

कवयित्रीला "वेश्येच शरीर भासतं फुलासारखं हलकं फुलकं" कारण तिच्याकडे येणारा पुरुष नवरा असतो फक्त एकाच रात्रीचा. त्याचे भोग तोच भोगतो -

स्वतःचे अपराध
अंगभर गोंदून
येत नाही भर दिवसा
हिशेब मागायला (वेणा पृ. क्र. २८)

देहाच्या स्टँम्पपेपरवर असंख्य ठशांचा गदारोळ झेलीत जगणारी ही वारांगना निर्विकार मनाने ह्या अनोळखी ठशांचे गुंते सोडवित सिद्ध करत असते-

चुरगळलेल्या शरीराचा कागद
पुन्हा एकदा
कोरा करकरीत
नवीन ठसे ठसवून घ्यायला (वेणा पृ. क्र. ६४)

देहधून चेतवणाऱ्या या स्त्रियांना स्वतःच्या देहाविषयी वाटणारी बर्फाळ निर्लेप वृत्ती, अलिप्तता जेव्हा नीरजाच्या कवितांमधून डोकावते तेव्हा मन सुन्न होऊन जाते. स्वपीडनात गुंतत जाणाऱ्या या अभागी जीवांना सुखाचा अन्य मार्ग शिल्लक नसतोच. प्रत्येक स्त्रीला जगावे लागते ते पुरुषाच्या संदर्भात. एखादीने बंडखोरी करून एखाद्याला नाकारलेच तर तिचे प्राक्तन अहिल्येसारखेच - नव्या पुरुषाच्या स्पर्शाची वाट पहात शिळा होऊन राहणे व मग मन विदीर्ण करणारा प्रश्न नीरजा विचारतात-

पुनर्वसन हे असेच असते कां ?
त्याच्याशिवाय पर्याय नाही
अन् वंशाशिवाय उद्धार नाही ! (वेणा पृ. क्र. ३३)

म्हणून ही मानुषी कवी सावित्रीला एक परखड प्रश्न विचारते,

सत्यवानाने डागले असते
तोंडावर
आणि जाळले असते तुला
तुझ्या बापाच्या राज्यासाठी
तर किती घातल्या असत्या

प्रदक्षिणा

वठलेल्या बुंध्याला ? (वेणा पृ.क्र. ४७)

वाळवंट भोगता भोगता स्वतःच वाळवंट होणाऱ्या व जिवंतपणी शरीरभर पसरलेल्या बेभान वणव्याचा चितेत शेवट होणाऱ्या प्राक्तनाचा आक्रोश व्यक्त करतांना ही अभिव्यक्ती उपरोधगर्भ रूप धारण करते. खूपदा तर ती आपल्यासमोर भारतीय व ग्रीक पुराणातील मिथकांच्या माध्यमातून एक नवे रूप लेवून येते. 'व्यथा' या कवितेतील द्रौपदी स्त्रीची सार्वकालीन व्यथा सांगतांना म्हणते,

कुलशील पाहत बसले
अन् शेवटी
स्वैरिणीच्या पाच पापांच्या ताटातील
भिक्षा झाले. (निरन्वय पृ. क्र. २३)

नीरजाच्या मते हे द्रौपदीचे पहिले वस्त्रहरण जे स्वयंवराच्या माध्यमातून वर-निवडीच्या स्वातंत्र्याच्या साऱ्या वाटाच बंद करून टाकतात. बापाच्या इच्छेनुसार किंवा प्रचलित विचारप्रणालीनुसार पुरुषार्थ गाजवणाऱ्या वरालाच मुलीला वरावे लागते. ही स्वत्वहरणाची जाणीव त्यावेळी महाभारतकालीन द्रौपदीला झाली नाही, पण आजच्या द्रौपदीला ही शोकात्म जाण व जाग आली आहे. म्हणून ती म्हणते,

कुंडाच्या चार चौकटीतला मासा आंधळा झाला
तेव्हा साऱ्या वाटा बंद झाल्या होत्या
अंधारात मी तरी कुठे धर्म शोधणार ?
अधर्मालाच दिली सारी दाने
तेव्हापासून आजपर्यंत
किती वस्त्रहरणे, किती वस्त्रहरणे ? (निरन्वय २३)

ही व्यथा एकीकडे महाभारतातल्या द्रौपदीच्या स्वयंवरातील कोंडीची व दुःशासनाने केलेल्या वस्त्रहरणाची दुधारी व्यथा ठरते, तर दुसरीकडे पुरुषप्रधान संस्कृतीत 'लग्न' या प्रकाराने व विधीने चालवलेली स्त्रीच्या अपमानाची व लाचारीची व्यथा सूचित करून जाते.

स्त्रीच्या प्राकृतिक रूपाची पुरुषप्रधान संस्कृतीने केलेली परवड, पुरुषांना

स्त्री-देहाविषयी वाटणारी असीम लालसा व लिंगपिसाट वृत्ती यामुळे नीरजाच्या कवितेतील स्त्री-पुरुष नात्याची परिणती समग्र वैफल्याची व विद्रोहाची आहे. अंतिम सत्य हेच की,

शेवटी उघड्या वक्षावरून फिरणारा
दहा रुपयांचा हात
आणि काळ्या मण्यांत गुंतलेली हक्काची वासना
ह्यात मी कोठे ? (वेणा पृ. क्र. ३३)

देहवासना या मानवी जीवनाचे अटळ भागधेय आहेत हे वास्तव स्वीकारल्यावर देहभोग भोगणे आलेच कवयित्रीच्याच शब्दांत "शेवटी प्रेम म्हणजे पेटलेल्या शरीराची वस्त्रगाळ राखच." जन्म-मृत्यूचे सोहळे, वासना-विकारांचा गाळ अन् जीवनाचे विध्वंसी जाळे जीवाला गुदमरवून टाकते. अनंत आकाशात चित्कारत घिरट्या घालणाऱ्या वासना ह्या कोणत्या जन्मीचे पाप हा प्रश्न पडतो. देहाचे उत्सव संपल्यावर शरीराच्या चिंध्या होतात व उरते ते एक प्रचंड रितेपण, एक प्रचंड पोकळी.

परंपरागत स्त्री-पुरुष नात्याचा सर्वच दृष्टीने ही कविता निषेध करते. परंपरेने, रूढींनी व संस्कृतीने या नात्यांमधील गोडवा व कोवळेपणा हिरावून घेतला आहे. अश्मीभूत कोरड्या सबंधांच्या या जगात प्रेममय सबंधांना परंपरेचा पाडाव करूनच उजाळा देता येईल. म्हणून आपल्या स्वप्नस्थ तेरूओला नीरजा म्हणते,

तू शिणवून घेतला आहेस
तुझा देह व मनही
ह्या रुढीबद्ध परंपरेत
स्वतःला वागवता वागवता
फ़क्त एकदा तोडून टाक तुझ्या भोवतीचे
हे प्रचंड तट, अन् मग पहा
तुलाहि येईल हिरवेपणा
श्रावणसरींनी झोडपल्यानंतरचा ! (वेणा पृ. क्र. ७१)

प्रत्येक वेळी शरीरभोग क्लेशकारक असतात असे नाही. प्रेमातले शरीराचे अस्तित्व, त्यांतील आस्वादता व सुखमयता अनेक कवितांमधून प्रगट झालेली

दिसते. प्रियकराविषयी वाटणारी अनावर ओढ, त्याला दिलेली साद व त्याच्या आठवणीने उचंबळून येणारा भावनांचा हिंदोळा यांतून ही कविता आपल्याला उत्कटतेच्या व तीव्रतेच्या टोकावर घेऊन जाते. 'सर्वांगातून धुमारणारी सूर्यफुले फुलतात जेव्हा सखा समिंदर होतो व त्याचा रंग प्रियतमेच्या भाळी गोंदला जातो. प्रेमरसाच्या सुखात न्हाऊन निघाल्यानंतर डवरून आल्याचा आनंद, शृंगारातील मजा, सूर्य पेटलेल्या रात्री व त्यानंतर येणारी राजस ग्लानी, प्रियकराच्या असोशीला साद न देता आल्यामुळे येणारी असहायता व विकलता इ. अनेक प्रणय-भावनांच्या रागदारीची मैफल नीरजाच्या प्रेममय कविता रंगवतात.

स्त्री-जीवनाच्या दैहिक भोगवट्याचा आलेख सतत चढत्या भाजणीचा असतो. याला केवळ पुरुषच जबाबदार आहेत असे नाही, तर स्त्रीचा स्वतःविषयीचा दुटप्पी दृष्टिकोनही तितकाच जबाबदार असतो. एकीकडे ती देहस्विनी बनून पुरुषांच्या पापी वासनेचे भक्ष्य बनते (द्रौपदी) तर दुसरीकडे आई बनून (गांधारी) त्याच पुरुषांच्या पापांकडे दुर्लक्ष करते. अशा दुटप्पी वृत्तीला ही कविता बजावते,

तूही डोळ्यांवर पट्टी बांधून घे
पापं दुर्लक्षिली की
आई होणं सोपं असतं (निरन्वय पृ. क्र. ५१)
जोपर्यंत हे ढोंग चालते तोपर्यंत कुठलाही बदल नाही; कारण
तू समजतेस तेवढी चांगली नाहीस तूं
तूं खेळणं आहेस अनेकांच्या हातातली (निरन्वय, पृ. क्र. ५१)

नीरजाच्या जीवनविषयक प्रतिक्रिया जेव्हा धर्म, राजकारण, संस्कृती व सभोवतालच्या वातावरणाला जाऊन भिडतात, तेव्हा त्या त्यांतील पाखंडी व मतलबी वृत्तींची चिरफाड करतात. महानगरातल्या गोठलेल्या रांगा, फाईल्सचे ढिगारे, माणसांची अश्रद्ध, नामर्द व षंढ वृत्ती, थंड मने, अर्थ हीन जगणे, निष्क्रिय राजकारण, सर्वत्र भ्रष्टाचारांचा बुजबुजाट व लोकलच्या संथ लयीवर चालणारे हताश गाणे तिथल्या आयुष्याचा आनंद थिजवून टाकतात. या मुखवट्यांच्या जीवनावर प्रहार करतांना ही कविता कडवटपणे म्हणते,

आता जन्मायचे

सारेच पांगळे
पंख छाटलेले
हिरोशिमाचे विकृत अवशेष (वेणा पृ.क्र. ११९)

अशा विकृत समाजाच्या व संस्कृतीच्या भविष्याची प्रचंड धास्ती या कवयित्रीला वाटते व त्यामुळे धर्म व संस्कृति-रक्षकांविरुद्ध अनेक ठिकाणी या काव्यात चीड, उपहास व कडवा विरोध व्यक्त झालेला दिसतो.

नीरजाचा इंग्रजी वाङ्मयाचा सखोल व्यासंग असल्यामुळे या वाङ्मयातील अस्तित्ववादी लिखाणाचा या काव्यसंग्रहावर प्रभाव पडलेला दिसतो.

प्रख्यात आंग्ल कवि टी.ए.इलियट च्या Waste Land या महाकाव्याने आपल्याला हादरवून सोडले व त्यामुळे मनांत अस्तित्वाविषयीचे प्रश्न उभे राहू लागले, अशी कबुली खुद्द नीरजानेच आपल्या परिचयात दिलेली आहे. म्हणूनच आधुनिक स्त्रीच्या उत्कट, प्रक्षोभक भावस्थितीचे वस्तुनिष्ठ चित्रण ही कविता करते. ती स्त्रीच्या विद्रोहाची विलक्षण स्फोटक व ओजस्वी कविता आहे. पारंपारिक, आडवळणी, गुळगुळीत व मुग्ध भाषाविष्कार तिला निरुपयोगी ठरतो. मराठी मानुषी कवितांमध्ये अभावानेच आढळणारा स्त्रीच्या लैंगिक संवेदनांचा धीट आविष्कार या कवितेद्वारा जाणवतो. या धिटाईतून प्रतीत होते ती कवयित्रीची त्या अनुभवाला भिडण्याची व त्यातील सत्य जोखण्याची शक्ती. स्त्री-जीवनाची कोंडी विशद करून ती फोडायची ही या कवितेची भूमिका असल्यामुळे या कवितेच्या भाषेची प्रखरता औचित्यपूर्ण वाटते. महानगरीय जीवनाचे व्यस्ततावादी यथार्थ चित्रण, धर्म, रुढी व पुरुषप्रधान संस्कृतीवर तीव्रतेने केलेला घणाघाती हल्ला, पौराणिक व वाङमयीन मिथकांचा प्रचलित आयाम देऊन केलेला वापर व मुख्यतः स्त्री-जीवनाच्या 'वेणा'चे केलेले कारुण्यमय चित्रण इ. नाविन्यपूर्ण आशयामुळे या कवितेला वेगळाच आयाम प्राप्त होतो. प्रा. रा.ग. जाधव ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, "ही कविता वाचल्यावर वाचक पूर्वीसारखा राहणे शक्यच नसते."

प्रा. डॉ जया द्वादशीवार
हनुमान मंदिर वार्ड,
चन्द्रपूर

■■■

अनुक्रमणिका

। कथावाङ्मयाच्या विकासाची दिशा ।
। 'आंधळ्याच्या गाई' ।......................................

● **स्मिता कापसे**

'**झा**कळुनी जळ गोड काळिमा' अशा भावावस्थेला आणणारं, करुणा आणि विषण्णता यांनी मन गलबलून टाकणारं, माणसामाणसातील नाते संबंधांचं भेदक दर्शन घडवणारं एक जबरदस्त पुस्तक म्हणून मेघना पेठे यांच्या 'आंधळ्याच्या गाई' चा निर्देश करता येईल. 'हंस अकेला' नंतर प्रसिद्ध झालेला मेघना पेठेंचा हा दुसरा कथासंग्रह.

राजहंस प्रकाशनाने जून २००० मध्ये प्रकाशित केलेल्या 'आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहात केवळ पाच कथा आहेत. या पाचही कथा 'हंस' आणि 'दीपावली' च्या दिवाळी, १९९७; १९९८ व १९९९ च्या अंकात पूर्वप्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या आता संग्रहबद्ध झाल्यामुळे मेघना पेठे यांच्या जीवनजाणिवेचे सखोल दर्शन घडवण्याला उपकारक ठरले आहे.

बापाची अपार माया देणाऱ्या तात्या नं १ ने अचानक निघून जाणं, आईची माया न देणाऱ्या आईनं आश्रय घेतलेल्या गर्भश्रीमंत तात्या नं २ च्या समलिंगी संभोगाची अजाणत्या वयात शिकार होणं; जाणतेपणी तात्या नं २ ने खेळलेल्या खेळाचा अर्थ उलगडून नपुंसकत्वाचं भीषण दुर्दैव भोगणं आणि परिणामी नैतिक-अनैतिकतेचे वैयर्थ लक्षात येऊन जीवनाच्या सर्वच आकांक्षांकडे 'न नैतिक बघ्याची' भूमिका घेणं हे एक सूत्र आणि वसुआत्याचा आपण लग्नाशिवाय झालेला अनौरस मुलगा आहोत हे जन्मरहस्य कळणं हे दुसरे सूत्र - अस्तित्वाला सुरुंग लावणाऱ्या या दोन आशयसूत्रांमध्ये 'एक ननैतिक बघ्या' ही कथा विणली गेली आहे. आई आणि बाप या तथाकथित् सुसंस्कृत नात्यांचा वर्ख खरवडत तत्त्वचिंतनाच्या पातळीवरून नियतीची अटळता (पोपटाच्या पिलाची गोष्ट) मेघना पेठे यांनी या कथेत व्यक्त केली आहे. "आएँ कुछ अब्र' ची निवेदिका कथेतील 'ती' च्या आजवरच्या आयुष्यात भोगलेल्या 'अजाबां'चा (यातनांचा) अनुभवपट उलगडत आहे. आपल्या घरी आश्रित म्हणून राहिलेल्या मोहनविषयी मुग्ध वयात वाटलेलं आकर्षण आणि त्या आकर्षणाला मूर्त नात्याचं रूप

येण्याआधीच मोहनचा झालेला मृत्यू. मोहनच्या नसण्याची जिव्हारी झालेली जखम आणि मोहनची प्रतिमा मनात सांभाळत घालवलेल्या पस्तीशीपर्यंतच्या वयात, लग्नाच्या बाजारातील एक उपभोग्य विक्रेय वस्तू म्हणून आपली किंमत वाढविण्यासाठी बापासकट इतर कुटुंबियांनी सुचवलेले नाना उपाय आणि ही 'वस्तु' घेण्यासाठी आलेल्या 'गिऱ्हाईकांनी' आपल्या सवयी लहरी पुरविण्यासाठी 'घरात आणलेली एक बाई' एवढ्याच दृष्टिकोनाने केलेली सौदेबाजी यावर उपहासगर्भ विनोदाने भाष्य करीत, आपल्या वरपांगी सुमार चेहऱ्यामागे दडलेले आपले सुसंस्कृत जाणतेपण 'ती' व्यक्त करते. "पेल्विक मसल्स जून झाल्यावर काय उपयोग आहे तुझा ?' असं म्हणणाऱ्या अण्णांच्या-बापाच्या-घराचा त्याग करून स्वतंत्र राहणाऱ्या, स्वतःच वरसंशोधन करणाऱ्या 'तिला' आपल्या आंतरिक ऊर्मीशी जुळणारा, 'माझिया जातीचा मज' एक सहमानव भेटल्याचा आनंद मिळतो. मित्र, प्रियकर, नवरा अशा कुठल्याच नात्याचे शिक्कामोर्तब न झालेले एक मधुर नवे नाते जन्माला येते. दोन अनामिक व्यक्तींमध्ये "ती' आणि 'नि.श.सा.पा.फू.' यांच्यात ! 'अजाबा'चा अंत सुचवणारी "आएँ कुछ अब्र' ही "आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहातील एकमेव प्रसन्नान्तिका.

'अठरावा उंट' या कथेत कलाजीवन आणि व्यक्तिगत जीवन यांचा परस्पर छेद दिसतो. नाटकाच्या समान आवडीतून संजीववर भाळलेल्या, संजीवबरोबरच्या सांसारिक आणि नाट्य जीवनात समरसून सहभागी झालेल्या सुजाताला आत्ममग्न संजीवकडून होणाऱ्या मानसिक ताणाने घडणाऱ्या गर्भपातानंतर कळून चुकते की संजीव फक्त 'त्याच्यासाठी' जगतोय; आपण त्याच्या लेखी फक्त त्याची 'बायको', सावली, अस्तित्वहीन फालतू कस्पट ! पण नाट्य दिग्दर्शक आबा चौबळ सुजाताला 'अठरावा उंट' - तिचं तिच्यासाठी असलेलं प्रयोजन- देतात. महाराष्ट्राची 'इन्ग्रिड बर्गमन' झालेली सुजाता साने स्वतःच 'ऊन' बनते. संजीव सानेला असह्य व्हावं इतकं दाहक ऊन ! आता 'डाव बरोबरीत सुटला' पण जिंकण्याचे समाधान हरवून ! जिंकूनही वैफल्याची यातना देणारी 'अठरावा उंट' ही कथा आहे.

जगणार की मरणार, असणार की नसणार या शक्यतांच्या तलवारीच्या टोकावर असलेल्या, मेंदूज्वराने बेशुद्ध झालेल्या आपल्या थोरल्या भावाच्या-आदीलच्या - समवेत हॉस्पिटलमध्ये घालवलेल्या काळात मनात उसळलेला आदील विषयीच्या भावबंधनांचा कल्लोळ 'सहोदराऽ' या कथेची निवेदिका 'मी' न्याहाळत आहे. (आबा लहानपणी 'मी' ला बेबी म्हणत)

अनुक्रमणिका

सख्खे बहीणभाऊ असूनही आदीलच्या देखणेपणाशी विसदृश असे आपले सामान्य रूप; आईने (वैनीने) आदीलला मायेचं, कौतुकाचं दिलेलं झुकतं माप व 'वंशाचा दिवा' म्हणून आदीलविषयी बाळगलेल्या अपेक्षा, ही (मुलगी) असली नसली तरी सारखीच (पोरीची जात धरन्यातली न्हवं) ह्या संस्कृतीने स्त्रीमनावर लादलेल्या संस्कारांच्या पक्क्या धारणांमुळे स्वतःला जाणवलेलं उपरेपण आणि म्हणूनच की काय आईविना पोरक्या असलेल्या अवनीशबद्दल वाटलेला समंजस जिव्हाळा आणि आबांनी आपल्याला उलट्यापालट्या केलेल्या पिशवीप्रमाणे अंतर्बाह्य जाणलेलं आहे अशी खात्री, अशा अनेक धारणांनी "मी' घडलेली आहे. पण त्याचबरोबर अंगभूत बंडखोरीमुळे सगळ्या संस्कृतिबद्ध संकेतांना आव्हान देणारा "मीच आबांचं नाव लावणार ", 'आबा माझ्याच मांडीवर डोकं ठेवून मरणार' असा घट्ट विश्वास तिला वाटतो. आपले दुय्यम स्थान जाणवल्यामुळे, आदीलविषयी, त्याच्या दडपणाविषयी, त्याच्या ज्ञानाविषयी कुतूहल वाटत असूनही त्याला मिळालेल्या प्रथम स्थानाबद्दल असूया वाटून आपणच प्रथम असल्याची, नवं कोरं सगळं प्रथम आपल्याला मिळाल्याची स्वप्न 'मी' पाहते. हा सगळा आठवणींचा पट मनात उलगडत जातांना, अनिश्चिततेच्या त्या काळात 'घडोऽ काही तरी घडो' असा मनाने आक्रोश केला असता "सगळा अनित्याचा पसारा आहे हे जगबिग' याचा क्रूर प्रत्यय आणून देणारा, शुद्धीवर आलेल्या आदीलच्या स्मृतिहीनतेचा भीषण भूकंप सगळ्या इच्छा-आकांक्षा-स्वप्नांचे इमले जमीनदोस्त करून टाकतो. राहिला तो केवळ यातनांचा ढिगारा ! स्मृतिहीन आदीलविषयी 'मी' चं मन अपार ममतेनं, भरलेल्या करुणेनं जसं दाटून येतं तसंच वाचकाचं मनही दयार्द्र होतं. विषण्णतेचा, सुन्नपणाचा अनुभव देणारी अशी ही 'सहोदराऽ' !

'आस्था' हा व्यावसायिक चित्रपट आणि गवार ही सामान्य भाजी या दोन प्रतीकांमधून जीवनाचं कृत्रिम, उथळ, दिखावू रूप आणि रुक्ष, अस्सल, व्यावहारिक रूप यांचं दर्शन घडवणारी कथा म्हणून 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेचा विचार करता येईल. सारख्याच महत्त्वाच्या असलेल्या तीन व्यक्तिरेखा केवळ याच कथेत आढळतात. अनिरुद्ध, मिथिला आणि उषा या पात्रांनी आपल्या जगण्याची स्वतःची केलेली तपासणी या कथेत दिसते.

बाह्यतः दिसलेल्या अनिर्बंध, कलंदर वृत्तिसाम्यामुळे विवाहबंधनात न अडकता एकत्र राहणारे मिथिला आणि अनिरुद्ध कालांतराने विभक्त होतात, कारण दोघांच्या जीवनधारणांची बैठक एकाच भक्कम पायावर उभारलेली नाही हे त्यांना कळून चुकते. आपल्या आईबापाच्या परस्परसंबंधाच्या चटक्यांनी

होरपळलेली मिथिला लग्न, घर आणि मूल या तीनही बेड्यांमध्ये स्वतःला अडकवू इच्छित नाही. पण 'आपल्या स्त्री' विषयी मालकी हक्काची जाणीव झालेल्या अनिरुद्धाला 'घरा'साठी लग्न आणि 'स्त्रीची नैसर्गिक ऊर्मी', 'स्त्री पुरुषांना जोडणारा एक नवा बाँड' या गोंडस संकल्पनेसाठी मूल हवं. मिथिला लग्न आणि मूल दोन्हीला नकार देते; कारण तिच्या मते 'आत यायला आणि बाहेर जायला दरवाजा असलेलं ते 'घर' आणि 'फक्त आत येण्याचा दरवाजा असलेली आणि मग एकमेकांच्या उरावर बसायला लावणारी ती 'कोठडी' जी लग्न निर्माण करते तसंच मूल म्हणजे एकाने दुसऱ्यास छळावे या खेळासाठी तरतूद - 'the favourite game plan of all spouses'

साखळीने बांधलेल्या कुत्र्याला मिळावे तेवढे स्वातंत्र्य बापाच्या घरी मिळालेल्या उषाला बापानेच आपल्यासाठी नवरा म्हणून ठरवलेला, हसवणारा, बायकांच्या दमनाविषयी पोटतिडकेने बोलणारा, स्वयंपाकघरात येऊन मोकळेपणाने वावरणारा अनिरुद्ध आवडला होता. पण लग्न झाल्यावर, 'मला मूल नकोच होतं, तुलाच आईपणाची असोशी अनावर झाली होती' असं म्हणून मूल आणि घरातील कुठल्याच कामाची जबाबदारी न घेणारा, स्वतः कोणत्याही पदावरचे उत्तरदायित्व न स्वीकारलेला अनिरुद्ध आपल्याला मात्र क्षुद्र लेखून आपला अपमान करू शकतो याचे भान आलेली उषा अनिरुद्धाचा मनोमन तिटकारा करते. पण हतबल होऊन आयुष्य कंठण्यापलीकडे आपण काही करू शकत नाही हेही जाणते.

मिथिला आणि उषा यांच्याबरोबर वेगवेगळं आयुष्य जगलेल्या अनिरुद्धाला आपल्या 'मुखवट्याची' ओळख पटली आहे, पण ती समर्थ मिथिलेच्या बाबतीत, उषाच्या नव्हे ! पत्नीला तुच्छ लेखण्याचा नवरा म्हणून आलेला पुरुषी अधिकार तो बाळगून आहे. 'चटका बसला की तळ्यात, मगर दिसली की मळ्यात' ही आपली पळपुटेपणाची वृत्ती त्याला व्यर्थ, शून्य, बेघर, मिथिलाहीन वाटायला लावते. भूमिकांची सोयिस्करपणे अदलाबदल करणारा अनिरुद्ध उथळ, स्वार्थी, कावेबाज, दांभिक पुरुषवृत्तीचे प्रतीक आहे.

'स्त्रीवादी' असे लेबल न लावताही 'आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहातील कथांमधील स्त्रियांनी घेतलेल्या आत्मशोधाची दखल घ्यावीच लागते. 'आपले बाईपण म्हणजे आपण नव्हे' याचे भान सुजाता (अठरावा उंट), शिरीन (आएँ कुछ अब्र) आणि मिथिलेची आई (आस्था आणि....) ह्या पात्रांना झाले आहे. 'ती अडीच तीन इंचाची एरिया म्हणजे मी नव्हे' असे शिरीनचे मत, तर मिथिलाच्या आईचे म्हणणे असे की, 'मी काही फक्त बाई

अनुक्रमणिका

नव्हते. 'My total being was not about that bloody hole.' सुजाताला जाणवलं, आपण संजीवशी लग्न केलं - संजीव नावाचं जे एक भलंबुरं रसायन होतं किंवा असेल असा आपला अंदाज होता त्याच्याशी. पण संजीवनं कुठं आपल्याशी लग्न केलं ? त्याला एक नाकीडोळी नीटस, अव्यंग ...... जी आल्यावर दार उघडेल, शेज सजवेल आणि पेज भरवेल अशा कुठल्याही बाईशी लग्न करून चाललं असतं त्यानं लग्न केलं तेही, चारचौघांसारखं आणि चारचौघांसाठी, सभोवारच्या गर्दीत एक 'बाई' आपली आपल्यासाठी आरक्षित !' करण्यासाठी.

मात्र 'बाई'पणातून मुक्त झालेल्या, स्वतःचं स्वतंत्र, वेगळं व्यक्तिमत्त्व मिळवलेल्या या स्त्रियांना घराची ओढ मनातून आहेच असेही दिसते. त्या मुक्त आहेत, पण स्वैर नाहीत. 'हवं असेल तेव्हा आणि तरच घरात बसायचं' ही मोकळिक मिळविलेल्या मिथिलेला आपल्या घराचं कुलुप उघडतांना 'अन्याला रोज दार उघडून मिळत असेल, आपल्याला मात्र वर्षानुवर्ष आपलं बंद घर स्वतःलाच उघडावं लागतं ?, अशी उदास करणारी खंत वाटते आणि 'कोठडी'तील जिवंत माणसाच्या उबदार स्पर्शाला आपण आचवल्याची वेदना तिला स्पर्श करते. तर बंदिस्त करणाऱ्या घरातून बाहेर पडलेल्या सुजाताला माणसांच्या गराड्यात राहूनही एकाकीपण वेढतं आणि 'आपल्या'वर मुखवटा चढवलेल्या या झगमगत्या जीवनावर 'कधी पडणार हा पडदा आबा ?' असा प्रश्न व्याकुळलेलं तिचं मन आर्ततेनं विचारतं.

पुरुष वर्चस्वाखाली दडपलेल्या पण आत्मभान आलेल्या या स्त्रियांखेरीज या कथासंग्रहातील काही दुय्यम स्त्री-व्यक्तिरेखा विविध स्त्रीरूपाची प्रतीके वाटतात. ननैतिक बघ्याची तथाकथित आई-मूक, सोशिक मुर्दाडपणा; वसुआत्या - निरपेक्ष, अबोल मातृत्व; सुषमा-सूडभावनेने पेटलेलं कामुक स्त्रीत्व; वैनी-पुरुषवर्चस्वाची स्वीकृती. व्यक्तित्वाचा संकोच झालेल्या या पात्रांपुढे अभिनय (सुजाता), संगीत (आएँ कुछ अब्र मधील ती), काव्य (उषा) अशा कलांनी आंतरिक विकास झालेल्या स्त्रियांच्या वाट्याला आलेली उपेक्षा, अन्याय त्या स्त्रियांविषयी वाचकाच्या मनात सहानुभूती, आदरभाव निर्माण करतात.

मेघना पेठे स्त्रीवर्गाच्या व्यथायातनांचा आलेख काढत असतांनाच कुटुंब आणि समाज या घटकांकडून परावलंबी असलेल्या मुलांचे शोषण अधोरेखित करतात. सुस्थित कुटुंबात जन्माला येऊनही, मुलगी असल्यामुळे, 'आएँ कुछ अब्र' मधील 'ती' व 'सहोदराऽ' मधील 'मी' यांना 'संरक्षक' असणाऱ्या जन्मदात्या आईबापांकडून मानसिक अवहेलना सोसावी लागते आणि मुलगा

म्हणून जन्माला येऊनही जन्मदात्यांकडून परित्यक्त झाल्यामुळे 'एक ननैतिक बघ्या' मधील 'मी' ला पालक असलेल्या तात्या २ कडून लैंगिक शोषणाची शिकार नकळत्या वयात व्हावे लागते. परिणामी नपुंसकत्व वाट्याला येते. अर्भक मुलग्याचा लिंगविच्छेद करून त्याला हिजडा बनवणाऱ्या समाजाच्या क्रौर्याचाही निर्देश या संग्रहात आढळतो. पाच कथांपैकी दोन कथांत नपुंसक आणि हिजडा या व्यक्तिरेखा आणून मेघना पेठे यांनी समाजाकडून घृणास्पद मानल्या गेलेल्या या उपेक्षित वर्गाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

'आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहामध्ये मेघना पेठे आई-बाप, पती-पत्नी, आईबाप-मुलं ह्यांच्यातील नात्यांचे पितळ उघडे करीत त्यांचा हिणकसपणा प्रत्ययास आणतात. पुरुषप्रधान समाजधारणांना निर्भयपणे आव्हान देतात. मिस्किलपणे त्यांना हास्यास्पद ठरवतात. पण त्याच बरोबर बहीणभावाच्या नात्यातील माधुर्याला आंतरिक जिव्हाळ्याने स्पर्श करतात. त्या त्या कथेतील भावानुभवाला अनुरूप अशी निवेदनशैली वापरतात. 'एक ननैतिक बघ्या' मधील पात्राने बेवारस कुत्र्याच्या पिल्लाला आत्मनिवेदन करणं केवळ निवेदनाच्या वैचित्र्यासाठी नसावे.

कुत्र्याच्या बेवारसपणाशी निवेदकाचे अनौरस बेवारशीपण जोडणारे तर ते आहेच, पण त्याखेरीज रक्ताची नाती जेव्हा अर्थशून्य ठरतात तेव्हा मूक प्राण्यांशी नातं जोडणं स्वाभाविक असण्याचं ते द्योतक असावे. 'सहोदराऽ' कथेची आत्मनिवेदनशैली कारुण्याने ओथंबलेल्या स्निग्ध बंधुभावाच्या उत्कट आविष्कारासाठी हळवी, काव्यात्मक झालेली आहे. इतर कथांमध्ये उपहास, उपरोध, विनोद ह्यांचा स्वीकार करीत स्वगताचा पदर मिसळलेली तृतीय पुरुषी निवेदनशैली आढळते. नियती, मनुष्यजन्म वगैरेसंबंधीच्या तात्त्विक चिंतनाने कधी निवेदन गंभीर बनते.

निवेदनाचे अंग असलेली या कथासंग्रहातील भाषा तिच्या खास वैशिष्ट्यांनी लक्ष वेधून घेते. ज्ञान आणि श्रम सूचित करणाऱ्या ज्ञानेश्वरीतील ओव्यातील चंद्रसूर्यांच्या प्रतिमा, भूमिकांचा जीवघेणा विपर्यास सुचवणारा ताऱ्याचा संदर्भ, आदीलसारखा श्लिष्ट, तिरेनिमकश तजुरबेदार (अनुभवी) सारखा अपरिचित शब्द, नि.श.सा.पा.फू. सारखा शब्दसंकोच, असंख्यता व्यक्त करणारी अतिशयोक्ती (तीनशे बाराव्यांदा, एकशे एकाव्या वेळी) स्त्रियांच्या भाषिकसंस्कृतीचा भंग (बेभरवशाचं सालं जिणं, काळी च्यायला, च्युतापा, धारी साली) सुभाषितांची मर्ढेकरी मोडतोड (ज्याच्या हाती जिची चोळी.... ती त्याची' 'जिच्या हाती ज्याचा लंगोट का नाही ?) अशा अनेक भाषाविशेषांनी

आणि मुक्त, निःसंकोच, बेदरकार आविष्काराने 'आंधळ्याच्या गाई' हा कथासंग्रह नाविन्यपूर्ण ठरतो. त्याचबरोबर या संग्रहातील कथांच्या निवेदनशैलीत अंगभूत असलेला, माणसाच्या व्यथायातनांविषयी लेखिकेच्या मनात असलेला उत्कट करुणाभाव वाचकाच्या मनावर एक शोकात्म ताण निर्माण करतो. 'तम अल्प, द्युति बहु' असल्यामुळे दोष दिसणे तसे अवघडच !

सहा महिन्यात दुसरी आवृत्ती निघालेला हा कथासंग्रह वाचकप्रियतेचा निदर्शक तर आहेच, पण 'एक उत्कृष्ट कलाकृती' हा दर्जाही प्राप्त करणारा आहे, हे निःसंशय. मराठी कथावाङ्मयाच्या विकासाची दिशा सुचवणारा महत्त्वाचा टप्पा असे 'आंधळ्याच्या गाई' बद्दल म्हणता येईल.

अर्पणपत्रिकेतील 'भानावर येण्यासाठी' हे दोन अर्थगर्भ शब्द कथेतील पात्रांप्रमाणेच वाचकाला आपल्या अस्तित्वाचे, जीवनहेतूचे, व्यक्तीव्यक्तीमधील नात्याचे भान आणणारे ठरावेत !

आंधळ्याच्या गाई (कथा)
लेखिका : मेघना पेठे,
राजहंस प्रकाशन,
१०२५ ,सदाशिव पेठ, पुणे

स्मिता कापसे,
द्वारा डॉ. उर्मिला क्षीरसागर,
विवेकानंद मेडिकल मिशन,
खापरी- नागपूर

■■■

देणगीदारांची नावे

'युगवाणी' कायम निधीसाठी ३० जून २००१ पावेतो प्राप्त झालेल्या देणग्या.

विदर्भ साहित्य संघ या देणगीदारांचा ऋणी आहे. रुपये १ हजार व त्याच्या पटीमध्ये देणगी देणाऱ्यांची नावे **'युगवाणी'** तून प्रसिद्ध केली जातील.

श्री. राजेन्द्र अल्लेरवार, चंद्रपूर : रु. १०,०००
श्री आशुतोष शेवाळकर, नागपूर : रु. ५०००
डॉ. श.वि.सालफळे, चंद्रपूर : रु. ५०००
ॲड्. आनंद परचुरे, नागपूर : रु.५०००

अनुक्रमणिका

● सुप्रिया अय्यर

जयूनं मनगटावरच्या घड्याळात पाहिलं. सकाळचे ९-२० झाले होते. ९-३० ची बस यायला अजून दहा मिनिटांचा अवकाश होता. बस स्टॉपवर ती एकटीच उभी होती. उगाच दोघं-तिघं इथं तिथं रेंगाळत होते. म्हटलं तर बसच्या प्रतीक्षेत, म्हटलं तर नाहीसुद्धा ! हल्ली तशी बसस्टॉपवरची गर्दी पूर्वीपेक्षा कमीच झालीय. प्रत्येकाजवळ स्वतःचं दुचाकी वाहन आलंय. आपल्याबरोबर ऑफिसच्या वेळी ह्या बसस्टॉपवर नित्य येणाऱ्याच कितीतरी जणांनी स्वतःच्या गाड्या घेतल्या आहेत. आपण मात्र वर्षानुवर्ष ९-३० ची बस घट्ट पकडून बसलोय. अगदी बदलणारे ड्रायव्हर-कंडक्टर्ससुद्धा आपल्याला ओळखतात. कित्येकदा तर बससुद्धा थांबवतात आपल्यासाठी ! आपल्या घरासमोरचा हा बसस्टॉप; जरा चार पावलं चालले की थेट बसस्टॉपवरच पोहोचतो आपण. परत येतांनाही बस इथचं थांबते जवळपास. मग स्वतःचं वाहन कधी घ्यांसंच वाटलं नाही. आता तर काय ! कंटाळाच येईल आपल्याला दुचाकी वगैरे चालवण्याचा ?

'मॅडम ! आनेकी है आपकी बस अभी !' टपरीच्या बाजूला उभी असलेली चंदा म्हणाली.

'हुं!' तिनं हुंकार भरला.

खरं तर बस आली नाही हे तिलाही माहिती होतं पण उगाचच तिच्याशी संवाद साधायचा म्हणून चंदा बोलली.

चंदाला कुणीतरी पैसे दिले असावेत किंवा त्या टपरीवाल्यानं पैशाशिवाय तिला समोसे खायला दिले असावेत. हातातल्या द्रोणात समोसे घेऊन ती बकाबका खात होती.

'मॅडम, मेरे भाई का मेसेज आया. वो आ रहा है दुबई से वापस।'

'अच्छी बात है।'

'फिर मै इधर फुटपाथपर नही रहुंगी, चली जाउंगी उसके साथ।'

'हां, चली जाना।'

तिच्या त्या कुठल्याच बोलण्यात दम नव्हता. तरीही ती जयूला ते सगळं आवर्जुन सांगत राहिली. गेले कित्येक महिने तसं ती जयूला सांगते. अगदी पोटतिडकीनं सांगते. जयूला तिचं सांगणं खरं वाटावं अशी तिची इच्छा असते. आत्ताही तिनं जयूला तेच सांगितलं. ९-३० ची बस आली. जयू बसमध्ये चढली. खिडकीतून तिला चंदा दिसली.

हातातला द्रोण तिनं रस्त्यावर फेकून दिला होता. अंगात घातलेल्या कमिजला तिनं खसाखसा हात पुसले. जयूकडे पाहून तिनं हात हलवला. ९-३० ची बस मार्गाला लागली होती, ऑफिसच्या ! घर, घरातले विचार, आत्ता भेटलेली चंदा... सारं मागे पडलं होतं. छे ! घर मागे राहिलं होतं तरी घरचे विचार कुठं थांबले होते ? कित्येक दिवस झाले ती अनिलच्या मागें लागली होती, आपण कुठंतरी जाऊ या म्हणून ! 'अनिल, किती दिवस झालेयत रे आपण कुठं गेलोच नाहीय.'

'बरं मग !'

'चल ना , कुठं तरी हिंडून येऊ'

'ठीक आहे.'

'केव्हा जाऊ या ?'

'अगदी उद्याच निघणार आहोत का आपण ?'

'तसं नाही, पण सुट्टीचं वगैरे बघावं लागेल ना !'

''बघू काही दिवसांनी !'

'अरे पण, असं तर गेले कित्येक दिवस म्हणतोयस तू !'

'डोकं नको खाऊस यार ! जाऊ जमेल तेव्हा.'

'असं म्हणत म्हणत मागची एल.टी.सी. लॅप्स झाली आपली.'

'उगाच झाली कां ? सतत काहीतरी अडचणी येतच होत्या ना ?'

'अडचणी कुणाला चुकल्या आहेत, पण तरी आपण जमवलं असतं तर जमलंच असतं !'

'तू तरी काय जिद्दीपणा करतेस ? नाही जमलं एखादवेळेस तर कुठं बिघडलं ? हिंडवलं ना आत्तापर्यंत इतकं तुला ?' 'हिंडवलं आत्तापर्यंत तुला !' त्याचे शब्द खच्चकन आत कुठतरी जाऊनच रुतले. म्हणजे-म्हणजे ह्याच्या दयेवर आपण हिंडत होतो ? हे तर कधी जाणवलंच नाही आपल्याला ! ह्याच्या मनात असेल तर हा नेणार, नाहीतर असा वस्सकन् ओरडणार अंगावर, 'आत्तापर्यंत तुला हिंडवलं' म्हणून ! रस्त्यावरची माणसं, तो टपरीवाला, त्या पलीकडचा पानठेलेवाला... सारीजण अशीच तर मेहेरबानी करतात त्या चंदावर ! कधी तिला समोसा मिळतो, कधी पान तर कधी पैसेसुद्धा ! पण त्यांची इच्छा असेल तेंव्हाच ! पोटाची आग जेव्हा तीव्रतेनं जाळत असेल तेव्हा कदाचित तो टपरीवाला तिला हाकलून लावत असेल ! किंवा हे सगळं काय तिला उगाचच मिळत असेल ? आता मात्र नाहीच मागे लागायचं अनिलच्या ! ह्या पुढली अगदी प्रत्येक एल.टी.सी. लॅप्स झाली तरी बेहेत्तर ! हल्ली असं कां होतं पण ? म्हणजे अनिलची वाक्य अशी बोचरी, जीवघेणी का वाटतात ? खरंतर एवढे वर्षांच्या सहवासानं ते कंगोरे झिजायला हवेत. पण ते तर जास्तच तीव्र झाल्यासारखे ! अगदी घासून पुसून परजल्यासारखे !

'आत्तापर्यंत तुला हिंडवलं' म्हणणारा अनिल ! जणू काय फक्त आपल्यासाठी म्हणून तो हे करतोय. म्हणजे त्याच्या त्या गरजाच नसल्यासारख्या, 'जयू' नावाच्या

जिद्दी बायकोसाठी स्वतःची फरफट करणारा !

शहराचा माणसांनी गजबजलेला भाग बसनं मागं टाकला. अन् सिव्हिल लाइन्स ओलांडून बस पुढं निघाली. तिथली ती आलिशान सरकारी क्वार्टर्स्, ती रेस्ट हाऊसेस, राज्य मंत्र्यांचे क्वार्टर्स् अन् अशीच सारी देखणी, वैभवसंपन्न अन् प्रतिष्ठितांची घरं. हिरव्या गर्द वृक्षांनी वेढलेला, धावणाऱ्या बसमध्ये गार झुळुकांची पेरणी करणारा आल्हाददायक परिसर ! आणि ह्याच साऱ्या परिसरात अस्तित्व टिकवून उभी असणारी जयूच्या ऑफिसची दगडी इमारत. त्या इमारतीला वेढून असणाऱ्या इतरही अनेक इमारती. जयूच्या स्टॉपवर बस थांबली तशी लगबगीनं जयू खाली उतरली. झपझप चालतांना तिला घाम आला. तिनं घाम पुसायला कपाळावर पालथा पंजा फिरवला. तिच्या पंज्यावर ओल्या कुंकवाचा एक भलामोठा फराटा उमटला.

'कुंकू कपाळभर फरपटलं वाटतं ? आता छान जगदंबेचा अवतार झाला असणार आपला.' तिनं स्वतःशीच विचार केला. 'अनिलला आपला असा हा वेंधळेपणा अजिबात आवडत नाही. गेले दोन दिवस झाले, कपाळाला लावायच्या टिकल्या संपल्या आहेत. घ्यायला जाऊ म्हटलं तर ऑफिसातून घरी गेल्यावर घरच्या कामाला जुंपले जातो आपण ! खरंतर परत जातांनाच वाटेत उतरून दुकानातून टिकल्या घ्याव्यात तर पुन्हा घरापर्यंतचं अंतर पायी चालत जाण्याचा कंटाळाच येतो. म्हणून कालपासून देवाच्या कुयरीतलं कोरडं कुंकूच कपाळावर टेकतोय आपण !'

आपल्या टेबलाशी बसून तिनं पर्स ड्रॉवर मध्ये ठेवली अन् जरा हुश्श केलं तर शेजारच्या टेबलावरची निवेदिता आली. तिच्याकडे बघत म्हणाली,

'काय पण छान अंबाबाई दिसतेयस.'

'अगं हो ना ! घाम पुसतांना फरफटला पिंजर सगळा.'

'नुसता फरपटला नाही; नाकावरती ओघळ आलेयत बाईसाहेब लाल लाल.'

'काय सांगतेस ?'

निवेदितानं आपल्या पर्समधून आरसा काढून तिच्या समोर धरला.

'अय्या, खरंच की !'

'पुस ते कुंकू रुमालानं.'

'काही तरीच काय ?'

'अगं टिकली आहे ना माझ्याकडे' निवेदितानंच मग रुमालानं तिचं कपाळ स्वच्छ पुसलं. अन् पर्समधून टिकली काढून तिच्या कपाळावर लावली.

'काय ? झाला का नाही मेकअप् ?' त्यांच्या टेबलावरून पुढं जाणाऱ्या सुहास देशपांडेनं टोकलंच.

'तुम्ही आपला चहा-बिहा प्यायला टपरीवर जा हो ! कशाला आमच्या मेकअप्च्या फंदात पडताय ?' निवेदिता त्याला म्हणाली.

न बोलता तो पुढं सरकला.

'बरं बाई, तुला गप्प बसवता येतं साऱ्यांना !'

'अगं, मग काय सगळ्यांचं ऐकत बसणार आपण ? ह्या पुरुषांचं एक बरं असतं, पँट शर्ट अडकवला की कुठ्ठेही जायला मोकळे. त्यात पुन्हा ह्या सुहास सारख्या कितीतरी जणांचे असे प्रीमॅच्युअर अर्धचन्द्र होत जातात. तरीसुद्धा बघ ना तू, स्कूटर स्टँड करतो तेव्हा स्कुटरच्या आरशात पाहून खिशातल्या कंगव्यानं टकलावरचे तीन तार चापून चोपून बसवतो अन् मगच ऑफिसात येतो.'

'प्रत्येकाची वेगळी तऱ्हा. आज मात्र टिकल्यांचं पॅकेट घेईन मी नक्की.'

'हे ठेव ना तू, माझ्याकडे आहे.' निवेदितानं तिला अख्ख एक पाकीटच दिलं.

अख्खा दिवस मग ऑफिसच्या रगाड्यात पुढं-पुढं सरकत गेला. पावणेसहाची बस गाठून जयू घरी निघाली तेव्हा अंधार उतरायला लागला होता. थंडीचे दिवस लहान असतात. संध्याकाळी लवकर अंधारून येतं. घरी पोहोचेस्तोर दिवेलागणी होऊनच जाते. 'आजही पुन्हा वाटेत उतरून टिकल्या घ्यायचं राहूनच गेलं. अन् तसंही निवेदितानं दिलंच आहे की एक पाकिट ! निदान काही दिवस निघून जातील.' जयू बसमधून उतरली. बाजूच्या गल्लीतून चंदा तिच्याच दिशेनं येत होती. जयू आपल्या रस्त्याला लागणार, तशी तिच्याजवळ येत चंदा म्हणाली,

'मॅडम, जरा रुको ना।'

'काय ?'

'मला थोडं बोलायचं आहे तुमच्याशी.'

'बोल.'

'मॅडम, तुम्ही नाराज आहेत माझ्यावर ?'

'कशाला ?'

'तुमचं ऐकलं नाही मी म्हणून ?'

'मी नाराज होऊन काय करू ?'

''मॅडम, मला खरंच आवडत नाही अनाथाप्रमाणं राहायला, म्हणून मी नाही म्हटलं तुम्हाला.'

'असं रस्त्यावर राहायला आवडतं ?'

'नाही, असं पण नाही आवडत. पण माझा काही इलाज नव्हता. अनाथाश्रमात राहायचं नाकारल्यावर दुसरीकडे कुठं राहणार मी ?'

'म्हणून तर तुला म्हणत होते की 'चल' म्हणून ! तिथं निदान चार भिंतीआड तर राहिली असतीस.'

''ते काही खरं नसतं मॅडम. पोलिसनं एकदा पोहोचवलं होतं मला.'

'काय ?'

'हो. पण दम घुटला माझा तिथं. म्हणून पळून आले.'

'बरं, पण आता काय ?'

'मला दोन जुन्या साड्या द्याल तुमच्या ?'

'कशाला ?'

'एकच सलवार कमीज रोज घालते. धुवायला काढीन म्हटलं तर घालायला दुसरे कपडेच नाहीत. अन्-अन् आता--'

'आता काय ?'

'पोटात बच्चा आहे माझ्या.'

'काय सांगतेस ?'

'द्याल मॅडम दोन साड्या ?'

जयूच्या मेंदूला झिणझिण्या आल्या. तिला वाटलं की चंदाला चांगलं फटकारावं. म्हणावं की, 'ह्याचसाठी तुला म्हणत होते मी की अशी रस्त्यावर बेवारस राहू नकोस म्हणून. हवं तर तुला मी अनाथाश्रमात पोहोचवते. मागे कितीतरी दिवस बसस्टॉपवर जयू तिला तेच पटवत होती. जयूच्या मागे लागण्यानं चंदा चिडलीच एक दिवस. अन् म्हणाली, 'तुम्हाला काय बेवारस मुलगी वाटते मी ? माझा भाऊ तिकडे दुबईला गेलाय. रग्गड पैसे पाठवणार आहे तो माझ्यासाठी. मग दोन खोल्यांचं घर भाड्यानं घेईन मी.' 'अन् तोवर काय अशीच रस्त्यावर राहशील ?'

'मी रस्त्यावर राहीन नाहीतर कुठंही राहीन, तुम्हाला काय करायचंय ?'

तिच्या बोलण्यानं जयू काळजातून दुखावल्यासारखी झाली. स्वतःच्या वेडेपणाचंही तिला हसूच आलं. तिला आठवलं, आपली आई आपल्याला नेहमी म्हणायची की, 'आईचा जीव बाईपाशी, अन् बाईचा जीव गावापाशी. कशाला का ग एवढ्या जगाच्या भल्याच्या पंचायती तुला ?'

असं रस्त्यावर वणवण भटकू नये. चंदाला मात्र तो अनाथाश्रमाचा बंदिवास नकोच जगायचं होतं तिला / जगत होती ती. मधेच कधीतरी अपराधी स्वरात जयूला ती सांगायची.

'मांगण्यातला फोलपणा जाणवून जयूला पोटातून तिची कणव यायची. आज सकाळीच तर तिने पुन्हा एकदा भावाच्या दुबईचं तुणतुणं वाजवलं होतं, अन् आत्ता ह्या करकरीत तिन्ही सांजेला ती जयूला विनवित होती. 'मला दोन जुन्या साड्या दे.' म्हणून पोटातल्या बाळाबद्दलही तिनं न संकोचता सांगून टाकलं. आपल्या सांगण्यानं जयू समूळ हादरेल असं तिच्या मनात देखील आलं नसावं ! देता जयू घराच्या दिशेनं चालू लागली. अनिल नुकताच आला असावा ! त्याच्या पायातले शुज त्यानं अजून काढले नव्हते. तिनं हातातली पर्स ठेवली अन् कामाला लागली. जुन्या साड्यांमधून कुठल्या दोन साड्या चंदाला देता येतील तेही तिनं चाचपलं. नुसत्याच साड्या देऊन भागणार नाही, त्याच्या जोडीनं पेटीकोट, ब्लाऊज, अगदी अंडर गारमेंटस्सुद्धा द्यावेच लागतील.

आपल्या लग्नाला दहा वर्षे झालीत. अजून मूल झालंच नाही. अनिलचा स्पर्मस काऊंट कमी आहे. त्यात पुन्हा त्याला तरुण वयात डायबेटीस डिटेक्ट झालेला ! जाऊ दे ! प्रत्येकालाच मूल व्हायला हवं असं कुठं आहे ? आपण तर सगळं सहजपणी (?) घेतो, पण अनिल मात्र सतत चिडलेला आपल्यावर, आपलाच दोष असल्यासारखा ! साधं कुठं हिंडून येऊ म्हटलं तर वस्सकन ओरडणार ! ऑफिसच्या अडचणींचा, सुटी

न मिळण्याचा पाढा वाचणार ! किंवा 'हिंडवलं ना तुला !' म्हणून आवाज चढवणार ! म्हणजे त्याच्या मर्जीनं, त्याच्या सोयीनं आपण वागायचं.आपला असा वेगळा सूर कधी लावायचा नाही. आपण लग्नचं नसतं केलं तर ? निवेदितानं कुठं केलं लग्न ? मजेत तर राहते एकटी. उगाच लग्न-बिग्न झालं नाही म्हणून कधी कुढत बसली नाही. तसे तर आपणही कधी 'मूल नाही' म्हणून कुढत वगैरे नाहीच. उगाच कधीतरी एकटेपणाचा एखादा सल छळतो तेवढाच निवेदिताच्या मुक्त असण्याचा मात्र कधी-कधी हेवा वाटतो. तसा तो चंदाच्या मुक्त असण्याचा नाही वाटत ! शेवटी मुक्ततेलाही काही बंधन असावं लागतचं तर ? चंदाला मात्र मुक्ततेची किंमतच मोजावी लागतेय. चंदा किती सहजतेनं ती किंमत चुकवायला तयार आहे ! तिला फक्त अनाथाश्रमात जायचं नाहीय. तिथलं ते चाकोरीतलं,शिस्तीतलं किंवा तिनं जे काय तिथं अनुभवलंय ते आयुष्य तिला नकोय. तिथल्या तशा जगण्यापेक्षा रस्त्यावरचं जगणं तिला अधिक सुसह्य वाटतं ! आपल्यासारख्या एखादीनं तिच्या अश्या मुक्त राहण्याला आडकाठी घातली तर ती उसळून उठते. त्या तिच्या तशा उसळून उठण्याचा परिणाम जेव्हा आपल्यावर होत नाही तेव्हा दुबईहून ढिगानं पैसे घेऊन येणाऱ्या भावाचा फुगा ती फुगवत बसते. सगळे फुगे तसे फुसकेच तर असतात. कित्येकदा माणसाला स्वतःचं दुबळेपण लपवायला ते फुगवावेच लागत असावेत. अगदी खूप, मोठ्ठे, दिमाखदार करून लोकांपुढे मिरवावेच लागतात. चंदाचा 'दुबईचा भाऊ' हा असाच एक मोठ्ठा फुगा ! 'तुला इतकं सारं हिंडवून आणलंय' म्हणून वस्सकन ओरडणाऱ्या अनिलचाही असाच एक भला मोठा फुगा आणि त्याला टाचणी लागू नये म्हणून जीवापाड धडपडणाऱ्या आपण !

रात्री झोपतांना जयूला जाणवलं की आपल्या पोटऱ्या भरून आल्यायत. कंबरही दुखतेय. 'बाई ग ! पाळी आली सुद्धा एवढ्यात ? ह्या तर सगळ्या पाळी येण्याच्या चाहूल खुणा. अजून किती दिवस ही अशी वांझोटी पाळी येत राहणाराय कुणास ठाऊक ! पण --- पण छे ! नुसत्याच पोटऱ्या भरून आलेल्या नाहीयत. आपल्याला खूप थंडी वाजतेय. अगंदी आतून सगळ्या शरीरभर थंडीच्या लाटा धडका देताहेत. शेजारीच निजलेल्या अनिलला तिनं आवाज दिला.

'अनिल, ए अनिलऽऽ'

अनिल गाढ झोपलेला. तिनं त्याला हातानं हालवलं.

'अनिलऽऽ'

'काय आहे ?' त्याचा झोपेतला टिपेचा चिडका स्वर.

'अनिल मला खूप थंडी वाजतेय.'

'अंगावर पांघरुण घे.' त्यानं त्याच्याकडून तिचा प्रॉब्लेम सोडवून टाकला. ती मात्र नेटानं म्हणाली.

'अरे पांघरुण घेतलं तरी थंडी वाजतेय.'

तो मग चिडीला येऊन उठूनच बसला.

'काय कटकट करतेस गं. दिवसा तेच, रात्री तेच.'

'अरे असा चिडण्यापेक्षा पांघरुन घाल ना माझ्या अंगावर' त्यानं लाईटचं बटन् ऑन करून जरावेळ पांघरुणांची शोधाशोध केली. जे सापडेल ते तिच्या अंगावर आणून टाकलं. तरीहि तिच्या शरीरभर पसरलेल्या थंडीच्या लाटा उसळतच राहिल्यात. मध्येच कधीतरी तिला घाम आला असावा. अंगातली थंडी झटक्यासरशी निघून गेली. अन् अंगावरून फेकून दिलेल्या पांघरुणांचा तिच्या पायाशी ढिग जमला. सकाळी तो पांघरुणांचा ढिग पाहून अनिल पुन्हा एकदा चिडलाच. जयू मात्र थकलेल्या आवाजात म्हणाली,

'अनिल, निवेदिताला फोन कर ना.'

'कशाला ?'

'अरे मी रजा घेईन म्हणते. मला खूप थकल्यासारखं वाटतंय रे.'

चार दिवस जयू अंथरूणात पडून होती. सगळं शरीर त्राण नसल्यासारखं गलितगात्र झालं होतं. खरंतर अजूनही अंथरूणातून उठवत नव्हतं. पण गेले चार दिवसात घरात तिचं अस्तित्व नसल्यासारखे झाले होतं. स्वतःचं घर तिला परकं, अनोळखी वाटायला लागलं. अन् ते परकेपण असह्य झालं म्हणून किंवा उठू शकण्याइतकं बळ अंगात आलं म्हणून असेल कदाचित, पण जयू निकरानं उठलीच. बेसिन जवळ जाऊन तिनं ब्रश केलं. तोंडावर नळाच्या पाण्याचे सपके मारले. आरशात पाहून नॅपकीननं तोंड खसाखसा पुसलं. कंगवा फिरवून केस सारखे केले. तिला एकदम् तरतरी आल्यासारखं वाटलं. तिनं मग चहाही केला. अनिलला चहाचा मग दिला. तसा तो म्हणाला,

'आज बरी दिसतेय तब्येत ?'

'हो.' तिथंच त्याच्या बाजूला टेकत ती म्हणाली

'गेले चार दिवस भानच नव्हतं मला कशाचं.'

'चांगली डाराडूर झोपत होतीस तू.'

'ते तर सिडेशन असणार मेडिसिन्सचं. पण तू काय केलस अनिल ?'

'म्हणजे ?'

'तुझ्या जेवणाची काय सोय केली होतीस ?'

'त्याची काळजी तुला कशाला ?'

'तसं नाही, पण ---'

'जिवंत दिसतोय ना तुला ?'

'असं काय बोलतोस ?' तिला वाटलं अनिलनं खोटं का होईना पण म्हणावं की, 'गेले चार दिवस तुझ्या आजारपणामुळे माझेही हाल झालेत गं ! किंवा तुझी खूप काळजी वाटत होती मला.' किंवा असंच काहीतरी हळवं, आपल्याला बांधून ठेवेल असं बोलावं. म्हणजे त्याच्याजवळ जाणं आणखीन सोपं होईल. पण आत्तापर्यंतच्या सवयीनं तिला हेही माहिती होतं की तो असं नाहीच बोलणार. आपल्या संदर्भात तो असा हळवा वगैरे नाहीच होणार. त्याच्या अशा शुष्क असण्याचे दूरगामी परिणाम आपल्यावरही झालेले आहेतच. आपल्या कळत-नकळत आपणही तर कोरडे होत चाललेलेच आहोत. असं कसं हे चार भिंतींमध्ये कोंडून राहाणं ? आपला दोष नसतांनाही अनेक गोष्टींची शिक्षा

मुकाट्यानं भोगत जाणं ? मनाचे सारे हळवे कोपरे मुडपून टाकायचेत. कुणापुढे स्वतःचं दुबळेपण प्रकट होऊ नये म्हणून अखंड धडपडायचं ! वाटतं की हे सारं असह्य होऊन कोलमडून जाऊ आपण !

'बघा ! आज बरं वाटत असेल तर स्वयंपाकपाण्याचं काही जमवा.'

'हो, करते ना !'

'तू जाणार आहेस का ऑफिसला ?'

'आज नाही जात. उद्या जमलं तर बघेन.'

जयूनं हळूहळू घरात हिंडून एक एक काम करायला सुरुवात केली. अनिल जेवून ऑफिसला गेला. तेव्हा तिला थकव्यानं ग्लानी आल्यासारखी वाटली. तिनं समोरचं दार बंद केलं. अन् कॉटवर स्वतःला झोकून दिलं. थकवा अन् ग्लानी अंगभर पसरत गेले. अन् पुन्हा तिला झोप लागली. फोनच्या रिंगनं तिला जाग आली.

'हॅलो !'

'कशी आहेस गं ?' निवेदिता तिला विचारीत होती.

'तशी ठीक आहे. पण थकवा खूप जाणवतोय.'

'काय झालं गं एकाएकी तब्येत बिघडायला ?'

'ते मलाही कळत नाहीय.'

'जाऊ दे. असं अधून-मधून आजारी बिजारी पडावं म्हणजे जरा सुटीबिटी घेता येते. शिवाय नवरा पण जरा व्हि.आय.पी. ट्रिटमेंट देतो; खरं ना ?'

'तुला काय माहिती नवरा व्हि.आय.पी. ट्रिटमेंट देतो म्हणून ?'

'त्यात माहिती नसण्यासारखं काय आहे ? मी काय डोळे बंद करून नाही वावरत. मग काय ? अजून किती सुटी वाढवायचा विचार आहे ?'

'बहुदा येईन उद्या ऑफिसला.'

'अगं, वेडी का काय तू ? कशाला एवढी घाई करतेस ? तुझ्या न येण्यानं ऑफिस काही ओस नाही पडलेलं !'

'ते मलाही माहिती आहे गं !'

'ए रागावलीस ?'

'कशाला?'

'मी असं रोखठोक बोलले म्हणून ?'

'छे ! उलट बरं वाटलं. एक सत्य पुन्हा एकदा नव्यानं कळलं.'

'कुठलं ?'

'अग, आपण म्हणजे कुणीच नसतो; घरी-दारी अन् ऑफिसात सुद्धा !'

'तुला खरंच वाईट वाटलेलं दिसतय !'

'आपल्याशिवाय घर चालतं, आपल्याशिवाय ऑफिस चालतं, आपण मात्र उगाचच आपल्या अस्तित्वखुणा इथंतिथं शोधत राहतो.'

'हे बघ जयू, असले खुळ्यासारखे विचार करीत बसू नकोस.'

'म्हणून तर उद्या ऑफिसला येईन म्हणते. घरी राहिले तर हे असंच काहीतरी डोक्यात फिरत राहणार.'

'ये मग, मी वाट पाहीन. बाय.'

'बाय, उद्या ९-३० ची बस जिंदाबाद!' जयूनं मग बाथरूममध्ये जाऊन मनसोक्त आंघोळ केली. आता तर सकाळपेक्षा कितीतरी जास्त तरतरी तिला वाटायला लागली. तिनं मग मनासारखे केस विंचरलेत. अंगभर पावडर शिंपडली. टॅल्कमचा सुगंध अंगभर रेंगाळला. तिनं घरभर उगाचच एक चक्कर मारली. अन रस्त्याच्या दिशेनं असणाऱ्या त्या ठेंगण्या खिडकीपाशी खुर्ची ओढून ती बसली. खिडकीतून दिसणारा रस्ता ती कितीतरी वेळ न्याहाळत होती. त्या ऐसपैस रस्त्याच्या दुतर्फी एका सरळ रांगेत शिस्तीनं उभी असणारी घरं, रस्त्यावरून अथकपणे धावणारी वाहनांची रांग, जरा पुढं त्या वळणावरचा बसस्टॉप, बसस्टॉपच्या मागे असणारी ती समोशांची टपरी. बाजूला असणारा तो पानठेला अन् ---- अन् हो ! आपल्याला चंदानं दोन जुन्या साड्या मागितल्या होत्या. गेले चार दिवस आपण आपल्याच तंद्रीत. थंडीचे दिवस आहेत. ती तर उघड्यावर राहते. शिवाय पोटात एक बाळ घेऊन !

जयू मग उठलीच. जुन्या साड्यांचं कपाट उघडून तिनं दोन जुन्या कॉटनच्या साड्या काढल्या. दोन साधेसे परकर, ब्लाऊज अन् अंडर गारमेंटससुद्धा ! ते सगळे एका कॅरीबॅगमध्ये ठेवून दिले. तिला वाटलं की असंच हाऊसकोट न बदलता त्या वळणापर्यंत जावं अन् चंदाला हे सारं देऊन यावं. पण हाऊसकोटवर बाहेर जाणं प्रशस्त वाटेना. साडी नेसण्याइतकं त्राणही आपल्यात नाहीय असं तिला वाटलं. तिनं ती कॅरीबॅग तशीच कोपऱ्यात ठेवून दिली, उद्या ऑफिसला जातांना नक्की न्यायची म्हणून.

हातातली कॅरीबॅग सांभाळत जयू बसस्टॉपकडे निघाली. उजव्या खांद्याला पर्स लटकवलेली व त्याच हातात कॅरीबॅग घेऊन निघालेल्या जयूला अनिलनं विचारलं,

'काय घेऊन चाललीयस त्या बॅगेत?'

'त्या बसस्टॉपवरच्या चंदानं दोन जुन्या साड्या मागितल्या होत्या. तिला द्यायला साड्या घेऊन चाललेय.'

'नेऊ नकोस.'

'कां ?'

'उगाच अशी कुणाच्या फंदात पडत जाऊ नकोस.'

'अरे, फंदात कुठं पडतेय मी ? फक्त तिला साड्याच तर देतेय.'

'ती चांगली मुलगी नाहीय. अन् तू नेहमी बसस्टॉपवर बोलतेस तिच्याशी.'

'चांगली नाहीय म्हणजे कशी आहे ?'

'प्रत्येक गोष्टीचा किस पाडतेस. तुला काय कळत नाही ती कशी आहे तर ?'

'पण तिच्या अवतीभवती असणारे ते इतर सगळे म्हणजे तो पानठेलेवाला, तो टपरीवाला, ते रिक्षावाले ते सगळे चांगले आहेत कां ?'

'तुला काय म्हणायचंय् ?'

'तू तर जातोसच ना त्या पानठेल्यावर ? बस चुकली तर मीही तिथं थांबणारी रिक्षाच गाठते...'

'तुझ्याशी बोलणंच बेकार आहे .'

'अन तो पानठेलेवालाच तुला सांगतो ना त्या चंदाबद्दल ?'

'जा तू. बस चुकेल तुझी.'

रस्त्यानं जातांना पुन्हा एकदा जयूला जाणवलं की चंदा नावाच्या त्या मुलीसाठी विनाकारण का वादलो आपण अनिलशी ? तरीही ती 'चांगली' वगैरे आहे असं नाहीच पटवलं आपण त्याला. फक्त तीच एकटी 'वाईट' नाहीय. एवढचं तर आपल्याला सांगायचं होतं ! निवेदितासारखं किंवा आपल्यासारखं तिलाही एक घर असतं तर ती ही कदाचित प्रस्थापित संस्कृतीच्या नीतिमूल्यांची चौकट सांभाळत जगलीच असती. म्हणजे शेवटी तुम्हाला एक 'घर' असणं हा सुद्धा नशिबाचाच भाग आहे तर !

जयू बसस्टॉपजवळ पोहोचली तर तिथं बघ्यांची ही गर्दी जमलेली !

'मर गई साली.' गर्दीतून कुणीतरी म्हणाल.

'कब मरी?'

'अभ्भी - थोडी देर पहले.'

'कैसे मरी ?'

'किसीने जहर पिलाके मार दिया !'

जयूचे हात बसस्टॉपच्या आडव्या लाकडावर गच्च रोवले गेले. 'कोण मेलं ? कुणी मारलं ?' तो समोशाची टपरीवाला तिच्याजवळ येऊन तिला सांगत होता, 'वो चंदा को किसीने जहर पिला दिया रात में ! वो अभ्भी अभ्भी मर गई.'

जयू मग त्या गर्दीजवळ गेली. गर्दीनं तिला आपसूक वाट करून दिली.समोर चंदा पडली होती, अस्ताव्यस्त हातपाय पसरून. डोक्यावरचे केस पिंजारलेले. जणु काय कोणी हातात धरून झिंज्या उपटाव्यात असे. अंगावरचा कमीज कुठं गेला होता कुणास ठाऊक ? सलवारही गळून पडलेला. आतले कपडे तर नव्हतेच तिच्याजवळ. त्या उघड्या देहावर कुणाशी तरी प्रचंड झोंबी घेतल्याच्या खुणा ! मान जमिनीवर कलंडलेली. गालाखाली पिवळ्या जर्द उलटीचा भलामोठा ओघळ ! उघड्या पोटाचा टचटचीतपणा डोळ्यात घुसत होता. तिचा एकुलता एक कमीज कुणी ओरबाडून टाकला ? अन् ... अन् हे इथं जमलेले सारेजण अजूनही नजरेनं तिच्या देहाला **झोंबताहेत** ?

पुन्हा एकदा डोक्यामध्ये सरसरून मुंग्या धावल्या. जयूनं त्या कॅरीबॅगमधून हिरवी कॉटनची साडी काढली अन् त्याची चौपदरी घडी चंदाच्या देहावर पसरली.

'मॅडम, ड्रायव्हरने आपके लिए बस रोकी है' रिक्षावाला म्हणाला. अन् जयू बसच्या दिशेनं वळली.

सुप्रिया अय्यर

६८, शंकर नगर , नागपूर.

■■■

कार्यवृत्त

१ एप्रिल २००१ ते ३० जून २००१

विदर्भ साहित्य संघाची निवडणूक

विदर्भ साहित्य संघाच्या घटनेनुसार संस्थेची पंचवार्षिक निवडणूक फेब्रुवारी-मार्च दरम्यान पार पडली. अध्यक्षपदासाठी प्रा. सुरेश द्वादशीवार व रवींद्र डोंगरदेव हे दोन उमेदवार होते.

या निवडणुकीत पुन्हा एकदा प्रा. द्वादशीवार यांची अध्यक्षपदी भरघोस मतांनी निवड झाली. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळावर पुढील सभासद विजरी झाले. या निवडणुकीत एकूण ६०२६ पैकी ३३१२ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीत प्रा. द्वादशीवार यांना ३०९८ तर रवींद्र डोंगरदेव यांना १५६ मते मिळाली. कार्यकारी मंडळाच्या सभासदपदी निवडून आलेले २२ उमेदवार, त्यांना मिळालेल्या मतांसह, या प्रमाणे आहे. मोहन देशपांडे (३१११), मनोहर म्हैसाळकर (३१०७), माधुरी मुनशी (३०८६), ईश्वर नंदपुरे (३०८०), प्रा. सदानंद देशमुख (३०७६), डॉ. विठ्ठल वाघ (३०६९), शुभदा फडणवीस (३०४९), डॉ. सुलभा हेर्लेकर (३०४५), नरेश सबजीवाले (३०३८), जयंत मादुस्कर (३०३७), सीमा रोठे (३०२६), डॉ. भा.ल. भोळे (३०२०), शोभा उबगडे (३०१८), डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (३०१८), गो. ना मुनघाटे (३०१५), सतीश तराळ (३०१०), डॉ. उत्तम रुद्रवार (३०१०), वामन तेलंग (२९८९), द.सा.बोरकर (२९८६), ह.गो. पिंपळगावकर (२९८४), डॉ. राजन जायसवाल (२९८१), व संयोगिता धनवटे (२९६९).

डॉ. कुमार शास्त्री व रवींद्र डोंगरदेव हे उमेदवार पराभूत झाले. डॉ. शास्त्री यांना ६८४, तर डोंगरदेव यांना ४५१ मते पडली. या निवडणुकीसाठी श्री. रामकुमार श्रीवास्तव यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. श्री. श्याम देशपांडे व त्यांचे सहकारी यांनी त्यांना सहकार्य दिले. निवडून आलेले अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांचा कालावधी ३१ मार्च २००६ पर्यंत राहील.

नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाची सभा दि. १ एपिल २००१ रोजी नागपूर येथील केंद्रिय कार्यालयात झाली. प्रकाश एदलाबादकर व सुरेश शेंदरे या दोन सभासदांना अध्यक्षांनी कार्यकारी मंडळावर नामानियुक्त केल्यानंतर एकूण २४ सभासदांमधून खालील पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते झाली. या पदाधिकाऱ्यांच्या नावांचा प्रस्ताव अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी मांडला.

उपाध्यक्ष : १) मनोहर म्हैसाळकर (कार्याध्यक्ष)
२) डॉ. विठ्ठल वाघ ३) डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.
सरचिटणीस : सौ शोभा उबगडे
चिटणीस : १) नरेश सबजीवाले (कार्यालय)
२) प्रा. सतीश तराळ (शाखा समन्वय) ३) संयोगिता धनवटे (अर्थ)
कोषाध्यक्ष : सुरेश शेंदरे

संपादक युगवाणी : डॉ. सुलभा हर्लेकर
संचालक ग्रंथालय : डॉ. ई. तु. नंदपुरे
संचालक परीक्षा समिती : शुभदा फडणवीस

सौ. शोभा उबगडे यांच्या सरचिटणीसपदी झालेल्या निवडीने या पदावर महिला सभासदाला आसीन होण्याचा मान विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासात प्रथमच मिळाला. मनोहर म्हैसाळकर यांना कार्याध्यक्ष या पदाव्यतिरिक्त संचालक, सांस्कृतिक संकुल व वास्तु या कामांची जबाबदारी सोपविण्यात आली. संस्थेच्या विविध समित्यांची नियुक्ती याच सभेत करण्यात आली.

। अ. भा. मराठी साहित्य महामंडळ ।

विदर्भ साहित्य संघ ही अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची संस्थापक घटक संस्था आहे. महामंडळाचे कार्यालय आता मुंबईवरून पुण्याला आले आहे. महामंडळाच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवडही एप्रिल महिन्यात झाली. अध्यक्ष म्हणून गं. ना. जोगळेकर व उपाध्यक्ष म्हणून हैद्रावादचे द. पं. जोशी यांची निवड करण्यात आली. श्री. निपुणगे (पुणे) हे महामंडळाचे कार्यवाह आहेत. महामंडळाच्या या बैठकीला विदर्भ साहित्य संघाच्या वतीने सरचिटणीस शोभाताई उबगडे व धा. केशव जोशी उपस्थित होते.

। प्रकाशन समारंभ ।

(१) विदर्भ साहित्य संघ व आनंद प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मजा गाडगीळ यांच्या `भावलेणी` या काव्यसंग्रहांचा प्रकाशन समारंभ सर्वोदय आश्रम सभागृहात रविवार दिनांक २२ एप्रिल २००१ रोजी आयोजित करण्यात आला होता. राम शेवाळकर यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले. याप्रसंगी राम शेवाळकर, प्राचार्य सुधीर बोधनकर व डॉ. तारा सावंगीकर यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मालती निमदेव यांनी केले.

(२) विदर्भ साहित्य संघाचे हितचिंतक, सामाजिक कार्यकर्ते व माजी आमदार श्री. गोविंदराव वंजारी यांच्या `भरारी कर्तृत्वाची` या आत्मचरित्राचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. विलासराव देशमुख यांच्या हस्ते १४ मे २००१ रोजी झाले. विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या या प्रकाशन समारंभात श्री. उल्हास पवार, ना. श्री. सतीश चतुर्वेदु, यांची भाषणे झाली. श्री. गोविंदराव वंजारी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. सुरेश द्वादशीवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी मा. मुख्यमंत्री व श्री. वंजारी यांचा सत्कार करण्यात आला. पुस्तकाचे लेखक पुरुषोत्तम बोरकर व मुद्रक श्री. मधुसूदन बनहट्टी यांचाही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. या प्रसंगी पालकमंत्री ना. शिवाजीराव मोघे, तसेच ना. अनिल देशमुख, ना. सुलेखा कुंभारे, ना. अनिस अहमद हे मंत्री आर्वजून उपस्थित होते. हा कार्यक्रम आय. एम. ए. सभागृहात झाला.

। श्रद्धांजली सभा ।

(१) विदर्भ साहित्य संघाचे साइल आजील सभासद व सुधाकरराव नाईक यांचे १० मे २००१ रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाने पुढाकार घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठा यांच्यासह दि. ११ मे २००१ रोजी वनराई सभागृहात श्रद्धांजली सभा आयोजित केली होती. प्र. शेवाळकर अध्यक्षस्थानी होते. सुरेश द्वादशीवार, गिरीश गांधी, किशोर काशीकर, खा. विलास मुत्तेमवार, गोविंदराव वंजारी प्रभृतींनी या शोकसभेत आपापल्या भावना व्यक्त केल्या.

(२) सुप्रसिद्ध साहित्यकार कै. मालतीबाई बेर्डेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी

सांस्कृतिक संकुलात दि. २० मे २००१ रोजी शोकसभा घेण्यात आली. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत डॉ. आशा सावदेकर व डॉ. मालती निमदेव यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. शोकसभेचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

। अध्यक्षांची शाखा भेट ।

गोंदिया : विदर्भ साहित्य संघाच्या गोंदिया शाखेच्या नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाच्या दि. १३ एप्रिल २००१ रोजी झालेल्या पदग्रहण समारंभासाठी अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवर यांनी गोंदिया शाखेस भेट दिली. या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात शाखेच्या माजी अध्यक्ष श्रीमती मनोरमाबाई धोटे विशेषत्वाने उपस्थित होत्या. श्रीकांत गोडबोले यांच्या पुस्तकांचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रकाश एदलाबादकर डॉ. चंद्रशेखर डाऊ यांची यथोचित भाषणे झाली. कार्यकारी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य वामन तेलंग या प्रसंगी उपस्थित होते. गोंदिया शाखेच्या नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे अध्यक्षांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. गोंदिया येथे विदर्भ साहित्य संघाची स्वतःची जागा व अवभूती रंगमंदिर आहे. त्या परिसराचा गोंदिया शाखेने विकास करावा असे या भेटीत ठरले.

चंद्रपूर : चंद्रपूर येथील गोंड्या शाखेने कै. पु.ल. देशपांडे यांची पहिली पुण्यतिथी साजरी करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. सर्वश्री मनोहर सप्रे, व डॉ. शा. वा. खान यांची त्यावेळी भाषणे झाली. अध्यक्षतेखाली वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार हे होते.

खामगाव : अलीकडेच विदर्भ साहित्य संघाच्या खामगाव शाखेची अविरोध निवडणूक झाली. पुढीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष : सुभाष देशपांडे, उपाध्यक्ष : प्रा. गो. ह. सावजी

सचिव : प्रा. विजय देशपांडे, सहसचिव : संजय राजनकर, कोषाध्यक्ष : गिरीश कोल्हटकर.

कार्यकारिणी सदस्य : अरविंद नेटके, सौ. माधुरी मुनशी, प्रदीप अंजनकर, प्रशांत वडवाले, रामेश्वर ताठे, सौ सुचिता हातेकर, मुरारी टिपरे.

शाखा-वृत्त पाठवावे

विदर्भ साहित्य संघाच्या शाखांच्या वतीने आपापल्या ठिकाणी वेळोवेळी वेगवेगळे उपक्रम/कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमांचा संक्षिप्त गोषवारा 'युगवाणी'तून प्रसिद्ध होतो. तरी शाखा-सचिवांनी एप्रिल ते सप्टेंबर २००१ या काळात झालेल्या उपक्रमांचे वृत्त विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रिय कार्यालयाकडे पाठवावे, म्हणजे 'युगवाणी'च्या पुढील अंकात त्याचा समावेश होऊ शकेल.

-सरचिटणीस

सौ. शोभा उपगडे,
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१. संशोधन लेखसंग्रह, भाग २ कै. हरिभाऊ नेने........................ रु. ६/-
२. प्रयोगक्षम मराठी नाटके डॉ. मु.श्री.कानड..........................रु. ३०/-
३. मराठी वर्णोच्चार विकास डॉ. द.ह. अग्निहोत्री.....................रु. ३२/-
४. अध्यक्षीय भाषणे सा.भू.तु. ना. काटकर............................रु. ७५/-
(विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)
५. आणखी भाषणे डॉ. मधुकर आष्टीकर..............................रु. १०/-
६. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ :
डॉ. र. श. केळकर..रु. ४/-
७. "प्रातिभ" लघुकथा संग्रह (१९८०)...............................रु. २०/-
८. समग्र बजाबा...रु. २०/-
९. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे...............रु. ४/-
१०. ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता :
संपादन .आशा सावदेकर...रु. ३०/-
११. दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.............रु. ५/-
१२. मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर...............................रु. ३/-
१३. संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.).......................रु. ७५/-
१४. युगवाणी साहित्य सूची : (संपादन : केशव जोशी)....................रु. ७०/-
१५. कविता विदर्भाची : डॉ. सौ. आशा सावदेकर........................रु. ५०/-
१६. छंदशास्त्र : एक अध्ययन : कुंदन दिवाण.............................रु. १०/-
१७. वसंत वैभव : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुळकर्णी............रु. ८०/-
१८. धन्यतेची थाप : डॉ. वि.भि.कोलत...............................रु. १००/-
१९. वक्ता दशसहस्त्रेषु (प्रा. राम शेवाळकर)
संपादक : डॉ. वि. स. जोग.......................................रु. १२५/-
२०. अध्यक्षीय भाषणे, खंड २ :
संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.............................. रु. २५०/-
(विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

२१. अध्यक्षीय भाषणे, :
संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी..............................रु. २००/-
(विदर्भ साहित्य संघाच्या विविध प्रवाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन)

२२. युगवाणी साहित्य सूची, खंड २ (संपादन : केशव जोशी)............रु. ५०/-

२३. वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)
संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी..................................रु. १००/-

२४. विदर्भ साहित्य संघ -
अमृत महोत्सवी स्मरणिका- १९९९..............................रु.२००/-

२५. सांजदिव्याचे हंबर -शिवा राऊत (निवडक कविता)................रु. ६०/-
संकलन /संपादन डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग

। संमेलन स्थळी ।
एकूण १००/– रु किंमतीच्या पुस्तकावर १० % सूट.

....

शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये / विक्रेत्यांकरिता
२०% सूट.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सिताबर्डी,
नागपूर : ४४००१२, दूरभाष : ५२३९२९